सोलापूर तरुण भारत

# आसमंत



# भारतीय निर्यातीच्या नव्या वाटा...

**आकलन**
**संजीव ओक**

अमेरिकेने भारतावर दबाव आणत, त्याला आपल्या अटीशर्तींवर व्यापार करारास भाग पाडण्यासाठी जे मनमानी आयातशुल्क लागू करण्याचे धोरण अवलंबले आहे, त्या मनमानीचा प्रभाव कमी करण्यासाठी भारताने उच्चस्तरीय समिती स्थापन केली आहे. भारत आणि अमेरिका यांच्यातील वाढलेल्या तणावामुळे निर्यातीत जे संभाव्य अडथळे येऊ शकतात, ते दूर करण्याचे काम ही समिती करेल, असे मानले जाते. या उच्चस्तरीय समितीत मुख्यत्वे प्रमुख मंत्रालयांचे जसे की वाणिज्य, वित्त, उद्योग, वस्त्रोद्योग, कृषी आणि परराष्ट्र व्यवहार वरिष्ठ अधिकारी असतील आणि त्यात राज्य सरकारे, उद्योग प्रतिनिधी आणि तज्ज्ञ सल्लागार यांचादेखील समावेश असू शकतो.

भारताच्या निर्यातीमधील अडथळा ओळखणे, हा त्यामागील प्राथमिक उद्देश आहे. अमेरिकेत होणारी भारतीय निर्यात संकटात सापडलेली असताना, त्याची तीव्रता कमी करणे, हा त्यामागील हेतू. भारतामधील कृषी क्षेत्रातील तसेच, दुग्ध उत्पादकांच्या हिताचा बळी देऊन भारत कोणतीही तडजोड करणार नाही, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेला ठणकावून सांगितले आहे. त्याचवेळी, रशियाबरोबर सुरू असलेला व्यापार कोणत्याही परिस्थितीत बंद केला जाणार नाही, असेही त्यांनी म्हटले आहे.

भारत रशियाकडून ऊर्जा खरेदी तर करतोच, त्याशिवाय रशिया हा भारतासाठी शस्त्रास्त्रांचा सर्वांत मोठा पुरवठादार देश म्हणून पुढे आला आहे. अमेरिकेला 'एफ-३५' लढाऊ विमाने भारताच्या गळ्यात मारायची आहेत आणि भारताने त्यालाच नकार देत रशियाच्या 'सु-५७' या विमानांना पसंती दिली असल्याने अमेरिका म्हणजेच राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प संतप्त झाले आहेत. जागतिक महासत्ता असलेल्या अमेरिकेला भारत नकार कसा देऊ शकतो, या भावनेनेच त्यांनी भारतावर कर लादण्याबरोबरच, पाकला जवळ करण्याचे धोरण स्वीकारले आहे.

पाकने कायमच दहशतवादाला खतपाणी घातले आहे. इतकेच नव्हे, तर भारतातील दहशतवादी हल्ले पाकनेच घडवून आणले आहेत, हे भारताने सप्रमाण सिद्ध केले आहे. पहलगाम येथील दहशतवादी हल्लाही पाक पुरस्कृत होता, हे माहिती असतानाही अमेरिकेने पाकला मदत करण्याचे ठरवले आहे, त्यातूनच अमेरिकेचा दुटप्पीपणा उघड होतो. या पार्श्वभूमीवर, भारताला विरोधच करायचा आहे, याच मानसिकतेतून अमेरिकेचे वर्तन आहे. म्हणूनच, अमेरिकेतील निर्यात कमी झाली, तर भारताला त्याचे पर्याय शोधणे हे क्रमप्राप्त आहे. तेच आता भारत करत आहे. औषध, कापड, वाहन उद्योग, अभियांत्रिकी वस्तू, कृषी तसेच माहिती-तंत्रज्ञान सेवा या सर्वांवर अमेरिकेच्या

> **आयात शुल्कवाढीच्या निर्णयातून अमेरिकेने भारताविरोधात दबावतंत्राचा अवलंब केलेला दिसतो. तथापि, भारताने अमेरिकेला ठणकावून प्रत्युत्तर देत, पर्यायी बाजारपेठांचा शोध घेत, निर्यात कशी कायम राहील, याची पुरेपूर काळजी घेतली आहे. त्याचेच या लेखात केलेले आकलन...**

आयातशुल्काचा विपरीत परिणाम होणार आहे. अर्थातच, हे शुल्क कसे लागू केले जाते आणि कोणत्या क्षेत्रांना लक्ष्य केले जाते, यावर ते अवलंबून असेल. अमेरिका जगातील सर्वांत मोठ्या अर्थव्यवस्थांपैकी एक असून, भारताचा महत्त्वाचा व्यापार भागीदार देश आहे. तथापि, अमेरिकेच्या हेकेखोर भूमिकेचा निर्यातीवर थेट आणि अप्रत्यक्ष परिणाम झाला आहे.

विशेषतः औषधनिर्माण, कापड, वाहन उद्योग, कृषी उत्पादने आणि माहिती-तंत्रज्ञान सेवा यांसारख्या क्षेत्रांवर स्पर्धात्मकता टिकवणे आव्हानात्मक ठरू लागले आहे. अशा परिस्थितीत निर्यात प्रक्रियेत वेग, पारदर्शकता आणि खर्च-कार्यक्षमता वाढवणे अत्यावश्यक ठरते. या पार्श्वभूमीवर ही उच्चस्तरीय समिती निर्यात प्रक्रियेत होणारे विलंब ओळखून त्यांची कार्यक्षमता सुधारण्यावर भर देईल. तसेच, विविध मंत्रालयांमधील विरोधाभासी नियम कमी करून, निर्यात प्रोत्साहन, कर परतावा योजना आणि वित्तपुरवठा यामध्ये सुसंगती आणणेही अपेक्षित आहे. ज्या क्षेत्रांवर या आयातशुल्काचा सर्वाधिक परिणाम होणार आहे, त्यांना तातडीने दिलासा देणे, हेही एक प्रमुख काम आहे. व्यापार सुलभीकरण करणे, तसेच निर्यातीसाठीच्या पर्यायी बाजारपेठा शोधण्याचे काम या समितीला करावे लागणार आहे. भारताने निर्यातील बळ देण्यासाठी डिजिटल व्यापार पोर्टल्सचा विस्तार केला असून, 'आसीई-गेट'सारख्या डिजिटल कस्टम्स पोर्टलद्वारे निर्यात मंजुरी प्रक्रियेला गती देण्याचे मोलाचे काम केले आहे. तसेच, कर व शुल्क परतावा सुलभ करून निर्यात खर्च कमी करण्याचा प्रयत्नही केला आहे. देशातील प्रमुख बंदरांवर कंटेनर हॅण्डलिंगची क्षमता वाढविणे आणि रस्ते, रेल्वे कनेटिव्हिटी सुधारणा यासाठीही प्रयत्न केले जात आहेत. माल वाहतुकीसाठी विशेष रेल्वे कॉरिडोर उभारले असून, त्यांचा विस्तार केला जात आहे. मुक्त व्यापार करारांवर भारताने भर दिला असून, एशियान, युरोपीय महासंघ, युएई, इंग्लंड यांच्याशी करार करत नवनवीन बाजारपेठांमध्ये प्रवेश करण्याचे धोरण अवलंबले आहे. यातून अमेरिकेवरील अवलंबित्व कमी होण्यास मदत होईल. तसेच, देशांतर्गत सूक्ष्म व लघु उद्योगांसाठी निर्यात प्रशिक्षण, क्रेडिट हमी आणि सबसिडी उपलब्ध करणे, यासाठी योजना आखल्या आहेत. केंद्र सरकारच्या 'मेक इन इंडिया' तसेच, 'आत्मनिर्भर भारत' या धोरणांनी उत्पादन क्षमतेला बळकटी दिली आहे. २० हजार कोटींच्या निर्यात प्रोत्साहन धोरणाची घोषणा करण्यात आली आहे. अमेरिकेच्या आयातशुल्कामुळे अमेरिकी बाजारपेठांमधील भारतीय निर्यात संकटात सापडली असली, तरी आफ्रिकेच्या रूपाने नवीन बाजारपेठ भारताला उपलब्ध झाली आहे. आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांनी भारताला या शुल्काचा फारसा फटका बसणार नाही. 'चेंबर ऑफ कॉमर्स'नुसार एकंदर निर्यात केवळ १.८७ टक्के आणि 'जीडीपी'मध्ये ०.१९ टक्के इतकाच फरक होईल.

(पान ४ वर)

---

# पाकच्या पोकळ वल्गना

**लक्ष्यवेध**
**प्रतिनिधी**

> **गेल्या ४८ तासांत पाकिस्तानकडून भारताला तीन वेळा धमक्या मिळाल्या आहेत. भारताने सिंधू जलवाटप करार थांबवला, तर भारतावर क्षेपणास्त्रे डागण्याच्या पाकने केलेल्या वल्गना, ढासळलेल्या अर्थव्यवस्थेच्या देशाची हतबलता आणि अमेरिकेच्या खेळातील त्याची भूमिका उघड करणाऱ्या ठरल्या आहेत.**

पाकचे लष्करप्रमुख जनरल आसिम मुनीर यांनी अमेरिकेच्या मांडीवर बसून भारतावर क्षेपणास्त्र डागण्याची तसेच, अर्ध्या जगाला उद्ध्वस्त करण्याची वल्गना केली. मुनीर यांच्या अणुबॉम्ब हल्ल्याच्या धमकीवजा विधानावर अमेरिकेतून तीव्र प्रतिक्रिया उमटली असून, अमेरिकेच्या भूमीवर पाककडून दिल्या जाणाऱ्या धमक्या पूर्णपणे अस्वीकार्य असल्याचे माजी पेंटागॉन अधिकारी मायकल रुबिन यांनी म्हटले आहे. तसेच, मुनीर यांची भाषा आम्हाला ओसामा बिन लादेनच्या भाषणांची आठवण करून देते. पाकिस्तानला दिलेला प्रमुख 'गैर-नाटो' सहयोगी देशाचा दर्जा तत्काळ काढून घ्यावा आणि त्याला दहशतवादाला पुरस्कृत करणार्या देशांच्या यादीत टाकावे, अशी मागणीही त्यांनी केली. रुबिन यांच्या मते, पाकिस्तान हा पहिला 'गैर-नाटो' सहयोगी देश ठरेल, ज्याला 'दहशतवादाला पुरस्कृत करणारा देश' म्हणून सूचीबद्ध केले जाईल. त्याचवेळी, अमेरिकन जनरल्सनी मुनीरसोबतच्या बैठकीतून निघून जाणे का पसंद केले नाही, याबद्दलही रुबिन यांनी आश्चर्य व्यक्त केले.

सिंधू जलवाटप करारावरून पाकचा जो जळफळाट झाला आहे, तो समजून येणारा असाच. भारताने सिंधू जल करार थांबवला, तर भारताला त्याच्या वाईट परिणामांना सामोरे जावे लागेल या पाकी शब्दांच्या मागे, हतबलता स्पष्टपणे दिसून येते. दिवाळखोरीकडे वाटचाल करत असलेल्या पाकिस्तानला आता पाण्याच्या प्रश्नावरूनच राजकारणाचे मोहरे हलवावे लागणार आहेत. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने तातडीने पाकला पाणी न देण्याची जी भूमिका घेतली, ती यथायोग्य अशीच. भारतामध्ये दहशतवादी कारवाया घडवून आणणाऱ्या पाकला त्याची किंमत मोजावी लागणार होतीच, ती पहलगामनंतर चुकती करावी लागली. सिंधू करार स्थगित करण्याबरोबरच भारताने 'ऑपरेशन सिंदूर' राबवत पाकचे कंबरडेही मोडले. यात पाकबरोबर अमेरिकी विमानांनाही भारताच्या क्षेपणास्त्रांची झळ बसली, हा भाग निराळा. सिंधू जल करार हा १९६० साली भारत-पाकिस्तान यांच्यात झालेला ऐतिहासिक करार. यातूनच, सिंधू, झेलम आणि चिनाब या नद्यांचे पाणी पाकिस्तानाला मिळते, तर रावी, व्यास आणि सतलज या नद्यांवरील अधिकार भारताकडे राहतात. या करारामुळे पाकिस्तानच्या शेती, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता आणि जलविद्युत उत्पादन या तिन्ही क्षेत्रांना आधार मिळाला. मात्र, आता तो भारताने स्थगित केला आहे. जून महिन्यात पाकिस्तानातील जलसाठे गेल्या वर्षीपेक्षा तब्बल २० टक्क्यांनी कमी झाले असून, सिंध प्रांतातील सध्याच्या पाण्याचा प्रवाह १ लाख, ३३ हजार युसेक आहे, जो गेल्या वर्षी १ लाख, ७० हजार युसेक इतका होता. खैबर पख्तुनख्वा प्रांतातही प्रवाह २ हजार, ९०० युसेकवरून २ हजार, ६०० युसेकवर आला आहे. यामुळे खरिपाची पेरणी २० टक्क्यांनी घटली असून, कापूस उत्पादन ३० टक्क्यांनी, तर मयाचे उत्पादन १५ टक्क्यांनी घसरले आहे. कृषी क्षेत्राचे पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेत २३ टक्के योगदान आहे. म्हणजेच सिंधू जल करार स्थगित झाल्याचा थेट फटका, पाकच्या अर्थव्यवस्थेवर होणार आहे. म्हणूनच, अमेरिकेत जाऊन पाक भारताला धमकावण्याचा प्रयत्न करत आहे. भारताला पराभूत करण्याचे स्वप्न पाकने आजवर कित्येकदा पाहिले. 'ऑपरेशन सिंदूर'वेळीही ते पुन्हा पाहिले गेले मात्र, भारताने केवळ २२ मिनिटांत पाकला नाक घासायला भाग पाडले, ही अगदी अलीकडची घटना. अशा परिस्थितीत पाकने भारताला धमया देणे म्हणजे स्वतःच्या पायावर कुर्हाड मारून घेण्यासारखेच. सिंधू करार भारताने असाच स्थगित ठेवला, तर पाकच्या आर्थिक, सामाजिक तसेच राजकीय संकटे किती तीव्र होतील, याची त्यांना नेमकी कल्पना आहे.



गेल्या दोन दिवसांत पाकने तीन वेळा भारताला धमकावयचे धारिष्ट दाखवले. केवळ अमेरिकेतूनच नाही, तर देशांतर्गत सभा-जाहीर सभांतूनही पाक असेच बेताल बोल बोलत आहे. हे बेजबाबदार राजकीय वर्तन नव्हे का? जागतिक पातळीवर कोणताही देश असा सातत्याने उघड-उघड शेजारी राष्ट्राला धमया देत नाही पण, पाकिस्तान याला अपवाद आहे. कारण, या देशाच्या राजकारणात जबाबदारीपेक्षा भारताविरोधात आक्रमक भाष्य करण्याला अधिक महत्त्व आहे. दुर्दैवाची बाब अशी की, जी अमेरिका दहशतवादाविरोधातील लढाईत आपण भारताच्या बरोबर आहे, असे म्हणते, त्याच अमेरिकेतून मुनीर भारताबरोबरच अर्ध्या जगाला उद्ध्वस्त करण्याची भाषा वापरतो आणि अमेरिकी प्रशासन त्याविरोधात कोणतीही कारवाई करत नाही. अमेरिकेचा दुटप्पीपणा तो हाच! या धमयांच्या पार्श्वभूमीवर आणखी एक संदर्भ तपासून पाहायला हवा. नुकतेच अमेरिकेने 'बलोच लिबरेशन आर्मी'ला दहशतवादी संघटना म्हणून घोषित केले. पाकिस्तानच्या हिताचा असा हा निर्णय असला, तरी प्रश्न असा आहे की, हा निर्णय घेताना अमेरिकेचा नेमका उद्देश काय? पाकिस्तानला पुन्हा एकदा आपल्या भूराजकीय खेळात प्याद्यासारखा वापरण्याचा? अफगाणिस्तान, मध्य आशिया आणि चीनच्या 'बेल्ट अॅण्ड रोड' प्रकल्पाच्या संदर्भात पाकिस्तानचे भौगोलिक महत्त्व अमेरिका दुर्लक्ष करू शकत नाही म्हणूनच, भारताविरोधात पाकला बळ देणे, त्याला रसद पुरवणे हा अमेरिकेचा जुना खेळ पुन्हा खेळला जात आहे. त्यावेळी अखंड रशिया होता, आता रशियासोबत भारतही आहे. १४ ऑगस्ट हा पाकिस्तानचा स्वातंत्र्य दिन. मात्र, भारताच्या दृष्टीने ही तारीख फक्त एका देशाचा स्वातंत्र्य दिन नाही, तर विभाजन-विभीषिका दिवसाची आठवण आहे. भारत आणि पाकिस्तान यांची सुरुवात एकाच काळी झाली पण, आज ७८ वर्षांनंतरचे चित्र पाहिले, तर भारत जगातील चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था म्हणून उदयास आला आहे. आणि पाकिस्तान? दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर उभा असलेला देश. परकीय कर्जाच्या ओझ्याखाली, महागाईने होरपळलेला, दहशतवादाने पोखरलेला असे हे विषम चित्र. दोन्ही देशातील हा विरोधाभास कशामुळे? भारतात टिकली ती सर्वसमावेशक हिंदू संस्कृती, विविधतेत एकतेची भावना आणि लोकशाही मूल्यांवर आधारित व्यवस्था. पाकिस्तानात मात्र कट्टरतेला दिले गेलेले खतपाणी, लोकशाहीला पायदळी तुडवणारे लष्करी हुकूमशहा आणि दहशतवादाला मिळालेला राजकीय आधार. भारताने आतापर्यंत सिंधू जल कराराचा मान राखला. अगदी युद्धकाळातही तो मोडला नाही पण, कराराची तरतूद मोडून पाकिस्तान भारताला सतत डिवचत असेल, तर आपल्यालाही विचार करावा लागेल. सिंधूच्या उपनद्यांवर प्रकल्प उभारण्याचा, आपल्या वाट्याचे पाणी पूर्ण क्षमतेने वापरण्याचा भारताला अधिकार आहे.

(पान ४ वर)

---




# भाऊ सापडायला लागले!

> **भारतीय राजकारणात एक गोष्ट कायम टिकून आहे आणि ती म्हणजे निवडणुका जवळ आल्या की, आरोपांची राळ उडायला सुरुवात होते. विरोधक नेत्यांच्या हातात आरोपांची पतंग असते, जी ते जनतेच्या डोयावर उडवत राहतात. त्यातून राजकीय गोंधळाचे वातावरण तयार होते. याचे अलीकडील उदाहरण म्हणजे, काँग्रेसने सुरू केलेली 'मतचोरी'विरोधी मोहीम. राहुल गांधी यांनी आजवर सादर केलेल्या कोणत्याही पुराव्यांचे सत्यापन केलेले नाही. सत्यापन करण्याऐवजी त्यांनी पळ काढणेच पसंत केले. आज त्यांच्या मतचोरी कथेची री 'इंडी' आघाडीतील अनेकजण ओढत आहेत. पानिपतच्या लढाईनंतर एकाएकी अनेक भाऊ सापडू लागल्याची परिस्थिती महाराष्ट्रात उद्भवली होती. अगदी 'इंडी' आघाडीची अवस्थाही आज तशीच झाली आहे.**

**वेधक**
**प्रतिनिधी**

भारतीय राजकारणात निवडणुका जवळ आल्या की, आरोपांची राळ उडायला सुरुवात होते. विरोधक नेत्यांच्या हातात आरोपांची पतंग असते, जी ते जनतेच्या डोयावर उडवत राहतात. त्यातून राजकीय गोंधळाचे वातावरण तयार होते. याचे अलीकडील उदाहरण म्हणजे, काँग्रेसने सुरू केलेली 'मतचोरी'विरोधी मोहीम. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी 'व्होट चोरी' नावाचे संकेतस्थळ लॉन्च केले असून, पत्रकार परिषदेतून त्याबाबत माहिती देत जनतेला आवाहन केले की, 'या मोहिमेला साथ द्या, आपले मत वाचवा.' हे सगळे ऐकायला खूप छान! मात्र, निवडणूक आयोगाने जेव्हा सांगितले की, तुमच्याकडे पुरावे असतील तर शपथपत्रावर सही करा किंवा देशाची माफी मागा, तेव्हा मात्र राहुल गांधी त्यापासून पळ काढतात. त्यांचे हे असे आरोप करून पळून जाणे, हे देशालाही नवे नाही. यापूर्वीही अशीच पद्धत दिसली आहे.

'ईव्हीएम' हॅकिंगच्या कथांना रंगवून रंगवून मांडले गेले. आयोगाने आरोपांना सिद्ध करण्यासाठी, देशातील सर्वच विरोधी पक्षांना अनेकदा बोलावले. पण, कोणताही नेता प्रत्यक्ष पुराव्यासह हजर झाला नाही. 'ईव्हीएम' असे हॅक होते,असा छातीठोकपणे दावा करणारे मातब्बर विरोधी नेते, तेव्हा मात्र बिळात लपले होते. 'राफेल' वरील आरोपांच्या वेळीही राहुल गांधी यांनी, संसदेत एक रेकॉर्ड वाजवून 'सत्य' सांगण्याचा दावा केला होता. मात्र, तत्कालीन लोकसभा अध्यक्षांनी या रेकॉर्डचे सत्यापन करण्यास सांगितल्यावर, त्यांनी तो फोन खिशात ठेवला आणि विषय टाळला. हीच जुनी पद्धत आता त्यांनी पुन्हा 'मतचोरी'च्या रूपाने वापरली आहे.

एकीकडे, राहुल गांधी निवडणूक आयोगाच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत असताना, राजकारणातले भीष्माचार्य असा ज्यांचा लौकिक, ते शरद पवार कसे मागे राहतील? हे तेच शरद पवार जे आज नैतिकतेच्या मोठ्याल्या गप्पा करत आहेत, तेच २०१४ साली मात्र गावाला मतदान करा, बोटावरची शाई पुसून पुन्हा मुंबईत येऊन मतदान करा, असे आवाहन जाहीर सभेत मतदारांना करत होते.

(पान ४ वर)

# सेव्हन सामुराई ते शोले आणि संघ

विश्वसंचार

मल्हार कृष्ण गोखले

**१५ ऑगस्ट २०२५ या दिवशी 'शोले' या भव्य हिंदी चित्रपटाच्या प्रदर्शनाला ५० वर्षे पूर्ण झाली आहेत. २ ऑक्टोबर २०२५ या विशी विजयादशमी आहे. त्या दिवशी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला १०० वर्षे पूर्ण होत आहेत. त्या निमित्ताने हिंदू समाजाच्या मानसिकतेबद्दल एक चिंतन...**



### सेव्हन सामुराई

अकीरा कुरोसावा हा एक ख्यातनाम जपानी चित्रपट दिग्दर्शक होऊन गेला. १९५४ साली त्याने 'सेव्हन सामुराई' नावाचा चित्रपट जपानी भाषेत काढला. सामुराई म्हणजे तलवारबाज योद्धा. कथानक इतिहास काळातले आहे. दरोडेखोरांची एक टोळी एका जपानी खेड्यातले सगळे पीक लुटून नेत असते. गावकरी त्यांना रोखू शकत नसतात. मग एका अनुभवी म्हाताऱ्याच्या सल्ल्यावरून ते एका सामुराई योद्ध्याला आपल्या संरक्षणासाठी गावात बोलावून आणतात. हा सामुराई आणखी सहा सामुराईंना घेऊन येतो. पुढे काय होते, हे आपल्याला कळलेच असेल. यातला अधोरेखित करण्याचा मुद्दा हा की, हे सामुराई लोक गावातल्या दरिद्री, साध्या शेतकऱ्यांना दरोडेखोरांशी लढण्यासाठी प्रशिक्षण देऊन तयार करतात. म्हणजे सात सामुराईंच्या नेतृत्वाखाली अख्खा गाव डाकूंशी लढतो. कुरोसावाचे नाव १९५० च्या त्याच्या 'राशोमॉन' या यशस्वी चित्रपटामुळे जगभर सर्वत्र पोचलेले होतेच. त्यामुळे जपानसकट जगभर सर्वत्र हा 'सेव्हन सामुराई' उत्सुकतेने पाहिला गेला. जपानमध्ये आणि इतरत्रही तो समीक्षकांना पण आवडला आणि तिकीटबारीवरही यशस्वी ठरला.

### मॅग्निफिसंट सेव्हन

आता इतका यशस्वी चित्रपट म्हटल्यावर हॉलिवूडवाल्यांनी तो न उचलला तरच नवल. युनायटेड आर्टिस्टस् या हॉलिवूड कंपनीसाठी दिग्दर्शक जॉन स्टर्जेस याने 'मॅग्निफिसंट सेव्हन' या नावाने 'सेव्हन सामुराई'चे खास अमेरिकन रूपांतर केले. अमेरिकेतली टेक्सास, न्यू मेक्सिको, कोलोरॅडो, कॅलिफोर्निया इत्यादी संस्थाने 'वाईल्ड वेस्ट'- रांगडी पश्चिम म्हणून ओळखली जात. चोऱ्यामाऱ्या, गुंडगिरी, तुफानी घोडेस्वारी, बेछूट गोळीबार, जुगार इत्यादी गोष्टी तिथल्या अफाट मुलखात सर्रास चालायच्या.




तर, अशीच एक डाकूंची टोळी मेक्सिकोमधल्या एका गरीब शेतकरी खेड्याला वारंवार त्रास देत असते. तेव्हा गावातल्या म्हाताऱ्याच्या सांगण्यानुसार काही जण मेक्सिको आणि अमेरिकेच्या सरहद्दीवरच्या एका गावात जातात. तिथे त्यांना दोन उत्कृष्ट नेमबाज भेटतात. गावकरी त्यांच्याकडून हत्यारे विकत घेऊ पाहतात. तेव्हा ते नेमबाज म्हणतात, 'हल्ल्यांपेक्षा अमेरिकेत हत्यारबंद माणसे स्वस्त आहेत. तेव्हा आम्हीच तुमच्या गावात भाड्याने येतो.' हा खास अमेरिकन टच् होता.

मग ते दोन नेमबाज म्हणजे १९५० आणि ६० च्या दशकातले हॉलिवूडचे दोन सुपरस्टार अभिनेते युल ब्रायबर आणि स्टीव्ह मॅक्क्वीन हे आपल्यासारख्या आणखी पाच नेमबाजांना पण बरोबर घेऊन त्या संकटग्रस्त गावात जातात. पुढचा अधोरेखित करण्याचा मुद्दा हा की, ते गावातल्या गरीब, साध्या शेतकऱ्यांनासुद्धा प्रशिक्षण देऊन तयार करतात. डाकूंसोबतच्या अंतिम सामन्यात या सात नेमबाजांबरोबरच गावसुद्धा लढतो. मॅग्निफिसंट सेव्हन १९६० साली प्रदर्शित झाला.

### जिस देश में गंगा...

त्याचवर्षी म्हणजे १९६० साली भारतात राज कपूरने 'जिस देश में गंगा बहती है' हा चित्रपट काढला. त्यात तो स्वतःच नायक होता. तो नेहरू युगाचा परमोच्च कालखंड असल्यामुळे शस्त्राने दुष्टांचे निर्दालन वगैरे होतच नसे. प्रेम, अहिंसा, शांती, सद्भाव यांच्याबद्दलची राज कपूरची प्रवचने ऐकूनच डाकूंचे हृदय परिवर्तन होते, असे दाखवण्यात आले. शेकडो बंदुका जे करू शकत नाहीत, ते एकटा राज कपूर हां-हां म्हणता करून टाकतो. जोडीला शंकर-जयकिशनची मधुर गाणी, पद्मिनी या तत्कालीन लोकप्रिय नटीची दिलखेचक नृत्ये वगैरेंनी हिंसाचारी 'सेव्हन सामुराई'ला अहिंसेच्या गोड-गोड पाकात बुडवून पार अहिंसक बनवून सोडले. कसेही असो. चित्रपट तिकीटबारीवर हिट झाला.




### मेरा गाव मेरा देश





१९७१ साली राज खोसला या प्रसिद्ध दिग्दर्शकाने याच कथानकावर 'मेरा गाव मेरा देश' हा चित्रपट काढला. त्या काळात हिंदी चित्रपटात एकच नायक असायचा. एक निवृत्त सेनाधिकारी (अभिनेता जयंत) एका चोराला (अभिनेता धर्मेंद्र) आपल्या गावात आणतो आणि गावाला सतावणाऱ्या डाकूंशी लढण्यासाठी तयार करतो.

धर्मेंद्र हे काम मनावर घेऊन करू लागल्यामुळे गावकरी आपोआपच त्याच्या मागे उभे राहतात. शेवटच्या संघर्षात दिग्दर्शकाने काही फार मजेदार दृश्ये दाखवली आहेत.

गावातल्या महिला धर्मेंद्रला खूप मदत करतात. एक महिला घरात येऊन बघते, तर तिचा नवरा बाहेरच्या मारामारीत घुसण्याऐवजी भाकरी खात बसलेला तिला दिसतो. काहीही न बोलता ती बाई आपल्या हातातल्या बांगड्या काढून नवऱ्यासमोर धरते. चिडलेला नवरा मुकाट्याने थाळी दूर सारतो आणि लाठी घेऊन बाहेर पडतो. मुद्दा काय की, नायक एकटाच न लढता, लोकांना बरोबर घेऊन खलनायकाशी लढतो.

### शोले




मला वाटते की, हा लेख वाचणाऱ्या सर्व वाचकांनी 'शोले' हा चित्रपट नक्कीच पाहिला असावा. तरी थोडक्यात कथानक सांगतो. डाकू गब्बरसिंग (अमजद खान) याला ठाकूर बलदेवसिंग हा बहाद्दर इन्स्पेक्टर पकडतो. गब्बर सूड म्हणून ठाकूरच्या संपूर्ण कुटुंबाची कत्तल करतो आणि ठाकूरचे दोन्ही हात तोडून टाकतो. ठाकूर वीरू (धर्मेंद्र) आणि जय (अमिताभ) या दोन गुंडांना पैसे देऊन गावात आणतो आणि गब्बरचा नुसत्या पायांनी चेचून सूड घेतो.

१५ ऑगस्ट १९७५ या दिवशी प्रदर्शित झालेल्या शोलेने हिंदी चित्रपटसृष्टीत नवा इतिहास रचला. पाच वर्षे हा चित्रपट अखंड गर्दी खेचत होता. शोलेच्या विविध वैशिष्ट्यांवर नामवंत चित्रपट समीक्षकांनी भरभरून लिहिले आहे आणि आता ५० वर्षे पूर्ण होण्याच्या निमित्ताने पुन्हा लिहिले जाईल.


मला जो मुद्दा अधोरेखित करायचा आहे तो असा की, मूळ 'सेव्हन सामुराई'पासून पुढच्या मी दिलेल्या त्याच्या कॉप्यांमध्ये किंवा मी इथे न दिलेल्या कॉप्यांमध्येसुद्धा लढणाऱ्या एक किंवा अनेक नायकांसह त्या गावातल्या स्थानिक लोकांचा सहभाग दाखवला गेला.

शोलेमध्ये मात्र लोकसहभाग नाही. पहिल्यापासून शेवटपर्यंत वीरू आणि जय हे दोघेच फक्त खलनायकाशी टक्कर घेतात. शेवटच्या क्लायमॅक्समध्ये तर एकटा ठाकूरच गब्बरशी झुंजतो.

भारतीय लोकांची म्हणजे हिंदू समाजाची अशी मानसिकता आहे की, आम्ही संकटात आहोत; पण आम्ही त्यासाठी काहीही करणार नाही. कुणीतरी अवतार, कुणीतरी मसिहा येईल. तो आम्हाला दुष्टांच्या तावडीतून सोडवेल. मग आम्ही त्याच्या आरत्या गाऊ, त्याच्या पायावर लोटांगणे घालू. शोलेचे लेखक सलीम जावेद यांनी हिंदू समाजाच्या या मानसिकतेवरच बोट ठेवले आहे का?

जर असेल, तर कळत की नकळत? गावातल्या रहीम चाचाचा (ए. के. हंगल) मुलगा अहमद (सचिन) याला गब्बर ठार मारून गावात पाठवून देतो आणि मागणी करतो की, गाव शिल्लक राहायला हवा असेल, तर वीरू आणि जय यांना माझ्या स्वाधीन करा. त्यावर सगळे हिंदू गाववाले शेपूट घालतात. पण रहीम चाचा म्हणतो, 'अल्लाने मला आणखी दोन-चार मुलगे का नाही दिले? या गावावर न्यौछावर व्हायला?' या प्रसंगातून सलीम-जावेद यांनी कोणता नॅरेटिव्ह सेट केला?

### संघ



संघ संस्थापक डॉ. हेडगेवार यांनी हिंदू समाजाच्या या अवतार संकल्पनेवरच नेमके बोट ठेवले होते. परमेश्वर अवतार घेऊन येईल आणि दुष्टांचे निर्दालन करून पुन्हा धर्मसंस्थापना करेल, या धारणेला त्यांचा सक्त विरोध होता. म्हणजे त्यांचा परमेश्वरी शक्तीवर विश्वास नव्हता, असे नव्हे तर सर्व काही परमेश्वर करेल, आम्ही झोपून राहू आणि दुष्टांकडून मार खात राहू. या हिंदू समाजाच्या भ्रांत धारणेला, निष्क्रियतेला त्यांचा विरोध होता. त्यासाठी त्यांनी संघटना आणि शक्तीची उपासना यांची सुरुवात केली.

एका काल्पनिक भासणाऱ्या चित्रपट कथेचा हिंदू समाजाच्या जुन्या दुखण्याशी असा प्रत्यक्ष संबंध आहे. त्या चित्रपटाला, त्याच्या यशाला ५० वर्षे होत आहेत आणि त्या जुनाट दुखण्यावरच्या उपायाला १०० वर्षे होत आहेत. तुम्हाला काय वाटते? कुणीतरी महानायक येईल नि आमचे संकट दूर करेल. तोपर्यंत आम्ही असेच असंघटित, ख्यालीखुशालीत मग्न राहू, ही हिंदू समाजाची मानसिकता बदलली आहे?


(लेखक प्रसिद्ध स्तंभलेखक आहेत.)

# धडक बेधडक: टीका आणि स्तुती यांचा सुरेख संगम!

पुस्तक परिक्षण

नागेश शेवाळकर

भ्र. ९४२३१३९०७१




आजच्या काळात एखाद्या पुस्तकाची पाठराखण जर जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज करीत असतील तर ती आश्चर्याची गोष्ट म्हणावी लागेल. साहित्य प्रकारातील पुस्तकाची प्रस्तावना, मनोगत आणि पाठराखण ह्या बाबी त्या पुस्तकाचा वाङ्मयीन आशय स्पष्ट करतात. होय! आज मी ज्या पुस्तकाचा परिचय करून देत आहे, त्या लेखकाने तुकाराम महाराज यांची एक रचना स्वतःच्या लेखसंग्रहाच्या मलपृष्ठावर घेतली आहे. लेखक आहेत, महाराष्ट्रात लेखणी आणि वाणी या दोहोंबाबत ख्यातकीर्त असलेले, प्रयोगशील प्रकाशक म्हणून सर्वदूर परिचित असलेले घनश्याम पाटील! हा 'ब्लर्ब' वाचून आणि ज्यांना-ज्यांना घनश्याम पाटील यांचा स्वभाव माहीत आहे, तो प्रत्येक जण या पुस्तकात कुण्या 'नाठाळा'च्या माथी लेखणीचा तडाखा बसला आहे या उत्सुकतेपोटी पुस्तकाच्या अंतरंगात डोकावतात.

चपराक प्रकाशन, पुणे यांच्या माध्यमातून घनश्याम पाटील यांचा धडक बेधडक हा लेखसंग्रह नुकताच प्रकाशित झाला आहे. निर्भीड पत्रकार म्हणून स्व. माधवराव गडकरी पत्रकारिता पुरस्कार प्राप्त झाला असल्यामुळे आणि यापूर्वी स्वतःची पाच पुस्तके प्रकाशित असल्यामुळे, इतर लेखकांची जवळपास सहाशे पुस्तके प्रकाशित केलेली असल्यामुळे हा लेखक-प्रकाशक उभ्या महाराष्ट्राला परिचित आहे. या संग्रहात एकूण बावीस लेखांची मेजवानी वाचकांसाठी खुली केली आहे. या संग्रहात राज ठाकरे, उद्धव ठाकरे, शरद पवार, सुप्रिया सुळे, इत्यादी राजकीय नेत्यांसह कार्यकर्ते, भिडे गुरूजी, पक्षापक्षातील वाचाळवीर, कोरोना काळातील परिस्थिती यावर कोरडे ओढले आहेत. हे सर्व करीत असताना लेखकाची भूमिका सकारात्मक आहे. सवंग प्रसिद्धीसाठी लिहिणारा हा लेखक-प्रकाशक नाही हे त्यांच्या मनोगतातून स्पष्ट होते. अनेकदा राजकीय नेत्यांचे ते कौतुकही करतात. मनोगतात लेखक लिहितात...

'द्वेष गळून पडावा, प्रेम वाढीस लागावे हा माझ्या लेखणीचा मूलमंत्र आहे. यातील टीका कुणाच्याही आकसापोटी नाही तर पत्रकार म्हणून, एक सजग नागरिक म्हणून तटस्थपणे मला जे दिसले ते मांडण्याचा प्रयत्न आहे. यातील सकारात्मक भाग समजून घेतला तर उद्याच्या उज्ज्वल भवितव्यासाठी तो पोषक ठरणार आहे.'

गेली अनेक दशकं ज्यांनी राज्यासह देशात आपले नेतृत्व सिद्ध केले, विरोधी पक्षातील पंतप्रधान मोदींसारखे धुरंधर नेते ज्यांना आपला गुरू मानतात असे ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या राजकारणाचा आढावा घेणारा 'सर्व काही किंवा काहीही!' हा लेख या पुस्तकात समाविष्ट आहे. लेखाचे शीर्षक लेख नायकाची परिस्थितीनुसार बदलणारी भूमिका स्पष्ट करते. हवं ते मिळविण्यासाठी सर्व काही करीन किंवा काहीही करीन असा या शीर्षकाचा नि लेखकाचा मनोदय असावा असे मला स्वतःला वाटते. 'त्यांचं वय, प्रकृती आणि प्रवृत्तीचा विचार करता त्यांच्याबाबत 'न झालेले सर्वोत्तम पंतप्रधान' म्हटलं जातं ते खरंच आहे.'

लेखक सुरुवातीलाच हे वाक्य पेरतात. यावरून लेखाचा गाभा लक्षात येतो. कोणत्याही नेत्याबाबत लिहिताना लेखकाची लेखणी टीका अथवा नकारात्मक होत नाही तर स्तुतिसुमनेही उधळते. पवारांची स्तुती करताना त्यांनी तरुणपणी सांभाळलेले मुख्यमंत्री पद, नंतर केंद्रात सांभाळलेली महत्त्वाची मंत्रिपदे, संरक्षण क्षेत्रात स्त्रियांना सर्वप्रथम संधी मिळवून देण्याचा निर्णय यासाठी लेखक त्यांचा 'विलक्षण कर्तृत्व' असा गौरव करतात. याच जोडीला लेखक लिहितात, 'पवारांच्या राजकारणानं महाराष्ट्राला काय दिलं याचं मूल्यमापन झालं पाहिजे. ते करताना पवारांच्या बाबत नकारात्मक गोष्टी सर्वाधिक आहेत...' हे स्पष्ट करतात. कायम चर्चेत कसं राहायचं आणि सगळी चर्चा आपल्याभोवतीच कशी फिरवायची हे वयाच्या ऐंशीव्या वर्षीही पवारांना जसं जमतं तसं अन्य कुणालाच जमत नाही. अशा पद्धतीने सतत चर्चेत राहून त्यांनी स्वतःचा फायदा करून घेतला. असे लेखक लिहितात तेव्हा त्यात टीका आणि स्तुती एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत हे चाणाक्ष वाचकांच्या लक्षात येते. शरद पवारांची विश्वासार्हता हा कायम चर्चेचा नि संशोधनाचा विषय आहे. 'शरद असं करणार नाही...' असं विश्वासाने बोलणाऱ्या खुद्द वसंतदादांना 'शरदनं माझ्या पाठीत खंजीर खुपसला ' असे हताश उद्गार काढावे लागले ह्यातच सारे आले. 'तुम्ही राजकारणात आलंच पाहिजे' अशा आग्रहाने सोनियांना राजकारणात आणणारे पवार 'परदेशी बाई पंतप्रधानपदी नको' अशी टोकाची भूमिका घेणारेही शरद पवारचं! तसेच पवारांनी शिवचरित्राबाबत सुद्धा शक्य होतील तितके वाद जाणीवपूर्वक निर्माण केले, याप्रमाणे शरद पवारांचा राजकीय इतिहास लेखक घनश्याम पाटील यांनी दोन्ही बाजूंनी साकारताना ते एक बेधडक विधान करतात,'महाराष्ट्रातील युवकांच्या तीन पिढ्या शरद पवार नावाच्या या नेत्यानं बरबाद केल्या.'

घनश्याम पाटील हे निर्भीड व्यक्तिमत्त्व म्हणून सर्वत्र परिचित आहेत. जसं ते कौतुक करताना हातचं काही राखत नाहीत तसेच ते टीका करताना मुलाहिजा ठेवत नाहीत. जे पटलं नाही ते समोरच्या व्यक्तिचं पद, योग्यता बाजूला ठेवून त्यास ऐकवतात. या संग्रहातील लेखात मला प्रकर्षाने जाणवलेली गोष्ट म्हणजे त्यांचा विरोधाला विरोध नाही तर तात्विक विरोध आहे. शिवाय चांगले गुण, चांगली कामे यांची त्यांनी जाणीवपूर्वक नोंद घेतली आहे. संग्रह वाचनीय तर आहेच शिवाय चिंतनशील आहे, मार्गदर्शक आहे. वाचकांनी सकारात्मक दृष्टी ठेवून हा वैचारिक संग्रह वाचला तर खूप छान माहिती मिळणार आहे. घनश्याम पाटील यांना त्यांच्या एकूण कार्याला शतशः शुभेच्छा!

**धडक बेधडक** : राजकीय भाष्य

**लेखक:** घनश्याम पाटील (भ्र. ७०५७२९२०९२)

**प्रकाशक** : चपराक प्रकाशन, पुणे

**मुखपृष्ठ:** संतोष घोंगडे

**पृष्ठ संख्या** : १५२

**मूल्य** : ३००/-

# कुर्यात् सदा मंगलम्

संस्कारांच्या देशा

रमा गोळवलकर

भारतीय संस्कृतीत सद्भावना गुणकाची मात्रा प्रचुर प्रमाणात असल्यामुळेच आपण विश्वाच्या कल्याणाची कामना करतो. दैनंदिन जीवनातही सतत मांगल्य नांदावं या उद्देशानं आपण काही विशेष प्रयत्न करीत असतो. सूर्यनारायणाच्या स्वागतासाठी पहाटेपूर्वी अंगणात सडासंमार्जन करून सूर्याचं प्रतीक असलेलं 'स्वस्तिक' रांगोळीनं रेखणं हा एक अस्सल भारतीय संस्कार आहे. भारताच्या विविध प्रांतात रांगोळीला वेगवेगळ्या नावांनी संबोधतात. प्रत्येक परंपरापालक घरातला महिलावर्ग ही प्रथा कसोशीनं पाळतो. दारात रांगोळीचं रेखन हे त्या घरात सोयर किंवा सूतक नाही हे सर्वांना सांगण्याचं एक माध्यम आहे.

काशीच्या विश्वनाथ शंकराची मंगलागौरी



सोयराचे १० दिवस आणि सूतकाचे १५ दिवस सोडले तर हे घर शुद्ध आहे. या घरी येणारे परिचित आणि दारी येणारे गुरुकुलात राहून माधुकरी मागून शिक्षण घेणारे विद्यार्थी, वासुदेवजोगत्यासारखे भिक्षेकरी, साधू-बैरागी, व्रतस्थ-प्रवासी, तीर्थाटनी-यात्रेकरू आणि आगंतुक-अतिथींची पोटापाण्याची सोय होऊ शकेल, ही आमंत्रण वजा सूचना देण्यासाठी अंगणात रांगोळी काढली जाते. यात आपल्या दारी आलेली कोणतीही व्यक्ती उपाशी परत जाणार नाही, याची हमी दिलेली असते. यात घर नांदतं आहे, घरात एखाददुसरा पै-पाहुणा सहज संपादून जाण्याइतकं अन्न शिजलेलं आहे, घरातले लोक स्वागतोत्सुक आहेत आणि दारी आलेला कितीही अनोळखी, अनाहूत (न बोलावलेला) असला, तरी त्याचीदेखील प्राथमिक गरज असलेलं अन्न त्याला मिळावं हा सुविचार आहे, ही सगळी भूमिका स्पष्ट दिसून येते.

दुपारच्या वेळी कोण्या भुकेलेल्याची भूक भागवण्यासारखं दुसरं मंगल काहीही नाही. त्यामुळे रांगोळीचा संबंध थेट पोट भरण्याशी आहे, हे विसरून चालणार नाही. घरच्या कर्त्या स्त्रीकडून आतिथ्याचा हा पूर्वापार चालत आलेला संस्कार पुढच्या पिढीकडे अलगद सोपवला जातो. गृहस्थाश्रमात प्रवेश करून संसाराची जबाबदारी उचलण्यासाठी विवाहबद्ध होणाऱ्या नवदाम्पत्याला सर्वजण एकच आशीर्वाद देतात- 'कुर्यात् सदा मंगलम् सावधान!' अखंड सावध राहून सतत मंगल करा. म्हणजे अनावधानानंदेखील तुमच्या हातून कोणाचं अमंगल होऊ नये ही काळजी घ्या.

भारतीय परंपरेत आयुष्याला चार टप्प्यांत म्हणजे आश्रमात विभागण्यात आलेलं आहे- ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ आणि संन्यास. यापैकी समाजपुरुषाला धारण करण्याची संपूर्ण जबाबदारी ही गृहस्थाश्रमाची आहे. त्यासाठी करायच्या सर्व प्रकारची दायित्व पार पाडण्याला गृहस्थधर्म म्हणतात. साहजिकच त्यात धर्म= कर्तव्य, अर्थ = वैध मार्गाने मिळवलेलं धन, काम = आपल्या कुटुंबातील व्यक्तींच्या नैतिकतेच्या कसोटीवर खऱ्या असणाऱ्या इच्छांची पूर्ती ही तीन भौतिक कर्तव्यं करावी लागतात.

हे सगळं समाजपुरुषाच्या संतुलित जडणघडणीसाठी करणं अत्यावश्यक आहे म्हणून त्याला पुरुषार्थ म्हणतात. हा शब्द लिंगभेदनिरपेक्ष आहे. पती आणि पत्नी दोघांनी सर्वार्थानं एकत्र येऊन हे पुरुषार्थ सिद्ध करत हा समाज धारण करायचा असतो. यात सगळ्यांचं सतत मंगल व्हावं हाच एकमेव उद्देश असावा. रोजच्या आयुष्यात त्याची सुरुवात होते ती रांगोळीनं. त्यातलं सर्वांत महत्त्वाचं चिन्ह आहे ते स्वस्तिक. या चिन्हाचं रेखाटन करूनच पुढची रांगोळी काढली जाते. स्वस्तिक हा एक संधी आहे. 'सु+अस्ति' म्हणजे 'चांगलं, शुभ आहे.' आजकाल 'पॉझिटिव्ह थिंकिंग' करण्याचा गजर सर्वत्र केला जातो. नेमकं हेच या स्वस्तिकातून ध्वनित होत असतं. त्यामुळे कुठलंही काम सुरू करताना स्वस्तिक चिन्ह काढण्याची पद्धत जाणीवपूर्वक रुजवलेली आहे.

प्रवेशद्वाराच्या भिंतीवर 'शुभ-लाभ' लिहिण्याची परंपरा हा स्वस्तिकाचाच पुढचा भाग. दारी येणाऱ्या प्रत्येकापासून या घरात राहणाऱ्या लोकांचं आणि या घरातील लोकांमुळे येणाऱ्याचं चांगलं, भलं, शुभ व्हावं ही प्रांजळ इच्छा या दोन शब्दांत व्यक्त केलेली असते. आजकालच्या कॉर्पोरेट जगात वाटाघाटी करताना दोन्ही पक्षाचा फायदा होणारा सौदा झाला की, 'विन विन सिच्युएशन' असल्याचा डंका पिटण्यात येतो. त्याहून अधिक व्यापक असलेली ही शुभ-लाभाची घोषणा गेल्या अनेक सहस्रकापासून आपल्या समाजात अविरत आहे.

संस्कृत भाषेत 'शुभाऽस्ते सन्तु पंथानः' म्हणजे 'तुझे सगळे मार्ग शुभ असोत' ही कामना कोणतंही काम किंवा प्रवास सुरू करण्याआधी व्यक्त केली जाते. आजकाल आपण 'बेस्ट ऑफ लक' म्हणून मोकळे होतो. त्याचा अर्थ तुझ्या नशिबात, अदृष्ट, दैव, नियती, प्राक्तन, प्रारब्ध, भाग्य, ललाटलेख, विधिलिखित जे काही आहे त्यातलं सर्वात उत्तम तुझ्या वाट्याला येवो इतका मर्यादित होतो. या उलट, तू ज्या कोणत्या मार्गानं पुढे जाशील त्यात तुझं आणि तुझ्याशी संबंधित सगळ्यांचंच शुभ होवो, नव्हे तोच हेतू मनात ठेऊन तू पुढची वाटचाल कर त्यासाठीचं हे आशीर्वचन आहे.

या सगळ्या नित्यनैमित्तिक कर्मासह प्रत्येक श्रावण महिन्याच्या मंगळवारी मंगलागौरी पूजन व्रतचा सोहळा संपन्न होतो. हा सगळ्या विवाहित स्त्रियांनी करायचा विधी आहे. सर्वात आधी लक्षात ठेवायला हवं की, हे व्रत असून ते दाम्पत्यानं अंगीकारायचं असतं.

इस्लामी आक्रमणानंतरच्या विपरीत परिस्थिती लिहिलेल्या व्रत-माहात्म्यात नवऱ्याच्या दीर्घायुष्यासाठी करण्याचं व्रत म्हटलेलं असलं, तरीही त्यातलं मर्म समजून घ्यावं. काशी विश्वनाथ मंदिराच्या प्रांगणात काशीचा शं= कल्याण करणारा तो शंकर आणि सर्वमंगल करणारी ती मंगलागौरी असं दैवी दाम्पत्य विश्वाचे आश्रयदाते प्रस्थापित आहेत. मंगलागौरी व्रतात या दोघांचा वारसा पुढे चालवण्याचा वसा घेण्यात येतो.

'सर्व मंगल मांगल्ये...' श्लोक स्मरून पुढचं वर्षभर आम्ही सदैव सावध राहून सर्वत्र मंगल करण्यासाठी झटू हा संकल्प करायचा. हे व्रत आयुष्यभर करणं अपेक्षित आहे. नव्यानंच ग्रहस्थ धर्मात प्रवेश केलेल्या नवविवाहितेच्या अंगी दीर्घायुषी पतीसह सर्वत्र मंगल करण्याची सवय बाणावी. तिचं अंतर्मन तिच्यासह तिच्या पतीला सर्वांचं भलं करण्याची सतत प्रेरणा देत राहावं, म्हणून मंगलागौरी पूजन करण्याचा हा वैशिष्ट्यपूर्ण भारतीय संस्कार. तो केवळ इव्हेंट पुरता उरू नये, याची काळजी आपण घ्यायला हवी.

वेध

**दत्तात्रय आंबुलकर**

# आता हरितऊर्जेला कृत्रिम बुद्धिमत्तेचे पाठबळ

नव्याने प्रचलित झालेल्या व तुलनेने अल्पावधीत लोकप्रिय झालेल्या 'कृत्रिम बुद्धिमत्ता' (एआय) या नव्या व अनेकार्थांनी उपयुक्त कार्यपद्धतीचा यशस्वी वापर आता हरितऊर्जा क्षेत्रातसुद्धा यशस्वी ठरला आहे. हरितऊर्जा क्षेत्र हे पर्यावरणरक्षणापासून आर्थिक संदर्भातील प्रमुख व क्षमतावान क्षेत्र असून, त्याला कृत्रिम बुद्धिमत्तेची जोड मिळाल्याने, सर्वच क्षेत्रांतील उद्योग-व्यवसायांना आता नावीन्यासह नवी दिशा प्राप्त झाली, हे यासंदर्भात उल्लेखनीय आहे. सकृतदर्शनी स्पष्ट होणारी बाब म्हणजे, आज देशांतर्गत ऊर्जेची गरज व त्याच्या वाढत्या प्रमाणावर चर्चा होत असतानाच, कृत्रिम बुद्धिमत्तेची वाढ होत आहे व त्याचा प्रसार-प्रचारपण होत आहे. त्याचवेळी देशांतर्गत ऊर्जा क्षेत्रात हरितऊर्जेला प्रेरणा, प्रोत्साहन व सरकारी स्तरावर समर्थनदेखील मिळत आहे. ही धोरणात्मक बाबसुद्धा कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वाढत्या वापरासाठी पूरक ठरणारी आहे. यासंदर्भातील मूलभूत व महत्त्वपूर्ण बाब म्हणजे, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या प्रभावी व उपयुक्त वापरासाठी सतत वीज वापराची आवश्यकता असते. ऊर्जेची ही मुख्य गरज पवनऊर्जा व सौरऊर्जा यांसारखे ऊर्जास्रोत सहजगत्या व तुलनेने कमी खर्चात पूर्ण करू शकतात, ही बाब महत्त्वाची आहे. एका आकडेवारीनुसार, पुढील पाच वर्षांत जागतिक पातळीवरील ऊर्जावापरातील सुमारे पाच टक्के वीज ही कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रासाठी व सतत उपलब्ध होण्याच्या तत्त्वावर वापरली जाईल. त्यादृष्टीने पण नजीकच्या भविष्यात हरितऊर्जेचे यासंदर्भातील महत्त्व स्पष्ट होते.



सद्यस्थितीत कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रसार-प्रचार आणि वापर वाढत्या प्रमाणावर होत असून, त्यासाठी आवश्यक वीज हरितऊर्जा क्षेत्रातून सहजगत्या व अधिक परिणामकारक वीजनिर्मिती होऊ शकते, याचे एक प्रमुख कारण म्हणजे, सौर वा पवन ऊर्जानिर्मिती क्षेत्रातील नव्या प्रकल्पांची उभारणी परंपरागत ऊर्जानिर्मिती क्षेत्राच्या उभारणीच्या तुलनेत कमी वेळात होऊ शकते. या कमी खर्चिक व वेळ वाचवणाऱ्या ऊर्जानिर्मिती प्रकल्पांचा फायदा प्रगत व नव्या स्वरूपातील कृत्रिम बुद्धिमत्ता व त्यावर आधारित विशेष व्यावसायिक क्षेत्राला सहजगत्या व किफायतशीर स्वरूपात होऊ शकतो. भारतीय स्तरावर यासंदर्भात सांगायचे म्हणजे, आपल्याकडे तर २०३० सालापर्यंत हरितऊर्जा क्षेत्रातील वीजनिर्मिती व त्याच्या उपयोगामध्ये ५० टक्के वाढ करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला असून, त्याची अंमलबजावणी सुरू झाली आहे.

आज भारताचे प्रकल्प व्यवस्थापन त्याच्या क्षमता व कार्यक्षमतेच्या आधारे जगात अव्वल ठरले असून, याचा लाभ हरितऊर्जानिर्मिती क्षेत्राला सहजगत्या व निश्चितपणे होणार आहे. ही एक जमेची बाजू म्हणायला हवी. याच्याच जोडीला आपल्याकडे संकरित स्वरूपातील म्हणजेच, पवन-सौरऊर्जा एकत्रित स्वरूपात निर्मिती व कार्यरत आहेत. सौरऊर्जेच्या संदर्भातील विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे, आपल्याकडील भौगोलिक रचना व वातावरणीय स्थितीनुसार वर्षातील सुमारे ३०० दिवस सौरऊर्जेसाठी आवश्यक असा सूर्यप्रकाश सहजतेने व सुलभपणे उपलब्ध होतो.

> एकीकडे कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात 'एआय' तंत्रज्ञानामुळे जगभरातील रोजगारावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असताना, जवळपास सर्वच क्षेत्रांत 'एआय'चा वापर हा प्रकर्षाने होताना दिसतो. हरितऊर्जा क्षेत्रही त्याला अपवाद नाही. त्यानिमित्ताने हरितऊर्जेला प्राप्त होणाऱ्या कृत्रिम बुद्धिमत्तेच्या पाठबळाचा ऊहापोह करणारा हा लेख...

जागतिक ऊर्जा क्षेत्राच्या संदर्भात भारताच्या दृष्टीने विशेष जमेची ठरली आहे. याच्याच जोडीला पूर्वीच्या प्रादेशिक वा राज्यस्तरीय वीज पारेषण म्हणजेच ऊर्जा संचाराला आता राष्ट्रीय ऊर्जा पारेषण पद्धतीची जोड मिळाली असून, ही बाब हरितऊर्जा क्षेत्रासाठीसुद्धा लाभदायी ठरली आहे. दरम्यान आपल्याकडील कृत्रिम बुद्धिमतेवर आधारित व्यवसायवाढीने आता गती पकडली आहे. सध्या देशांतर्गत कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित स्टार्टअपची संख्या एक हजारांवर पोहोचली असून, आजमितीस या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्यांपैकी २० टक्के संख्या भारतात आहे, हे विशेष! याला साथ मिळत आहे ती वाढत्या संगणकीय सेवा आणि शिक्षणाची. याचवेळी वाढत्या व्यावसायिक गरजा आणि मागणीनुसार आपल्याकडील डेटा मॅनेजमेंट व्यवसायालापण अनेकार्थांनी 'अच्छे दिन' आले आहेत. यासंदर्भात 'मार्केटस ॲण्ड मार्केट्स'तर्फे करण्यात आलेल्या सर्वेक्षणानुसार पुण्यातील त्यांच्या माहिती संकलन व प्रक्रिया केंद्रामध्ये पूर्णपणे सौरऊर्जेचा वापर केला जात आहे. या अनेक ग्राहकांनी सौरऊर्जेच्या संदर्भात त्यांचे अनुकरण करण्यामध्ये रुची दाखविली आहे. त्यांच्या अनुभवानुसार संगणक प्रक्रिया केंद्रांसारख्या सतत प्रक्रिया स्वरूपात चालणाऱ्या व्यवसायांमध्ये सौरऊर्जेचा वापर आर्थिकदृष्ट्यासुद्धा किफायतशीर ठरणारा आहे. असाच यशस्वी अनुभव हैद्राबाद येथील जागतिक माहिती प्रक्रिया केंद्राच्या ऊर्जा वापरासाठी सौरऊर्जा वापराद्वारे करण्यात येत आहे. यातूनच आता भारतातील इतर ठिकाणच्या प्रमुख व अन्य ठिकाणच्या माहिती संकलन प्रक्रिया केंद्रांचे संचालन सौर वा हरितऊर्जेच्या वापरातून करण्यावर आता भर दिला जात आहे. असे केल्याने पर्यावरण संरक्षणापासून कृत्रिम बुद्धिमता वापरासाठी आवश्यक असा सतत वीजपुरवठा व मुख्य म्हणजे माफक खर्चामध्ये ऊर्जेची उपलब्धता यांसारखे प्रमुख विविध फायदे होत असून, त्याकडे जगातील प्रमुख व प्रगत व्यवसाय उत्सुकतेसह आशावाद घेरून पाहत आहे, हे यासंदर्भात उल्लेखनीय आहे. अर्थात, देशांतर्गत हरितऊर्जा प्रयोग आणि उपयोगाच्या या पहिल्याच व यशस्वी प्रयोगावरच संपूर्ण समाधान मानणे योग्य ठरणारे नाही. अर्थात, ही तर एक अनुभवसिद्ध बाब आहे की, विज्ञान, तंत्रज्ञान, संशोधन यांसारख्या क्षेत्रांत कुठलीही नवी बाब वा नवे तंत्र विकसित करून, त्यांचा प्रथमच व्यावसायिक स्तरावर व यशस्वीपणे करण्यासाठी अद्ययावत माहिती व ज्ञान यांच्या जोडीलाच त्या विषयातील कुशल-कौशल्यांची वेळेत जोड मिळणे तेवढेच महत्त्वाचे असते.

या कौशल्यांमध्ये माहिती, तंत्रज्ञान, माहिती संकलन व प्रक्रिया या विशेष व नव्या कौशल्यांचा प्रामुख्याने समावेश आहे. ही विशेष कार्य-कौशल्यांशी संबंधित कामकाज असणारी क्षेत्रं नवी असल्याने, या क्षेत्रांमध्ये काम करणारे कसबी व अनुभवी लोक अत्यल्प संख्येत उपलब्ध असल्याने अनुभवी व कौशल्ययुक्त कर्मचाऱ्यांची उणीव भासणे स्वाभाविक आहे. मात्र, यासंदर्भातील भारताच्या दृष्टीने महत्त्वाची व विशेष जमेची बाब म्हणजे, सौरऊर्जेसह पवनऊर्जा त्याद्वारे हरितऊर्जा क्षेत्रात अव्वलता व गुणवत्तेसह चांगलेच बस्तान बसविले आहे.

स्टार्टअपपासून सरकारी क्षेत्रातील व कॉर्पोरेट ऊर्जा कंपन्यांनी हरितऊर्जा क्षेत्राचे व्यावसायिक महत्त्व यापूर्वीच समजून घेतले आहे. या व्यावसायिक प्रयत्न आणि पुढाकाराला आता नव्याने सरकारी मदत व प्रोत्साहन मिळावे, यासाठी धोरणात्मक निर्णय झाले असून, या निर्णयांची केंद्र व अंमलबजावणी सुरू आहे. याचा फायदा हरितऊर्जेच्या वापरातून या साऱ्या उत्साहवर्धक व फलदायी वातावरणाच्या पार्श्वभूमीवर, भारतासाठी प्राधान्य तत्त्वावर कार्य करण्यासाठी बाब म्हणजे, भारतातील प्रस्थापित हरितऊर्जा क्षेत्राच्या गती आणि प्रगतीच्या पार्श्वभूमीवर, त्याचा उपयोग कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्राचा व्यावसायिक विकास करणे, भारतीयांसाठी फलदायी व जागतिक संदर्भात नव्याने मार्गदर्शक ठरणार आहे. (लेखक एचआर व्यवस्थापक आणि सल्लागार आहेत.)



## परमार्थी स्वानंद । हरिपाठी ।।

यत्न हाच देव । मानी चिंतनात ।।
असावे कर्मात । अधिष्ठान ।।१।।

कर्माविन नाही । इच्छेस पूर्तता ।।
अंगी सतर्कता । असू द्यावी ।।२।।

अहंकार जाळी । पुण्याच्या राशीला ।।
कर्माच्या गतीला । खीळ घाली ।।३।।

सात्विक भावाने । स्फुल्लींग जागावा ।।
संसार तोलावा । संयमाने ।।४।।

कर्माविन कैसा । संसारी आनंद ।।
परमार्थी स्वानंद । हरिपाठी ।।५।।

प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
९४०३०२९१७८

## जिंदगी

वाटे कशी कुणास जिंदगी भेटे कशी कुणास जिंदगी
भेटे जशी जयास जिंदगी वाटे तशी तयास जिंदगी
दोन वेळच्या भाकरीसाठी छळे कधी कुणास जिंदगी
पक्वान्नांची भरूनी थाळी वाढे कधी कुणास जिंदगी
पंखांना नवीन बळ देतसे कधी कुठे कुणास जिंदगी
पंख छाटुनी हतबल करते कधी कुठे कुणास जिंदगी
नरका परीस भयाण भासे कधी कुठे कुणास जिंदगी
स्वर्ग स्वरुप ती सुंदर दिसे कधी कुठे कुणास जिंदगी
आयुष्याचा मधुमास खास वाटे कधी कुणास जिंदगी
जीवनाचा आभास फसवा देते कधी कुणास जिंदगी
जगण्याची वेडी आस जिंदगी जगण्याचा दृढ विश्वास जिंदगी
जीवन-मृत्यूच्या थांब्यांमधला माणसाचा आहे प्रवास जिंदगी

**गणेश पांडे**

## उपकार...

नाते आपुले प्रेमाचे खूप निभवलेस तू...
हात सोडला हातातला नि मन दुखवलेस तू...
विश्वासाने ठेचाळली नि रक्ताळली पावले
शाबूत चालावे पुढे पाहात बरे शिकवलेस तू
घास भरवला घासातला माय ममतेने हसून
कळून चुकले स्नेहाने मला चकवलेस तू...
नित्य करते विरोध माझा, भाषा तुझ्या
चेहऱ्याची मनात तरीही तुझीच ओढ
जरी फसवलेस तू...
हे तर तुझेच ऋण, तू प्रीत फुलवली माझ्यात
उपकार तुझे पाषाणातही प्राण फुंकलेस तू...
काळजी घे खुशाल राहा अखेरच्या शुभेच्छा
अविश्वासाने निर्दोष पण चंदन बाटवलेस तू

**सुनील खोडके**

कोणे एके काळी

**स्वाती काळे (कोलारकर)**

# चिरंजीवी हनुमान

गावाच्या वेशीवरचं हनुमानाचं मंदिर येणाऱ्या पांथस्ताचे स्वागत करायला नेहमीच उत्सुक असतं. मंदिर दिसल्यावर हुश्श करून विहिरीच्या पाण्याने पाय धुवावे, तोंडावर थंडगार पाण्याचा शिपका मारावा आणि हनुमानाचा जप करीत मंदिरालगतच्या पारावर निद्रादेवीच्या अधीन व्हावे. महाभारतातील कथेप्रमाणे जेव्हा देवलोकात रामावताराची तयारी सुरू झाली तेव्हा भगवान शिव म्हणतात, **'अहम् वानररूपेन संभूय पवनात्मजः सहाय्यं ते करिष्यामि ।।'** मी वायुपुत्र होऊन वानररूपात श्री विष्णूंना मदत करेल.

श्रीकृष्णाच्या बाळलीला म्हणजे आपल्या सनातन धर्माला पडलेले एक गोंडस, अवखळतं स्वप्न आहे. या बाळलीलांचं कौतुक आजही घरोघरीच्या यशोदा करतात. त्याचप्रमाणे अंजनीपुत्र बाळ हनुमानाच्या लीला बघायला अजूनही पहाटेचा सूर्य अंगणात रेंगाळत असतो. आपल्याकडे सर्वच मंदिरांमध्ये हनुमान पारंपरिक वानराच्या रूपात दाखविला जातो. पण काही संशोधकांच्या मते, किष्किंधातील आदिवासी जनतेच्या ध्वजावर वानराचे चित्र काढलेलं असायचे आणि त्यामुळे त्यांना 'वानर' या नावाने संबोधत जात असे. खरं-खोटं हनुमानालाच माहीत, पण फुगऱ्या गालाचा, हातात गदा घेतलेला वीर हनुमान बघताच सामान्यांच्याही अंगात दहा हत्तींचे बळ येतं.

रामायण आणि महाभारतात हनुमान आणि श्रीकृष्णाचे प्रथम आगमन महत्त्वाच्या घटनेत दाखवून दोघांचेही माहात्म्य सूचकपणे सांगितले आहे. रामायणात किष्किंधा कांडात रावणाने सीतेचे अपहरण केलेले आहे. सीतेला शोधण्यासाठी राम-लक्ष्मण रानोमाळ फिरत आहेत. राम-लक्ष्मण अतिशय अडचणीत असताना हनुमानाचा प्रवेश झालेला आहे. कथानकाच्या अत्यंत महत्त्वाच्या टप्प्यावर हनुमानाचे आगमन झालेले आहे. त्याचप्रमाणे महाभारतातसुद्धा द्रौपदी स्वयंवरामध्ये पहिल्यांदा आपल्याला श्रीकृष्णाचे दर्शन घडते. यानंतर दोन्ही महाकाव्यांमध्ये कथानक वेगाने सरकत जाते. प्रत्येक घटनेत या दोघांच्या हातात मुख्य सूत्रे आहेत.

हनुमानाच्या जन्माविषयी अनेक आख्यायिका आहेत. वाल्मीकि रामायणानुसार हनुमानाने स्वतःची ओळख मी केसरी आणि अंजनी यांचा वायूपासून उत्पन्न झालेला पुत्र आहे, असे सांगितले आहे. एका कथेत दुर्वास मुनींच्या शापानुसार एक अप्सरा वानर योनीत जन्म घेते आणि हीच ती हनुमानाची आई अंजनी. पण भगवान शिव तिला वर देतात की, तिचा पुत्र बलवान होईल. दुसऱ्या एका आख्यायिकेनुसार जेव्हा वरुणदेव राजा दशरथाच्या राण्यांसाठी पायस घेऊन निघाला तेव्हा त्याने हे पायसदान अंजनीलाही केले. अशा वेगवेगळ्या आख्यायिकांमध्ये हनुमानाचा वायुदेव आणि भगवान शिव यांच्याशी धागा जोडून त्याचे चिरंजीवित्व आणि दैवी शक्तिसामर्थ्य अतिशय खुबीने अधोरेखित केले आहे. हनुमानाजवळ शक्तिसामर्थ्य आहेच; त्याचबरोबर विलक्षण बुद्धिचातुर्यदेखील आहे. आणि हे बुद्धिचातुर्य महाकवी वाल्मीकिंनी छोट्या छोट्या प्रसंगांमधून अतिशय उत्कटपणे मांडले आहे. हनुमान अशोक वाटिकेत जातो आणि सीतेला न्याहाळतो.



सीतामाईंच्या अंगावर बाजुबंद, नूपुर आणि कानातली कुंडलं हे तीन अलंकार नाहीत. त्याच्या विचक्षण बुद्धिमत्तेमुळे त्याला अचूक तर्क काढता येतो की, सीतामाईंनी ऋश्यमुक पर्वतावर हे तीनच अलंकार अपहरणाच्या वेळेस खाली फेकून दिले होते आणि हे तीनच अलंकार त्यांनी परिधान केले नाही. याचा अर्थ ही स्त्री सीतामाईच असली पाहिजे. हजारो राक्षसिणींच्या मायावी गराड्यात सीतामाई बसल्या होत्या.

हनुमानाने क्षणार्धात स्वतःचे बुद्धिचातुर्य वापरून त्यांना शोधून काढले. विलक्षण प्रज्ञावंताची प्रतिभा अशी असते. किष्किंधा कांडमध्ये सुग्रीवाचा सेवक म्हणून हनुमानाची श्रीरामाशी पहिल्यांदा भेट होते. वालीने पाठवलेले मायावी राक्षस असावेत म्हणून सुग्रीव हनुमानाला तपास करण्यासाठी पाठवतो. राम आणि लक्ष्मणाला ऋषिरूपात हनुमान भेटतो आणि अतिशय नम्रतापूर्वक संभाषण करतो. त्याचे संभाषण ऐकून रामाने लक्ष्मणाजवळ जो अभिप्राय व्यक्त केला आहे तो अतिशय महत्त्वाचा आहे.

**'नानृग्वेदविनीतस्य नायजुर्वेदधारिणः । नासामवेदविदुषः शक्यमेवं विभाषितुम्।।'**

'ज्याने ऋग्वेदाचा अभ्यास केला नाही, ज्याने यजुर्वेद धारण केलेला नाही आणि जो सामवेद जाणत नाही, त्याला असे भाषण करता येणे शक्य नाही. याने संपूर्ण व्याकरण अनेक वेळा ऐकलेले आहे. कारण हा कधीही अशुद्ध बोलला नाही. मुख, नेत्र, ललाट, भिवया आणि इतरही सर्व अवयव यापैकी कोठेही याचे ठिकाणी दोष दृष्टोत्पत्तीस आला नाही. याचे अस्खलित भाषण हृदयातून निघाले आहे आणि मध्यम स्वराने युक्त आहे.'

हनुमानाच्या भाषणावरील रामाचा अभिप्राय रामाची आणि त्याचबरोबर हनुमानाचीही तीव्र बुद्धी दर्शवितो. वाल्मीकि रामायणातील श्लोक ३१ ते ३३ हे उत्कृष्ट भाषणाचे मार्मिक विवेचन आहे. हनुमानाच्या संभाषणाला ते अचूक लागू पडते. यावरून असेही लक्षात येते की, पहिल्या भेटीतच श्रीरामांनी हनुमानाचे हृदय जाणले होते आणि हनुमानानेदेखील पहिल्या भेटीतच आपल्या बुद्धीची विलक्षण चुणूक श्रीरामांना दाखवून स्वतःच्या क्षमतेचा अंदाज दिला होता. पहिल्या भेटीतच राम आणि हनुमानाचा हृदय संवाद झाला त्यामुळे श्रीरामांनी शेवटपर्यंत अतिशय गुप्त कामे हनुमानावर सोपवलेली दिसतात. रावण वधानंतर राम अयोध्येला येण्यास निघाले.

भारद्वाज मुनींच्या आश्रमात थांबले असताना त्यांनी हनुमानाला अयोध्येला जाण्यास सांगितले आणि भरतभेट घेण्यास सांगितली. आपण अयोध्येस येणार आहोत हे ऐकून भरताची काय प्रतिक्रिया होईल ते जाणून घेण्याचा प्रयत्न रामाने हनुमानाला करण्यास सांगितला. खरे तर भरत हा रामाचा सख्खा भाऊ. दोघांचे एकमेकांवर निरातिशय प्रेम. पण भरताच्या मनात काय सुरू आहे जाणून घेण्याचा प्रयत्न श्रीरामांनी हनुमानामार्फतच केला. यावरून श्रीरामांचा हनुमानावर केवढा प्रगाढ विश्वास होता हे दिसून येते. हनुमानाला उत्तम व्यवहार ज्ञानदेखील आहे. पावसाळा संपल्यानंतर शरद ऋतूमध्ये सीतेचा शोध घेण्याच्या हेतूने राम-लक्ष्मण किष्किंधा नगरीच्या बाहेर डोंगरावर राहत होते.

राजा सुग्रीव दिलेले वचन विसरून विलासात दंग झाला. तेव्हा हनुमान त्याला नम्रपणे सांगतो, 'श्रीरामाने आठवण करून देण्यापूर्वीच आपण काम केले तरच आपण काम केले असं म्हणता येईल. दुसऱ्याने आठवण करून दिल्यानंतर त्या कामाची किंमत कमी होते.' समुद्रोल्लंघन करत असताना सुरसा नावाच्या शापग्रस्त राक्षसिणीने हनुमानाला खाऊन टाकण्याचा प्रयत्न केला होता. तिला ब्रह्मदेवाने वरदान दिले होते त्याप्रमाणे ती हनुमानाला जबड्यात पकडू शकत होती. खाली समुद्राच्या लाटा आकाशापर्यंत उसळल्या होत्या. अशा परिस्थितीत हनुमानाने प्रसंगावधान राखत क्षणार्धात सूक्ष्म देह धारण केला. हनुमानाने आतमध्ये शिरून ब्रह्मदेवाचे वरदान पूर्ण केले आणि बाहेर पडून स्वतःचा जीवही वाचवला.

सुरसेच्या तावडीतून सुटून हनुमान मैनाक नावाच्या समुद्राच्या तळाशी असलेल्या अत्यंत रमणीय आणि सुगंधी पर्वतासमोर उभा राहिला. मैनाक पर्वतानेही त्याला त्याच्या अंगाखांद्यावर आराम करण्याचा आग्रह केला. पण हनुमान निर्लेप होता. त्याने फक्त आपलं मस्तक झुकवलं, मैनाक पर्वताला प्रेमाचा ओझरता स्पर्श केला आणि आपलं ध्येय गाठायला तो पुढे निघाला. लंकेत शिरल्यावर रावणाच्या अंत:पुरात हजारो स्त्रिया झोपलेल्या होत्या. त्यात सुंदर मंदोदरी देखील होती. क्षणभर हनुमानाला वाटले हीच तर सीता नाही? पण त्याने तर्कशुद्धपणे विचार केला की, श्रीरामाचा वियोग झालेला असताना सीता एवढी आरामशीर झोपूच शकत नाही. हनुमानाच्या विशुद्ध तर्कबुद्धीचे हे अतिशय उत्तम उदाहरण आहे.

इंद्रजीताने मायावी युद्ध सुरू केल्यावर राम-लक्ष्मण आणि समग्र वानरसेना मूर्च्छित झाली होती. रात्रीच्या वेळी बिभीषण युद्धभूमीवर हिंडत होता. त्याला अर्धवट शुद्धीत आणि अत्यंत जखमी अवस्थेतला जाम्बुवंत दिसला. जाम्बुवंत बिभीषणाला विचारतो, 'हे बिभीषणा! मी डोळे उघडू शकत नाही. पण मला एकच गोष्ट सांगा की, वायुपुत्र हनुमान सुरक्षित आहे का?' जाम्बुवानाने रामाबद्दल काहीही विचारलेलं नाही. लक्ष्मणाबद्दल विचारलं नाही. त्याला फक्त हनुमानाच्या जिवंत असण्याची खात्री पाहिजे होती.

बिभीषणाला अतिशय आश्चर्य वाटले. पुन्हा जाम्बुवान म्हणाला, 'हनुमान जर सुरक्षित असतील तर संपूर्ण सैन्य जरी मृत पावलं असेल तरी ते पुन्हा सजीव होऊ शकेल पण जर हनुमान मृत्यू पावले असतील तर आपण सर्वजण जिवंत असू पण तरी शत्रूच्या दृष्टीने मेल्यासारखेच असू. कारण हनुमान असतील तरच आपल्याला सर्वांना संजीवनी मिळेल.'

जाम्बुवानाच्या म्हणण्यात सत्यता होती. कैलास शिखराजवळच्या चार उत्तम औषधी हनुमानास आणण्यास जाम्बुवानाने सांगितले. या चार वनस्पतींमध्ये मृत संजीवनी नावाची एक वनस्पती होती; जी माणसांना जिवंत करू शकायची. वनस्पतींमध्ये जीव असतो म्हणतात. या सर्व वनस्पती तर दैवी वनस्पती होत्या. या अद्भुत वनस्पतींना भीती वाटते की, हनुमान येतील आणि आपल्याला ओरबाडून कैलास पर्वतावरून घेऊन जातील. त्यामुळे त्या अदृश्य झाल्या. जेव्हा हनुमानाने बघितलं तेव्हा त्याने सबंध पर्वत शिखर भूमीपासून वेगळं केलं आणि आपल्या तळव्यावर उचलून तो युद्धभूमीवर घेऊन आला.

हनुमान वनस्पतींना ओळखू शकले नाही किंवा त्यांची नावे विसरले असा उल्लेख वाल्मीकि रामायणात नाही. हनुमानाची प्रतिभा आणि बुद्धिचातुर्य अलौकिक आहे. असे असताना चार वनस्पतींची नावे तो कसा विसरेल?

रावणाच्या पराभवानंतर सीतामाईंना घेऊन येण्याचे सर्वात आनंददायी काम श्रीरामांनी हनुमानावरच सोपवलं होतं. जेव्हा सीतामाईला अग्निदिव्य करण्यास सांगितले जाते तेव्हा हनुमानाचे अबोल दुःख श्रीरामापर्यंत पोहोचतेच. पण अथपासून इतिपर्यंत हनुमानाने आपला सेवक धर्म नेहमीच निष्ठेने सांभाळला आहे. श्रीरामांच्या राज्याभिषेकाच्या वेळी सप्त नद्यांचे आणि महासागराचे पाणी आणण्याचे कामही हनुमानानेच केले. प्रत्येकाने श्रीरामाकडे काहीतरी मागितलं. प्रत्येकाला श्रीरामाने काहीतरी दिलं. हनुमान मात्र म्हणाला, 'आपल्या प्रती असलेला माझ्या मनीचा भक्तिभाव सदैव राहू द्या. हीच एकमेव इच्छा आहे.' आणि हीच एकमेव इच्छा हनुमानाच्या जनामनातील चिरंजीवित्वाचे अद्भुत रहस्य आहे.

ऋतूरंग.....
किरण डोंगरदिवे
भ्र. ७५८८५६५५७६

# झिम्माड पावसाच्या वेल्हाळ आठवणींच कोंदण

आमच्या लहानपणी खरे तर पावसाच रंग रूप खरोखर आजच्यापेक्षा वेगळ होत. काळ्याकुट्ट ढगांची गर्दी आकाशात जमून शेतीमातीच्या मायेने तो लगेच पाझरायचा आणि मातीमध्ये कस्तुरीचा गंध पेरून सारा असमंत प्रसन्न करायचा. झाडांच्या पानापानावर मोती होऊन हसायचा. शेतीमधल्या मातीमधून सोन होऊन फुलायचा. तो पाऊस खरोखर आपला होता, जो आजवर मी मनात जपला होता, घरापासून शाळेपर्यंत जाण्याच्या रस्त्यामध्ये दहा ओहळ आणि झरे रस्त्यातून ओसांडूल वाहायचे आणि लगेच अंगावरचे कपडे भिजेपर्यंत लेकरांनी त्यात डुंबायच ह्यातील मजा ज्यांनी अनुभवली त्यांनाच खरा पाऊस कळला, असं वाटावं इतकं रम्य अस ते बालपण होत, त्याहूनही अल्हाददायक असा तो पाऊस होता.

पुरुषभर डोहामध्ये किंवा वाहत्या नदीमध्ये पोहायला शिकायला गेल्यावर चुकून एखादी गटांगळी खाल्ली तर माणसांनी गच्च भरलेल्या घरात आल्यावर माणसं ज्या आपुलकीन चौकशी करत त्या चौकशीतील आपलेपणाची सर वॉटर पार्कमध्ये गटांगळ्या खाल्ल्यावर सांगितलेल्या कौतुकाच्या गप्पांमध्ये येत नाही. म्हणूनच कधी तरी म्हणावसं वाटतं की, झिम्माड झिम्म कधी रिमझिम रिमझिम, मनाचे अंगण ओलेचिंब हो ओलेचिंब, पण तो रिमझिम आणि झिम्माड पाऊस मनाचे अंगण ओलेचिंब करायला आज धावत येत असला तरीपण मनाच्या अंगणात पाऊस मावत नाही कारण आमच्या मनाची कवाड आम्ही बंद करून ठेवली आहेत. घराच अंगण डोळ्यांनी दिसत नाही कारण अशी परिस्थिती आज आपल्या जीवनात दिसून येते आहे.

थेंबांचे मोती टिपूनीया अंगावर सारे, निल मोत्यांचे झालेत मोराचे पिसारे, सात रंगाचा टांगलाय आभाळी झुला, इंद्रधनुच्या झोक्यावर झुलायला चला... पाऊस आल्यावर थुई थुई नाचणारा मोर, ऊन पावसाच्या खेळात अर्ध्या आभाळात अल्हाददायक वाटणारी इंद्रधनुष्याची कमान, बगळ्यांचे थवे आणि बगळ्या बगळ्या दूध दे पाची बोटे रंगू दे असा निरागस बालगीतातील हट्ट आजही आठवत राहतो आणि हे जीवन हे बालपण ह्यापासून आमची भावी पिढी अनभिज्ञ आहे याची खंत मनाला वाटत राहते. मात्र, मनात अजूनही हिरव्या स्वप्नाची गर्दी असते. फुलून येतील आता सारी ओसाड राने, पानाआड कोकीळ गाईल सूरात गाणे... ओसाड माळराने फुलावेत झाडाच्या पानाआड लपून कोकीळ पक्षाने गाणे झाले असे स्वप्न आता शहरी भागात दुरापास्त होत असले तरी खेड्यातून मात्र अजूनही हे स्वप्न सजीव आहे याचे समाधान आहे. होय, आज खेडे सुद्धा शहरीकरणाकडे वळले आहे.

गुराच्या मागे बासरी घेऊन जाणारा गुराखी पाहता पाहता हातामध्ये मोबाईल घेऊन कसा जाऊ लागला, याचा आपण विचार करू शकत नाही. पण तरीही शहरातील यांत्रिकतेपेक्षा आणि कृत्रिम प्रेमापेक्षा गाव खेड्यामध्ये अजूनही मायेचा ओलावा आणि नात्यातील आपुलकी आहे. अजून जीवनाचे सर्व पैलू पूर्णपणे ओसाड झाले नाही याची खात्री खेड्यात गेल्यावरच पटते.

आला झिम्माड पाऊस भरल्या डोहात तरंग, चिंब भिजल्या किनार्याचे गर्द हिरवे ओले रंग, आला झिम्माड पाऊस चिंब पाखरांचे थवे, ओल्या ऋतूत गुंतले शब्द माझे जूने नवे... भूतकाळ असो की वर्तमान काळ असो किंवा येणारा भविष्यकाळ असून पाऊस नेहमीच कवीच्या कवितांचा विषय झालेला आहे. शहरात पडणारा असो की, खेड्यामध्ये किंवा माळ रानावर कोसळणारा झिम्माड पाऊस असो. या पावसाचे अनेक संदर्भ शब्दरुपात ओल्या ऋतूमध्ये गुंतलेले असतात आणि म्हणूनच ओलसर दहीवरात शब्दांचे गहिवर दाटून येतात. वसंत ऋतू जितका प्रेमीकाच्या आवडीचा तितकाच पाऊसही म्हणूनच कधीतरी आपल्या सखीला विसर विसर विसरणारा प्रियकर सखीला का विसरू शकत नाही याचे खापर पावसावर फोडून मोकळा होतो आणि म्हणतो, तसे मी तुला विसरण्याचे धुंडतच असतो लाख बहाणे, पण आवर्जून आठवते बघ पावसाचे ओलेचिंब गाणे, नाही म्हंटल तरी थोडा वारा चिमटीत धरून ठेवला, तुझ्या श्वासाच्या सुगंधा ऐवढा पाऊस जपून ठेवलाय... तिच्या श्वासाच्या सुगंधा एवढा पाऊस जपून ठेवला इतकी अलवार भावना पावसात चिंब भिजल्यावर येते की, प्रेमात आकंठ बुडल्यावर येते हे सांगणे कठीण आहे. मात्र, कालिदासाच्यां मेघदूतमपासून हा पाऊस प्रेमिकांचा सोबती झाला आहे. हिंदी मराठी सिनेमा सृष्टीतील गीताने त्याला आणखी विलोभनीय रूप दिले आहे. हा हळवेपणा पावसाच्या पाण्याप्रमाणे पानातून झरत असतो आणि प्रेमिकांचे मन जाणून ढग दुःखावेगाने रडत असतो असेही कधी कधी वाटते. पावसाच्या प्रेमाची ही एक बाजू झाली, की तिला दुःखाची किनार आहे ज्यात अधिकांश बघावं तर विरह आहे वेदना आहे. मात्र कधीकधी हाच पाऊस प्रेमिकांसाठी मरगळ झटकणारा ऋतू म्हणून प्रसन्नतेने हसत सामोरा येतो आणि आपोआपच कविता सुचते, पाऊस तुझ्या अंगावर नव्याने होतो नितळ, तू हसलीस की ह्या मनाची झटकतो मरगळ... पावसाचे पाणी मुळातच नितळ असतं, आता वाढत्या प्रदूषणामुळे किंचित वेळा रासायनिक अंश असलेला पाऊस पडतोय म्हणे पण एरवी पाऊस नितळ असतो. तो सखीच्या अंगावर पडला की आणखी नितळ होणार ह्या संकल्पनातून तिच्या रूपाचे वेगळे वर्णन करण्याची गरज नसून ती सौंदर्य साम्राज्ञी किती सूंदर आहे हे आपोआप कळून येते. अशा प्रसन्न आणि स्वच्छ मनाने पावसात दिवस-रात्र भिजले तरी पावसाच्या या अगणित धारा अंगावर सातत्याने मारा करत असल्या तरी तो मार हवाहवासा वाटतो. पावसाच्या माराचा कितीही भडीमार झाला तरी पावसाचा मार वेदनादायक नसतो.



कधी
रिमझिम कधी झिम्माड पाऊस, उघडतो मनाचे कवाड, मनाच्या कप्प्यात इंद्रधनुचे रंग, मन ओथंबलेले जरी कोरडे अंग, देतो चिंब भिजलेले क्षण काही, पावसा जवळ दुसरे धन नाही... पावसाच्या आठवणी आणि पावसाचे संदर्भ आठवले की मन पाहता पाहता जीवनातील अनेक आठवणीच्या संदर्भाचा पाठलाग सुरू करत.

पावसाचे अंगभर घाव तरी दिसत नाहीत वळ, झिम्माड बरसला तरी कायम मनावरच मभळ, कोणतेच झाड लावत नाही पावसाविरुद्ध बळ, गुमान झेलून धारा म्हणते पावसा पुन्हा कोसळ...

पावसाचे लाखो करोडो थेंब पानावर झेलून पावसाचा मारा सहन करणारे झाड कधीही पावसाविरुद्ध बळ लावत नाही. त्याला तो पाऊस कायमस्वरूपी हवा असतो. खरे तर तो पाऊस सर्वच सजीवांना आवश्यक असतो, मात्र माणूस नावाचा स्वार्थी प्राणी पावसाविरुद्ध बळ लावण्यासाठी वृक्षतोड करतो आणि पावसातला जमिनीवर येण्यास मनाई हुकुम जारी करतो. पुढे हा पाऊस आला नाही तर सर्वाधिक हाल होतात ते माणूस नावाच्या प्राण्याचेच हेही माणसाने लक्षात ठेवले पाहिजे.

पावसाच्या मस्तीत खेळले पाहिजे लोळले पाहिजे, सखीच्या डोळ्यातील तगमग समजून घेतली पाहिजे. कारण पावसामध्ये ज्यांना भिजता येत नाही, ज्यांना पावसाचा आनंद घेता येत नाही ते मनातून फार कोरडे आणि दुःखी असतात. सळसळणार्या वार्याचा आणि कोसळणार्या पाण्याचा त्यांना मोह होतं नाही. एरवी संपूर्ण चराचराचे अस्तित्व नाकारणारा, ईश्वराला नाकारणारा नास्तिक सुद्धा जर कधी एखादा नवस बोलेल आणि काही मागेल तर पावसाचा ओलसरपणा आणि राधे सारखी प्रेम करणारी प्रेमिका आपल्या जीवनात असली पाहिजे असेच मागेल असे मला वाटते. या ठिकाणी ईश्वर म्हणजे निसर्ग असे गृहीत धरले तर सर्वांसाठी विचार करणे सोपे होते. अशाच निसर्गाच्या एका रूपाकडे पाहून म्हणावे वाटते. हे दुःख त्या मोरांचे ज्यांना नाचता येईना पावसात, राधेची ओली फुकर मागतो नास्तिक त्याच्या नवसात... असा हा पाऊस बालपणीच्या रम्य आठवणीत घेऊन जातो तर कधी भारावलेल्या तारुण्याच्या अलवार आणि वेल्हाळ पाऊस ओल्या आठवणीचे सारे कपडे उघडून देतो. मात्र कधी कधी हा पाऊस वास्तव्याच्या चटक्यातील दाहकता दर्शविणार असतो.

आजकाल पाऊस फार लहरी झाला आहे. त्याचा हा लहरी स्वभाव बळीराजाच्या जीवावर उठला आहे. म्हणूनच हा बळीराजा आकाशाकडे डोळे लावून बसतो आणि महाराष्ट्राचे आराध्य दैवत विठ्ठलाकडे साकडे घालत म्हणतो... आभाळातून थेंब नाही डोळ्यात साचले पाणी, ऐकू दे विठ्ठला..ओल्या थेंबांची पाऊसगाणी, भेगाळलेल्या मातीमायला वांझपणाचे दूषण का रे? जर बापपण विसरून आभाळच विसरलं पाऊसपाणी... पाऊस येत नाही त्याच दुःख मनात दाटून डोळ्यात पाणी साचत, विठ्ठलाजवळ ओल्या थेंबाच्या पाऊस गाण्याची मागणी केली जाते. आभाळ बापपण विसरून बरसायचे विसरले हा दोष बापाचा... त्यासाठी मातीला वांझपणाचे दुषन देऊ नये अशी अपेक्षासुद्धा हा शेतकरी व्यक्त करतो. यावरून त्याच्या मनात मातीबद्दल किती प्रेम आहे हे दिसून येते.

हा शेतकरी बाप मातीच्या कणाकणातून सोन्याचे पीक घेण्याचा विचार करत असताना भावी पिढीने मात्र शिक्षण घेऊन शेतीमातीच्या नात्यांपासून कशी फारकत घेतली आहे. ते चित्र फार विशाल न करणार असतं. जरी मातीपासून फारकत घेतली तरी त्याच मातीमुळे त्याचे जीवनमान कसे सुधारले आहे. तो खेड्याकडे आणि कृषी संस्कृतीकडे पाठ फिरवून कसा निघून गेला आहे. आपण मेहनत केल्यावर त्या मेहनतीमधील मिळकतीवर हक्क सांगण्यासाठी का होईना पण आपल्या लेकराने आपल्या दारात आपल्या भेटीसाठी आले पाहिजे, असे असे सांगणारा उदात्त मनाचा एक शेतकरी मला भेटला आणि त्यावरून मला दोन ओळी सुचल्या आणि मी माझा स्वतः शहारून गेलो... एकरभर विकून, शहरात मास्तर झालंय पोरगं, हिस्सा मागायला खळ्यावर तरी येऊ दे राजावाणी... शेतमालावर हिस्सा मागण्याच्या निमित्ताने भांडायला आला तरी मुलाचे दर्शन आपल्याला होईल. त्याच्यासोबत जर नातू आला तर नातवाचा कोड कौतुक करता येईल, अशा मानसिकतेत आज खेड्यापाड्यात माझा बळीराजा जितक्या आतुरतेने पावसाची वाट पाहतो आहे. तितक्याच आतुरतेने स्वतःच्या लेकरांची वाट पाहत आहे. मृग नक्षत्र संपले की आषाढी एकादशी समोर दिसत असते.

(पान ६ वर)

पान १ वरून

## भारतीय निर्यातीच्या नव्या वाटा...

वस्त्रोद्योगाला याची झळ बसणार असली, तरी पर्यायी बाजारपेठ उपलब्ध झाल्याने त्याची तीव्रता काही अंशी कमी होईल, असे मानले जाते. जागतिक पुरवठा साखळीत 'चीन+१' या धोरणामुळे भारताचे स्थान मोलाचे आहे. त्या स्थानाला आज तरी कोणताही धोका नाही. 'स्टेट बँक ऑफ इंडिया'च्या अहवालानुसार, रासायनिक सामग्री, वस्त्र, कृषी यांसारख्या क्षेत्रात निर्यात वाढीची प्रचंड संधी असून, 'ब्रॅण्ड इंडिया' यातूनच पुढे येऊ शकतो. भारताला आयातशुल्काच्या संकटाला सामोरे जावे लागत असले, तरी त्यातूनच उद्योजकत्व आणि धोरणात्मक लवचिकतेच्या माध्यमातून नव्या संधी भारतीय उद्योगांसाठी निर्माण होणार आहेत. सरकारने स्थापन केलेली उच्चस्तरीय समिती ही केवळ आत्मसंरक्षणासाठी नाही, तर दीर्घकालीन निर्यातशक्ती वाढवण्यासाठी काम करणार आहे. या समितीच्या योजना प्रत्यक्षात आल्या, तर येत्या काळात भारत हा दोन ट्रिलियन निर्यातीचा देश म्हणून जागतिक पटलावर उदयास येणार आहे.

पान १ वरून

## पाकच्या पोकळ वल्गना

हे काम भारत शांतपणे, नियोजनबद्धपणे करत आहे. पण, जर पाकिस्तानने धमया देण्याचा सूर चालूच ठेवला, तर जागतिक मंचावर भारतालाही आपली भूमिका ठामपणे मांडावी लागेल. सिंधू करारावर संकट आले, तर त्याचा परिणाम पाकिस्तानच्या प्रत्येक शेतकरी, नागरिकावर होईल. भारताला धमकी देऊन अंतर्गत समस्या सुटत नाहीत, हा धडा पाकिस्तानने अजूनही शिकलेला नाही. भारताने संयम दाखवून विकासाचा मार्ग निवडला आहे. जलव्यवस्थापन, शेतीसुधारणा, पायाभूत सुविधा, विज्ञान-तंत्रज्ञान या सर्व क्षेत्रांत भारताने सातत्याने गुंतवणूक केली, त्यामुळेच आज भारत आत्मविश्वासाने वाटचाल करत आहे. लवकरच तो जगातील तिसरी सर्वांत मोठी अर्थव्यवस्था म्हणूनही ओळखला जाईल, यात कोणतीही शंका नाही.

पान १ वरून

## भाऊ सापडायला लागले!

विधानसभा निवडणुकीपूर्वी दिल्लीमध्ये दोन जणांनी पवारांना महाराष्ट्रात १६० जागा हमखास जिंकून देण्याची ऑफर दिली होती, असा त्यांचा दावा. तसेच, पवारांनी या दोघांना राहुल गांधी यांच्याकडे पाठवल्याचे त्यांनी माध्यम प्रतिनिधींना सांगितले आहे. म्हणजेच, या हमखास १६० साठी पवारांची तयारी होती तथापि, त्याबाबतचा 'इंडी' आघाडीचे सर्वाधिकार राहुल यांच्याकडे होते, म्हणून या दोघांना त्यांच्याकडे पाठवले का? हा प्रश्न. आम्ही असल्या उपायांचा अवलंब करणार नाही, जनतेच्या न्यायालयात आम्ही जाऊ या सगळ्या प्रतिमा उजळण्यासाठीच्या केलेल्या गप्पा. संविधानाचा हवाला देणारे हे नेते, त्यावेळी लगेचच व्यक्त का झाले नाहीत? त्यांनी कायदेशीर मार्गाने हा गैरप्रकार थांबवण्याचा प्रयत्न का केला नाही? असे पवार आणि कंपनीला अडचणीत आणणारे प्रश्न आपण त्यांना विचारायचे नाहीत. एकदा निवडणुकांचे वारे वाहू लागले की, पवारांच्या कल्पनाशक्तीला धुमारे फुटतात असे म्हटले, तर त्यात काही चुकीचे ठरणार नाही. तसेच, वयाने ते सर्वांत ज्येष्ठ असले, तरी 'इंडी' आघाडीची सारी निर्णय प्रक्रिया राहुल यांच्या हातातच असल्याचीही कबुली पवार यांनी स्वत:च त्यांच्या कथनातून दिली आहे.

बिहारमध्ये ज्या पद्धतीने निवडणूक आयोगाने ४० लाख मतदार मतदारयादीतून कमी केले, त्यामुळे 'इंडी' आघाडीचे धाबे दणाणले. देशातील मतदारसंख्या ही सातत्याने बदलत असते, याद्या त्यानुसार बदलण्याची गरज तीव्र झाली आहे. २००४ सालापासून महाराष्ट्रात मतदारसंख्येत सातत्याने वाढ होत आहे. ही वाढ नैसर्गिक असून, नवीन मतदारांची पडणारी भर, स्थलांतर, मृत्यू व इतर कारणांमुळे मतदारांची संख्या ही बदलतेच. मात्र, विरोधक या स्वाभाविक बदलालाच संशयास्पद असे म्हणत, जनतेच्या मनात शंका पेरण्याचे पाप करत आहेत. तथापि, हे आरोप सिद्ध करण्यासाठीचे ठोस पुरावे नसतील, तर ती फक्त राजकीय शेरेबाजी ठरते. राहुल गांधी हे अपघाताने झालेले विरोधी पक्षनेते आहेत. लोकसभा निवडणुकीवेळी भाजपचा ७४ जागांवर निसटच्या मतांनी पराभव झाला आणि त्या जागा काँग्रेसला मिळाल्या. 'व्होट जिहाद'ही त्याला कारणीभूत होता. म्हणूनच, २०१४ आणि २०१९ सालामधील काँग्रेसचे अपयश काही अंशी धुवून निघाले आणि विरोधी पक्षनेतेपदी त्यांची वर्णी लागली. शरद पवार हे तर साडे तीन जिल्ह्यांचेच नेते. आता तर अजित पवारांमुळे त्यांचे तेवढेही अस्तित्व आहे का? हा निराळाच प्रश्न. 'मविआ'तील उद्धव ठाकरे हे तर जनादेशाचा अनादर करत, महाराष्ट्रावर लादले गेलेले मुख्यमंत्री. त्यांचे प्रवक्ते संजय राऊत यांनी तर संपूर्ण शिल्लक राहिलेली सेनाच, थोरल्या पवारांच्या दावणीला नेऊन बांधली. म्हणूनच, शरद पवारांनी जेव्हा दोन माणसांची आणि १६० जागांची पुडी सोडली, तेव्हा ती बाब खरी असल्याचा साक्षात्कार संजय राऊत यांना झाला. राजकारणात आरोप करणे हे फार सोपे आहे. मात्र, ते खोटे ठरल्यास कायदेशीर परिणाम भोगावे लागू शकतात. म्हणूनच, शपथपत्रावर सही करण्यापासून पळ काढण्याकडे या नेत्यांचा कल असतो. मध्यंतरी अरविंद केजरीवाल यांना म्हणूनच डझनाने माफीनामे सादर करावे लागले होते. राहुल यांच्याविरोधातही देशभरातील न्यायालयात अनेक खटले दाखल असून, ते तेथे माफी मागताना दिसून येत आहेत. निवडणूक आयोगाने 'मतचोरी' संदर्भात त्यांना तातडीने प्रतिज्ञापत्र सादर करायला सांगितले असता, संविधानाचा दाखला देत त्यांनी त्यापासून पळ काढला आहे. लोकशाहीत निवडणूक आयोगासारख्या संस्थांची भूमिका निर्णायक आहे आणि त्यांच्यावर जनतेचा विश्वास आहे. त्यामुळे कोणताही आरोप केला, तर तो पुराव्यांसह आणि प्रक्रियेच्या नियमांनुसारच केला गेला पाहिजे. विरोधकांना हेही ठाऊक आहे की, डेटा-तज्ज्ञ, निवडणूक विश्लेषक असे दावे तपासून, त्यांच्या आरोपातील सत्य उजेडात आणू शकतात. त्यामुळे, 'मतचोरी' मोहिमेपासून ते शरद पवारांच्या १६० जागांच्या कथांपर्यंत जनतेने एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे आणि ती म्हणजे, आरोप करणे सोपे आहे तथापि, त्याचे पुरावे देणे ही मोठी बाब आहे. निवडणूक आयोगासारख्या संस्थांचा मान राखत, त्यांच्या प्रक्रियेत सहकार्य हे केलेच पाहिजे. पानिपतच्या लढाईनंतर एकाएकी अनेक भाऊ सापडू लागल्याची परिस्थिती महाराष्ट्रात उद्भवली होती. इंडी आघाडीची अवस्थाही तशीच आहे.

कथा
डॉ. चंद्रगुप्त वर्णेकर

## स्वसंवाद

नदीच्या पाण्याच्या मंद लहरी आणि त्यात वाऱ्याची एखादी झुळूक गारवा देऊन जायची. समिधा मात्र काठावर बसून पाण्यात दगड मारत उदास, खिन्न होऊन शून्यात बघत होती. खरं तर सांजवेळ झाली होती; तरीही तिला घरी जाण्याची इच्छा होत नव्हती, समिधा, सोहम, स्वराज आणि स्मृती असं हे छान कुटुंब. हल्लीच सासू-सासरे राहायला आले होते गावाकडून. समिधाचं अगदी छान पटायचं दोघांशी, पण अचानक काय झालं कोणास ठाऊक, समिधाशी वागण्याची त्यांची पद्धत बदलली.

सोहमही वेगळाच वागायला लागला होता. मुलं बिचारी लहान होती, पण तेही जवळ येत नव्हती. स्मृती एक दोन-वेळा म्हणाली, ''आई, तुला बरं नाही का? आपण दवाखान्यात जाऊ.'' काय झालंय नेमकं काहीच कळत नव्हतं. आईबाबा ठीक आहे. माहीत नाही, पण काहीतरी चुकून बोलून गेली असेल. त्यामुळे दुखावले असतील कदाचित. पण सोहम ला काय झालंय? हल्ली कोणीच माझ्यासाठी जेवायला पण थांबायचे नाही. सोहम लवकर यायचा. तो आला की, यांची जेवणं झालेली असायची. शेवटी एक दिवस ऑफिसमधून येता येता ठरवलं, आज विचारायचंच. नेहमीप्रमाणे जेवण झालेली. आई-बाबा त्यांच्या खोलीत. मुलं आपापल्या खोलीत खेळत होती. सोहमचं ऑफिसचं काम चाललेलं होतं. न राहवून समिधा खोलीत गेली आणि विचारलंच,''सोहम काय झालंय?'' ''मला काय झालंय, मी बरा आहे'' ''तुला नाही, मला काय झालंय?''

''ते तुलाच माहीत.'' ''नाही, तू सांग. का असे वागता आहे तुम्ही माझ्याशी?'' ''तुझ्या मनाला विचार.'' ''हजार वेळा विचारलं, उत्तर नाही मिळतं आहे. आता खूप झालं सोहम. मला कारण हवंय.'' दोघांचेही आवाज वाढले. मुलं, आई-बाबा धावत आले. आई म्हणाल्या, ''त्याला काय विचारते, मी सांगते. पागल आहेस तू. मनोरुग्ण आहेस.'' ''काय बोलताहात आई तुम्ही! अहो नोकरी करते मी बँकेत. एका मनोरुग्णाला कसे ठेवतील ते, एकऽऽ मिनिटऽऽऽ म्हणून मला स्मृती म्हणाली का डॉक्टरकडे जाऊ?'' ''हो. मग जास्त झालं तर जावंच लागेल.'' सासूबाई.

''अरे पण असं काही नाही आहे, मी काय केलंय असं.'' ''अगं मनाशीच बोलत असते तू. हसते काय, गाणे म्हणते, स्वतः ला चक्क समिधा म्हणते. हा वेडेपणा नाही?'' सोहम बोलला. समिधाला आता हसावं की रडावं हेच कळत नव्हतं. तिला खरं तर नवल वाटलं, सोहम एमबीए होऊन नामवंत कंपनीत आहे. सासूबाई शिक्षिका अन् सासरे कृषी अधिकारी; तरी यांचे विचार...'' समिधा त्यांना समजावते, ''अरे त्याला मनोरुग्ण म्हणत नाहीत. ती एक पद्धत असते स्वतःला समजण्याची, समजावून सांगण्याची.'' ''हे बघ समिधा, आम्हाला काही सांगू नको. असं काही नसतं. काल तर चक्क तू म्हणत होती- 'समिधा शांत हो, शांत हो. घाबरू नको.'' ''हो आई. कारण काल ऑफिसमधून आल्यावर माझा जीव घाबरत होता म्हणून मी स्वतःला समजावत होती.'' ''आणि ते काय, जेव्हा तू स्वतःलाच हे ब्युटीफुल गर्ल म्हणते, स्वतःशीच बोलत असते. सतत काम करताना तू हे करू शकतेस, नो प्रॉब्लेम म्हणत असते, तेव्हा.'' सोहम.

''अरे, मी स्वतःचा आत्मविश्वास वाढावा म्हणून असं म्हणते. ''इतक्या मोठ्याने बोलत असते की, कोणालाही वाटेल तू वेडी आहेस. अगदी खोलीत बसली असली तरी आम्हाला बाहेर आवाज येतो.'' सोहम. इतक्या वेळ शांत असणारे बाबा आता बोलायला लागले, ''काही बाहेरचं वगैरे नसेल नं गं.'' ''बाबा, आपण तिला सायकेट्रिस्टकडे घेऊन जाऊ.'' ''काही काय सोहम, काही झालं नाही मला. मी ओके आहे एकदम.'' ''हे बघ समिधा, तू काळजी करू नको, होईल सगळं नीट आणि हे खूप दिवस झाले, आम्ही बघतो आहे. आता आम्हाला तुझी भीती वाटायला लागली आहे.'' समिधाला कळतच नव्हतं काय करावं, कसं समजवावं यांना? सासूबाई तर भूत बघितल्यासारख्या तिच्याकडे बघत होत्या. त्यामुळेच घरात कोणी नीट बोलत नव्हतं, वागत नव्हतं. एक दिवस समिधा एकटी खोलीत बसली होती. अचानक रडू यायला लागलं. छातीत दुखायला लागलं. काहीतरी गंभीर होण्याची चाहूल तिला लागली, तेव्हा छोट्या चिमुकल्यांचे चेहरे डोळ्यासमोर आले आणि ती स्वतःला समजवायला लागली, 'समिधा शांत हो. असा धीर सोडू नकोस. हे बघ, होईल सगळं नीट. आपण समजावू त्यांना, त्यांचं प्रेम आहे तुझ्यावर, म्हणून कदाचित असं वागत असतील ते काळजीपोटी' आणि तिची नजर खोलीच्या बाहेर गेली. तिने स्वतःला आवरलं, नको बाई आता स्वतःशी बोलायला. नाही तर अजून मला वेड्यात काढतील. मी खरंच मनोरुग्ण आहे का? या विचाराने ती सुन्न झाली. यातून बाहेर पडावं लागेल त्यासाठी आधी घरातून बाहेर पडू. कुठेतरी निवांत बसू, असा विचार करून ती घराबाहेर निघाली. चालत चालत नदीकिनारी आली आणि शांतपणे पाण्यात दगड मारत बसली. त्या प्रत्येक दगडासोबत तिच्या काही आठवणी जाग्या झाल्या. दहा वर्षांपूर्वी ती लग्न करून आलेली. सोहम फक्त आठ दिवस तिच्या सोबत राहिला. नंतर कामाच्या निमित्ताने सतत बाहेरगावी. सासू-सासरे नंतर पंधरा दिवस राहिले, तेही परत गेले. समिधा एकटीच असायची. दिवस तर ऑफिसमध्ये जायचा, पण रात्र खायला उठायची. त्यात सुट्टी असली की विचारूच नका. मग काय दिवसभर तिचा तिच्याशीच स्वसंवाद. त्यात सोहमच्या कंपनीचं आणि सुट्ट्यांचं फारच वाकडं. त्यामुळे तो फार कमी घरी असायचा. त्यात मुलं उशिरा झाली. आताशा तीन वर्षांची होती तिची जुळी मुले स्मृती आणि स्वराज. बरं, लग्नाच्या आधीही आईवडिलांना एकुलती एक असल्यामुळे भावंड नाही. मित्र-मैत्रिणी नाही. आज ती बँकेत मोठ्या पदावर कार्यरत आहे. पण आता हे काय भलतंच! खरं तर स्वतःशी बोलण्याची तिची लहानपणापासूनची सवय, पण असं कधी कोणी म्हणालं नाही.



एक-दोन वेळा बिल्डिंगमधल्या बायका विचारत होत्या ''कोणी आलं होतं का? नाही, आवाज येत होता बोलण्याचा!'' त्या पलीकडे कधी असा प्रश्न नाही आला. बरं, एरवी बुद्धीने चाणाक्ष असणारी समिधा सगळं छान करायची. स्वयंपाक, विणकाम, रांगोळी यात तिचा हातखंडा होता. ऑफिसमध्ये पण सगळे तिच्या कामाचं कौतुक करायचे. आणि यांना आता माझा प्रॉब्लेम कळला; मुळात जो प्रॉब्लेमच नाही. आतापर्यंत काय करत होता हा? कधी वेळ मिळाला याला बायकोशी बसून निवांत बोलायला आणि आता मला मनोरुग्ण ठरवण्याचा याला काय अधिकार आहे? विचार करीत खूप वेळ ती नदीच्या काठावर बसून होती. इकडे सोहम व घरच्यांची चौकशी सुरू झाली? नातेवाईकांना फोन सुरू झाले. त्यांच्या दृष्टीने मनोरुग्ण असणारी समिधा जिवाचं काही करून घेईल, याची भीती त्यांना होती, अर्थात काळजी पण होतीच. समिधाला अचानक तिच्या लांबच्या बहिणीची आठवण झाली. ती सायकेट्रिक होती.

(पान ६ वर)

प्रबंधांची बीजे

श्रीरंग हिर्लेकर

# आमुच्या वाटे नका जाऊ, नये वाटे तुम्हा लाऊ



'त्याग' आणि 'कर्तव्यपूर्ती' ही श्रीरामायणाने शिकविलेली शाश्वत मूल्ये आहेत. 'रघुकुल रीती सदा चली आयी। प्राण जाय पर वचन न जाई' हा रघुवंशाचा बाणा होता. रामचंद्र हे भगवान श्रीविष्णूंचे अवतार होते, अशी आपली मान्यता आहे; नव्हे विश्वास आहे. ज्याचे स्वर्गातून पृथ्वीवर मानवरूपात अवतरण होते त्याला 'अवतार' म्हणतात. आपल्या दररोजच्या व्यवहारात या राम अवताराचे स्मरण केलेच पाहिजे. प्रभूंना आपण परमेश्वराचा अवतार मानतो. का घ्यावा लागला रामाला अवतार? प्रभूंनी स्वतः सांगितले आहे की, 'मी दशरथाचा पुत्र राम आहे. मी मानव आहे. मी मानव धर्माच्या रक्षणासाठी मी अवतार घेतलेला आहे.' वाल्मीकि रामायणाच्याअरण्यकांडात एक श्लोक आहे-

**'किन्नुवक्ष्याम्यहं देवी त्वयैवोक्त मिदं वच। क्षत्रियैर्धार्यते चापो नार्तशब्दो भवेदिती।। अप्यहं जीवितं जह्याम् त्वां वा सति सलक्ष्मणां। न तुं प्रतिज्ञा संश्रुत्य ब्राह्मणेभ्यो विशेषतः।।'**

'आपण सध्या तापसी वेषात आहोत. तेव्हा तापस वेषात शस्त्रे का धारण करता?' असे एका प्रसंगात सीतेने रामाला विचारले; त्यावर 'तापसी वेषात असलो, तरी मी प्रथमतः क्षत्रीय आहे. क्षात्रधर्म हा माझा प्रथम धर्म आहे. मानव धर्म आणि सज्जनरक्षणासाठीच मी, ही शस्त्रे धारण केली आहेत.' हे प्रभुरामचंद्रांनी भगवती सीतेला दिलेले उत्तर आहे.

राम पुढे असेही म्हणाले की, 'माझ्या वचनांचे मी काटेकोरपणे पालन करीन.' राम हा मानव धर्माच्या रक्षणास अवतार घेता झाला, त्यासाठीच जन्माला आला अशी त्याची ग्वाही आहे. तो आपला आदर्श आहे. फक्त अयोध्येतच मंदिर निर्माण करून आपल्याला राम प्राप्त होईल किंवा झाला का? नाही ना? मग उपाय काय? उपाय एकच, प्रभुरामचंद्रांचे मंदिर आपल्या मनोभूमीवरही निर्माण करणे. मनाची बलिष्ठता प्रथमतः निर्माण झाली की, मनगटात आपोआपच बळ येते. मनात राम अवतरला की, मनगटात महाबली हनुमंत आलेच समजा. म्हणून समर्थांनीही 'आत्माराम' जागृत करण्याचा उपदेश केला आहे. त्यासाठी साधना करावी लागते. प्रभुरामचंद्रांवर प्राणापलीकडे निष्ठा असावी लागते. आपल्या मनाचे दार उघडे असावे लागते. ते बंद ठेवून भागत नाही. त्या रामाला आर्ततेने साद घालावी लागते. येथे आठवते ती, गुरुदेव रवींद्रनाथ ठाकूरांच्या 'गीतांजली'मधील एक रचना-

**'यदि ए आमार हृदय दुआर बंद रहे गो कभु द्वार भेंगे तुमि एसो मोर प्राणे, फिरिया जेयो ना प्रभु। यदि कोनोदिन ए वीणार तारे तव प्रियनाम नाहि झंकारे दया करे तुमि क्षणेक दौडायो, फिरिया जेयो ना प्रभु। तव आहवाने यदि कभु मोर नाही भेंगे जाय सुप्तिर घोर व्रजवेदने जागायो आमाय, फिरिया जेयो ना प्रभु। यदि कोनोदिन तोमार आसने आर-काहारेओ बसाई जतने चिरदिवसेर हे राजा आमार, फिरिया जेयो ना प्रभु।'**

'हे प्रभू, माझ्या हृदयाचे द्वार एखादवेळी बंद असेल, तर दार फोडून आत या; परंतु परत जाऊ नका... हे प्रभो, जर कधी या वीणेच्या तारातून तुमचे प्रिय नाव झंकारत नसेल, तर कृपा करून क्षणभर उभे राहा; पण परत जाऊ नका. हे प्रभो, तुमची हाक ऐकूनही जर कधी माझी झोप उडाली नाही, तर वज्राघाती प्रचंड आवाज करून मला उठवा; पण परत जाऊ नका. हे प्रभो, जर कधी मोहाच्या आहारी जाऊन दुसऱ्या एखाद्याला तुमच्या आसनावर बसवले असेल, तरी तुम्ही परत जाऊ नका. कारण तुम्हीच माझे चिरंतन स्वामी आहात.' गुरुदेवांच्या प्रार्थनेतील ही आर्तता अनेक संत-सत्पुरुषांच्या वाणी, लेखणी आणि करणीत दिसून येते. समर्थ रामदास स्वामींच्या शिष्या महंत वेणास्वामी यांच्याही एका रचनेत हीच भावना व्यक्त होते..

**'बांध विमोचन राम माझा ।।धृ।।**
**सकळही ऋषीमुनि भजती जयासी ।**
**एकचि तो सुखधाम ।।१।।**
**सद्गुरुकृपया ओळिखला जो ।**
**कौसल्येचा राम ।।२।।**
**भावभक्तीचा सुलभ-साधनी ।**
**पुरवी सकळही काम ।।३।।**
**शरण ही वेणा आत्मारामा ।**
**पावली पूर्णविराम ।।४।।'**

समर्थ रामदास स्वामी यांची शिष्या वेणाबाई यांची निस्सीम रामभक्ती आदर्शवत आहे. रामभक्तीने त्यांच्यात आलेले प्रचंड मानसिक बळ एवढे होते की, आप्तेष्टांनी दिलेला विषाचा प्याला त्यांनी पचवून टाकला. वेणास्वामी सर्वार्थाने रामनामात धुंद झाली होती. विषाचा प्याला तिने प्रभुरामचंद्रांसमोर ठेवला आणि म्हणाली, 'रामा आज हाच तुझा आजचा नैवेद्य.' प्रभुरामचंद्रांचे नामस्मरण करीत वेणीने विष प्राशन केले. शेवटचा घोट घेतला. रिकामा प्याला देवासमोर ठेवला आणि तिच्या मुखातून शब्द बाहेर पडले- 'जय जय रघुवीर समर्थ' विषाचा प्रभाव वाढू लागला. ती रामनामाचा घोष करीत नाचायला लागली. ते वेणीचे 'रामनृत्य' होते. नेमके त्याच वेळी समर्थ तिथे आले. रामनामाचा गजर केला. त्यांच्या दिव्य वाणीने हलाहलावर मात केली. वेणी मृत्युंजयी ठरली. रामनामात आकंठ बुडालेल्या कुणालाही दुनियेतील कुठलेही विष सहजी पचवता येते. वेणास्वामी या समर्थांच्या अग्रक्रमी शिष्या होत्या. परकेच नव्हे, तर आपल्याच माणसांचा छळ सोसून वेणास्वामींनी रामाची साधना केली.

**'आम्ही स्वामींचे अंकित । रामनामे मुद्रांकित ।। गुरुवाक्य प्रेमनौका । मायासागर तरलो देखा ।। अहं ब्रह्म उपदेशिले । अहं गेले ब्रह्म ठेले ।। आली अनुभवाची खूण । खूण केली रामार्पण ।। वेणीस्वामी अवघा जाला । विज्ञानासी अंत आला ।।'**

समर्थांच्या आज्ञेवरून वेणास्वामींनी राममुद्रा धारण केली. रामनामाने अहंकाराचा निरास झाला. रामनामाशी वेणास्वामी तदाकार झाल्या. संपूर्ण विश्व एक झाले. हीच ती आयुष्यात प्राप्त होणारी प्रचीतीची खूण असते. एकदा का ही खूण अंतरात्म्याला पटली की, मन निर्भय होते. रामनामाचा अभ्यास, निदिध्यास आणि रामनामाची साधना कोणत्याही संकटाशी झुंजण्याचे बळ देते. जगण्याचा कणा ताठ होतो. साधनेने मन कणखर होते. जननिंदेने होरपळून निघालेल्या वेणास्वामींचे आयुष्य रामसाधनेच्या धगधगीत अग्निकुंडात तेजाळून उठले. परिस्थितीच्या भट्टीत तावून सुलाखून निघाले. वेणास्वामींना आत्मारामाचे भान आले. त्या ठणकावून सांगू लागल्या...

**'आमुच्या वाटे नका जाऊ। नये वाटे तुम्हा लाऊ ।। आम्ही पारिखे पारिखे । न हो लौकिकासारिखे ।। अशी स्थिती जाली मोठी । पोटी ब्रह्माण्डाच्या कोटी ।। वेणीस्वामी आत्माराम । तेचि आमुचे परंधाम ।।'**

रामनामाने अंकित झालेला साधक, रामभक्त हा चैतन्याचे स्वरूप असतो. परंतु ही रामभक्ती पोटातून हवी, नुसती ओठातून नको. प्रत्यक्ष कृतीमधून हवी, नुसती '... की जय' छापाच्या तात्कालिक घोषणांमधून काहीही साधत नसते. खरा रामभक्त हा लौकिकापासून दूर असतो. आपल्या रामभक्तीचे प्रदर्शन करण्याची त्याला आवश्यकता वाटत नसते. वेणास्वामी म्हणतात, 'आमच्या वाटेला जाऊ नका. अन्यथा आम्हीच तुमची वाट लावू. आम्ही तुमच्या सारखे नाही.' तुमच्या सारखे नाही, म्हणजे मग कसे? तर, या संपूर्ण समाजाला राममय करून त्यायोगे उत्कट भक्तीचा मळा निर्माण करणारे आम्ही आहोत. भावभक्तीचे सर्वात सुलभ साधन म्हणजे रामनाम. बंधनात अडकलेल्या जिवाला मुक्त करणारे बीजनाम म्हणजे रामनाम. या रामनामाचा अंगीकार ज्याने केला, त्याच्याकडे वाकड्या नजरेने बघण्याची कुणाची हिंमत होणार नाही, असे प्रत्यक्ष समर्थच सांगतात.

**'समर्थाचिया सेवका वक्र पाहे ।**
**असा सर्व भूमंडळी कोण आहे ।**
**जयाची लीला वर्णिती लोक तिन्ही।**
**नुपेक्षी कदा रामदासाभिमानी ।।'**

श्रीरामाचे नाम हे तारक आहे. सर्वमंगलाचे मंगल असे हे नाम. नेमका कुठे भेटतो हा राम? तो आपल्या मनात असतो. आपण त्याला बाहेर शोधतो. 'तुझे आहे तुजपाशी, परी तू जागा चुकलासी' अशी आपली अवस्था होते. उच्चकोटीची नामसाधना करणाऱ्याच्या केवळ मुखातूनच नव्हे, तर रोमारोमातून रामनामाचा उच्चार होतो. मुखातून शब्द उच्चारण्याचीही आवश्यकता भासत नाही. वाणीला विराम देऊन केवळ अबोलपणे रामनामाचा आठव, नामाचे अनुसंधान साधायला हवे. वेणास्वामी म्हणतात..

**'आम्ही अबोल अबोल। अबोल बोलू बोल।। गुरु निःशब्दाची बीजे। आम्हा प्राप्त आत्मकाजे ।। आमुची माया वांज आली। येर ब्रह्मी लया गेली ।। शब्द आकाशी निमाला। आत्माराम अवघा आला ।। वेणीस्वामीयाच्या संगे ।आम्ही राहो आत्मरंगे ।।'**

महंत वेणास्वामींसारख्या प्रखर अशा रामनिष्ठेच्याच पोटी राष्ट्रनिष्ठा जागृत होते. या निष्ठेसोबतच सामाजिक समरसतेची वीण घट्ट केली पाहिजे. प्रभुरामचंद्रांनी त्याकाळी हेच केले.

(पान ६ वर)

नोंद

विष्णुगुप्त

# आत्मा आणि तत्त्वज्ञान

विज्ञानाला ज्या प्रश्नांची उत्तरे सापडली नाहीत ती आज सापडतील, असा विश्वास आहे. विज्ञानाने काही प्रश्न अनुत्तरित ठेवले. ते असे : बी किंवा फांदीतील आत्मा आणि मूळ झाडातील आत्मा निराळे समजावेत का? आई-वडिलांच्या शरीरापासून उत्पन्न होणाऱ्या गर्भाच्या शरीरात आत्मारूपी चैतन्य आले कोठून? मागील लेखांत सापेक्षता सिद्धांतातील ऊर्जा आणि वस्तू यांच्या परिवर्तनाचे सूत्र सांगितले होते. चैतन्यरूपी विश्वात्म्याने याच पद्धतीने स्वतःला मायेच्या रूपात प्रकट करून जीवसृष्टी निर्माण केली.



श्रीमद्भागवताच्या तृतीय स्कंधात याचे सविस्तर वर्णन वाचावयास मिळते. ५ महाभूते, ५ विषय, ५ ज्ञानेंद्रिये, ५ कर्मेंद्रिये आणि मन, बुद्धी, अहंकार, चित्त या ४ वृत्ती व शेवटचा काल अशा २५ तत्त्वांपासून हेच चैतन्य म्हणजे ऊर्जा सगुणात म्हणजे वस्तूत अवतरले. महामुनि कपिलांचे सांख्य शास्त्र आणि आयुर्वेद यात अनेक ठिकाणी साम्यता आहे. मात्र आयुर्वेदाने किंचित बदल सुचवला आहे- चरकाचार्यांनी शारीरस्थान या विषयात पृथ्वी, पाणी, वायू, तेज आणि आकाश ही पाच तत्त्वांपैकी आई-वडिलांच्या शरीरापासून नवीन शरीराच्या उत्पत्तीकरिता फक्त पहिली चारच तत्त्वे सांगितली आहेत. कारण आकाश हे तर सर्वत्र असतेच आणि शरीररचनेच्या काळात तेथे कर्मबंधनांत अडकलेला जीवात्मा प्रवेश करतो. हिंदूंच्या १६ संस्कारातील पुंसवन विधीमागेसुद्धा हाच तर्काधार आहे.

आत्म्याचे येणे आणि जाणे; तसेच मृत्यूनंतर आत्मा जातो का? आपले तत्त्वज्ञान अनेक उपनिषदांत विखुरले आहे. या सर्वांचे सार आणि व्यवस्थित संकलन म्हणजे श्रीमद्भगवत्गीता. 'सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपाल नंदनः।' म्हणजे सर्व उपनिषदरूपी गायींचे दोहन करून गोपालनंदन श्रीकृष्णाने जे उपदेशामृतरूपी दूध अर्जुनाच्या निमित्ताने जगापुढे ठेवले ते म्हणजे गीता. त्यात दुसऱ्या अध्यायात आत्म्यासंबंधी प्रसिद्ध श्लोक आहेत ते आणि सर्वांच्या सोयीसाठी आचार्य विनोबांचे गीताईमधील सोपे आणि सुंदर रूपांतर येथे देत आहे.

**'नित्यः सर्वगतः स्थाणुरचलोऽयं सनातनः।।**
**स्थिर निश्चळ हा नित्य सर्वव्यापी सनातन।। २.२४'**

आपल्या प्रश्नांची उत्तरे येथे सापडतात. आत्मा हा स्थल आणि काल यांच्या निरपेक्ष आहे. त्यामुळे रोपाच्या नवीन फांदीत त्याचे येणे हा मूळ प्रश्नच निकालात निघतो. मागील लेखांत आपण शरीराला यांत्रिक रचना म्हटलेले आहे. मृत्यू म्हणजे रचनेची व्यवस्था बिघडणे. यानंतर त्याचे असणे प्रत्ययास येत नाही. पण म्हणून तो आता शरीराला सोडून गेला असे तरी का म्हणावे? मुळात जो कधी आलाच नव्हता तो जाईल तरी कधी? (स्थिरसनातन) आणि क्वचित गेलाही तर तो कोठे जाणार? कारण तो तर सर्वव्यापी.

**'न जायते म्रियते वा कदाचिन्नायं भूत्वा भविता वा न भूयः।**
**अजो नित्यः शाश्वतोऽयं**
**पुराणो नः हन्यते हन्यमाने शरीरे ।।**
**न जन्म पावे न कदापि मृत्यु ।**
**होऊनि मागे न पुढे न होय ।**
**आला न गेला स्थिर हा पुराण ।**
**मारोत देहास परी मरे ना ।।२.२०'**

पंचमहाभूतांच्या रासायनिक यंत्राचे मूळ आणि अंत हे दोनही उर्जेत आहे. केवळ ती ऊर्जा अव्यक्त आहे इतक्याच कारणाने भौतिकशास्त्राला आत्म्याची ॲलर्जी का असावी? हे लक्षात घ्यायला हवे की, भौतिक दृष्टीतून अभौतिक जाणवेलच कसे? त्याचे अस्तित्व अनुमानानेच सांगावयाचे. जिवंतपणा म्हणजे आत्म्याची **जाणीव किंवा प्रत्यय. हेच ते आत्मभान।**

**'अव्यक्तादीनि भूतानि व्यक्तमध्यानि भारत।**
**अव्यक्तनिधनान्येव..**
**भूतांचे मूळ अव्यक्ती मध्य तो व्यक्त भासतो।**
**पुन्हा शेवट अव्यक्तीं..।।२.२८'**

लौकिक अर्थाने ज्याला आपण मृत्यू म्हणून ओळखतो तो आणि त्यानंतरची अवस्था काय असावी? यंत्राची रचना थकली, कार्य मंदावले आणि एक दिवस ते थांबले की शरीरावरील जुने फाटके वस्त्र काढून नवीन धारण करावे तसा आत्मा नवीन शरीरात प्रकट होतो.

गीता म्हणते-

**'वासांसि जीर्णानि यथा विहाय ।**
**नवाति गृह्णाति नरोऽपराणि ।**
**तथा शरीराणि विहाय जीर्णा**
**न्यन्यानि संयाति नवानि देहि ।।'**

किंवा आचार्य विनोबांच्या शब्दांत-

'सांडूनिया जर्जर जीर्ण वस्त्रे।
मनुष्य घेतो दुसरी नवीन।
**तशीं चि टाकूनि जुनी शरीरें।**
**आत्मा हि घेतो दुसरी निराळीं ।।२.२२'**

येथे गीतेने स्पष्टपणे पुनर्जन्म सांगितला आहे.

आद्यशंकराचार्य चर्पटपंजरीमधून हेच सांगतात-

**'पुनरपि जननं पुनरपि मरणं**
**पुनरपि जननी जठरे शयनम् ।'**

आता येथे एक प्रश्न उत्पन्न होतो की, शरीराची रचना बंद पडल्यावर आत्मा कोठे गेला? सुरुवातीला आपणच तो स्थिर, निश्चल आणि सर्वव्यापी तसेच सनातन म्हणून सांगितले आणि आता लगेच कोणीतरी देह सोडून गेला व पुन्हा नवीन जन्मात अवतरला हे सांगतो.

**ही विसंगती नव्हे काय?**

अजिबात नाही. गीता ही कृष्णाने सांगितली आणि महर्षी व्यासांनी ग्रथित केली आहे. त्यांचा 'नमोस्तुते व्यास विशाल बुद्धे।' असा गौरव करण्यात येतो. ते विसंगत असे काही लिहिणारच नाहीत. मग याचे **स्पष्टीकरण काय असावे?**

गीतेत जीवात्मा आणि परमात्मा या दोन कल्पना सांगितल्या आहेत. परमात्म्याचाच अंश जीवात्मा. मात्र ज्या शरीराच्या ठायी त्याचे वास्तव्य असेल त्या शरीराचा गुणधर्म, इच्छा, आकांक्षा, दोष, कर्मामुळे उत्पन्न झालेले नशीब (विदर्भातील कवी प्रा. मनोहर कवीश्वर 'गीतगोविंदा'त लिहितात- 'भाग्य चालते कर्मपदाने'), मन, बुद्धी, अहंकार हे सर्व घेऊन तो जीवात्मा आपली पुढची वाटचाल करतो व त्यानुसार नवा जन्म प्राप्त करतो. 'अंते मति सः गतिः' म्हणजे झोपेपूर्वी जे विचार असतील तसे स्वप्न दिसावे त्याप्रमाणे अंतिम क्षणी जो विचार अधिक प्रभावशाली राहील त्यानुसार नवीन जन्म व त्यामधील वाटचाल ठरते. ८४ लक्ष प्रकारच्या शरीररचनेतून ज्याचा त्याचा प्रवास आपापल्या कर्मानुसार चालत राहतो. कोणी वेळीच सावध होऊन आपल्या अंतिम स्थानकावर पोचतो तर कोणी पुन्हापुन्हा त्याच चुका करत प्रत्येक जन्मात मागे-पुढे होत राहतो. कधी चार पावले पुढे आणि दोन पावले मागे असे केल्यामुळे हा प्रवास संपता संपत नाही.

जीवात्मा आपल्या गत जन्मातील संस्कार, शिक्षण, स्मृती, अभ्यास, राग-लोभ इत्यादी सर्व विकारांचे गाठोडे घेऊन त्याला योग्य अशा नवीन घरी- वातावरणांत आई-बापांच्या ठिकाणी जन्माला येतो. 'मुलाचे पाय पाळण्यात दिसतात' या म्हणीप्रमाणे प्रत्येक जण आपापल्या वृत्तीनुसार लहानपणापासून निरनिराळ्या क्षेत्रात आपले गुणधर्म प्रकट करू लागतो. बालपणीच कोणी एखाद्या विशिष्ट विषयात प्रगती दाखवतो यात आश्चर्य अशासाठी नाही की लौकिक दृष्टीने हे बालपण असेल, पण यामागे मागील जन्मामधील अभ्यासाचा पाया आहे.

(पान ६ वर)

साधता संवाद

प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी(वतनी)

भ्र. ९४०३०२९१७८

# मौनात एकांती। हरिभजे।।

(भाग-५८)

ई सर्व इंद्रिये ही मनाच्या ताब्यात असतात. मन जशी आज्ञा करेल तसे इंद्रिये कर्म करतात. एकदा कर्म केले की त्याचं फळ लवकर किंवा उशिरा मिळतेच हे पक्के ध्यानात घ्यावे. वेदना, दुःख, त्रास देणारी कर्मे टाळावीत म्हणण्यापेक्षा ती करूच नयेत. त्यासाठी सद्सदविवेक बुद्धीने घेतलेले निर्णय मनाने मान्य केल्याशिवाय इंद्रिये दुष्कर्मे टाळून सत्कर्म करणार नाहीत. त्यामुळेच तर दुःखे उद्भवतात. हे सारं कळतं पण वळत नाही. मग यावर काही उपाय आहे का? तर आहे...


**वाचाळाचा संग । नको करू मना।।**
**फुकाचीच दैना । क्लेशदायी ।।२।।**

मुळात यासाठी मनाला विचारी होणं आवश्यक आहे. त्यासाठी मनला काही पथ्ये पाळावी लागतील. त्यातील पहिलं आणि महत्वाचं पथ्य म्हणजे संगत! कोणाची संगत करावी आणि कोणाची करू नये याचे भान मनाला असायला हवे. म्हणून तर आपल्याकडे एक म्हण आहे की ऐकावे जनाचे, करवे मनाचे ही म्हण प्रसिद्ध आहे. म्हणजे कुणी आपल्याला सल्ला देत असेल किंवा काही सांगत असेल तर त्याला कोणताही विरोध न करता किंवा त्याच्यापेक्षा मलाच जास्त कळतं म्हणून फुशारकीने (अहंकाराने) त्याच्याशी अजिबात वर्तन करू नये. त्यामुळे आपला उद्धटपणा दिसून येतो. त्यासाठी सर्वांचे शांतपणे ऐकून अंतिम निर्णय मात्र आपली सद्सदविवेक बुद्धीने घेतलेला निर्णयच मनाने मान्य करावा. कारण मन चंचल आहे आणि बुद्धी ही स्थिर व विवेकी आहे. एकांतात मनाने बुध्दीशी संवाद सधायला हवा आणि व्यष्टीच्या व समष्टीच्या हीताचा निर्णय, विचार करूनच घ्यावा. कारण जगद्गुरु तुकाराम महाराजांनी मन करा रे प्रसन्न सर्व सिध्दीचे कारण। असं जे आम्हाला सांगितलय ते उगीच सांगितलं आहे का? आहो प्रसन्न मनाने केलेलं कोणतंही काम सिध्दीस जातं, कारण त्या कर्मा मागे मनाचं अधिष्ठान असतं. चोर जेव्हा चोरी करायला जतो तेव्हा त्याच्या मनात नुसता गोंधळच असतो म्हणूनच कितीही सराईत चोर असला तरी शेवटी काही ना काही तरी पुरवा मागे सोडतोच आणि तोच त्याचा घात करतो. म्हणून प्रसन्न मनाने कोणतेही कर्म करावे. याचसाठी समर्थांनी मनाला मनाच्या श्लोकातून कसे वागावे आणि कसे वागु नये य विषयी सविस्तर बोध केला आहे.

थोडक्यात बोलघेवड्या माणसाचा किंवा वायफळ बडबड करणाऱ्या माणसांचा संग कधी चूकूनही करू नये. कारण आपला किंमती वेळ तर वाया जतोच जातो पण त्यातून काहीही निष्पन्न होत नाही. उलट आपलीच फजिती होते, दैना होते. आणि एका वाचाळवीराने आपल्याला मुर्ख बनवलं. हे फार क्लेशदायी वाटतं. म्हणून आपल्या मनाने सदासर्वकाळ सज्जनांचाच संग करावा आणि वाचाळांचा किंवा दांभिकांचा संग मात्र कटाक्षाने टळावा. कारण...

**आपली आपण । जाणावी कुवत ।।**
**राखुनिया पत । धन्य व्हावे ।।३।।**

संसार हा सर्व दुःखाचं मुळ तर आहेच. पण अतिशय क्लिष्ट असूनही प्रत्येक जण या संसाराच्या जाळ्यात अडकतोच! काही केल्या तो टळत नाही. म्हणून काय संसार करूच नये काय? संसार तर करायचाच आहे. पण त्याच बरोबर त्याच्या जाळ्यातून स्वतःच स्वतःची मुक्तता करावी लागते. त्यासाठी दुसरा कुणीतरी आपल्या मदतीला यईल आणि आपली सोडवणूक करेल या वेड्या आशेवर राहु नये. ज्याप्रमाणे आपल्या प्रारब्धाचे भोग हे आपल्यालाच भोगावे लागतात, ते इतरांनी भोगून चालत नाही. त्याप्रमाणे या भवबंधनातून आपणच आपली सोडवणूक करावी. त्याचप्रमाणे या संसारात जर खऱ्या अर्थाने सुखी व्हायचं असेल तर आपण आपली कुवत ओळखून वागावे. म्हणजे यालाच अंथरूण पाहून पाय पसरावे असे म्हणतात. अपणच आपली पत राखवी, म्हणजे जी गोष्ट आपल्या आवाक्याच्या बाहेरची आहे. तिचा वृथा अट्टाहास धरू नये. स्वप्न जरूर पहावीत, ती पूर्ण करण्यासाठी प्रयत्नही करावेत नाही असं नाही पण साध्य नाही झालं तर त्याचं वाईटही वाटून घेऊ नये. आहे त्यातच समाधान मानले तर या जगात आपल्या सारखा सुखी कोणीच असणार नाही हे मात्र सत्य आहे. तुकाराम महाराज आम्हाला हेच सांगतात की, ठेवीले अनंते तैसेचि रहावे चित्ती असू द्यावे समाधान म्हणून मायबाप हो, आपलं मन स्थिर ठेऊन आपणच आपली कुवत जाणली की, चारचौघात आपली पत राखली जाईल आणि आपण धन्य होऊ.



**प्रेमाने साधावा । जनाशी संवाद ।।**
**टाळावा विवाद । दांभिकांशी ।।४।।**

आणखी सुखी जीवनाचा मंत्र म्हणजे जीवन जगतांना मितभाषी तर असावेच पण त्याच बरोबर जनाशी संवाद साधावा तोही प्रेमानेच साधावा. कारण प्रेमात एवढी ताकद असते की, त्या प्रेमाने शत्रूच काय अख्ख जग जिंकता येतं यावर आपल्या मनाचा ठाम विश्वास असायला हवा. म्हणून जनाशी संवाद साधतांना तो प्रेमानेच साधावा पण हा प्रेमळ संवाद साधतांना एक काळजी मात्र घ्यायला हवी की, वर सांगितल्याप्रमाणे दांभिकांशी किंवा मुर्खांशी संवाद टाळावा. एवढेच नव्हे तर एका अक्षरानेही त्यांच्याशी बोलू नये. कारण त्यात आपलीच हानी होते.

**सात्विक मनाने । नांदावे लोकांती ।।**
**मौनात एकांती । हरि भजे ।।५।।**

संतांच्या वर्तनाचा बारकाईने अभ्यास केला तर एक गोष्ट लक्षात येते की, ते आपल्या सारख्या सामान्यात वागतांना ते अती सामान्य होऊन वागतात पण अंतरी मात्र जगाच्या कल्याणासाठी अखंडपणे चिंतन चालू असतं. आपल्या सारख्या सामान्य माणसाने त्यांचं अणुकरण करावे. नव्हे नव्हे तसा प्रयत्न तरी करायला काय हरकत आहे? आपल्याला लोकांत आणि एकांत यांचा सुवर्णमध्य साधून योग्य मार्ग काढायचा आहे. तेव्हा आपल्या मनाची भूमिका फार महत्वाची असते. कारण माणूस हा समाजशील प्राणी आहे. तो समाजाला टाळणे तर शक्यच नसते.

अशावेळी वेळी एकच करावे की, आपल्या कर्मात मन कसं शुद्ध, सात्विक आणि निरपेक्ष असावं. अशा शुद्ध सात्विक मनाने लोकांशी व्यवहार करावा. आणि एकांतात मात्र मौन रहावे आणि अखंडपणे हरिला भजावे. हरिनामातच रममाण व्हावे की जेणेकरून आपलं जीवन आनंदमय होईल.

थोडक्यात जर देहाचेच डोहाळे पुरवत गेलो तर जन्माचेच वाटोळे होईल. त्याचप्रमाणे या मनाने वाचाळाशी संगत केली तर आपली दैन्यावस्था होईल. त्यामुळे आपले जीवन क्लेशदायक होईल. आपली आपण कुवत जाणून पत राखून व्यवहार करून धन्य व्हावे. प्रेमाने जनाशी संवाद साधावा आणि दांभिकाशी टाळावा. सात्विक मनाने लोकांतात नांदावे पण एकांतात मात्र मौनात राहून हरिसी भजावे. म्हणजे आपले आयुष्य आनंदमय होऊन जाईल. यापेक्षा मोक्ष तो वेगळा काय असणार? (लेखकाने ज्या अभंग रचनेचे निरूपण केले आहे ती अभंग रचना लेखकाची स्वतःचीच आहे.)

# ग्रहसंकेत

**(रविवार, १७ ऑगस्ट ते शनिवार, २३ ऑगस्ट २०२५)**

नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर

ज्येष्ठ पत्रकार, फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र. ९४२३७५८४०१)

✻ **रविवार, १७ ऑगस्ट** - आदित्य पूजन, हरी मंदिर हत्तरगी महाप्रसाद, रवी राशी संक्रमण पुण्यकाल सूर्योदय ते दुपारी १२: ४३ ✻ **सोमवार, १८ ऑगस्ट** - शिवपूजन, शिवामूठ (जवस), श्रीमंत बाजीराव पेशवे जयंती, सुखदेव यात्रा जरंडी, श्री बसवेश्वर यात्रा शिरगाव, कृष्णा नदी उत्सव, श्रीकृष्ण सरस्वती महाराज पुण्यतिथी कोल्हापूर, सोमेश्वर यात्रा करंजे, श्री भीम-कुंती यात्रा उंब्रज ✻ **मंगळवार, १९ ऑगस्ट**- अजा एकादशी, जागतिक छायाचित्रण दिन, तुकाई यात्रा इटकरे (ता. वाळवा), भवानीदेवी यात्रा बलवडी (खा.) (ता. खानापूर), मंग मंगळागौरी पूजन ✻ **बुधवार, २० ऑगस्ट**- प्रदोष, बुध पूजन, स्वामी स्वरुपानंद पुण्यतिथी पावस, संत सेना महाराज पुण्यतिथी, नारायण महाराज पुण्यतिथी केडगांव (नगर), पर्युषण पर्वारंभ (चतुर्थी पक्ष) जैन ✻ **गुरुवार, २१ ऑगस्ट**- शिवरात्री, बृहस्पती पूजन, गुरुपुष्यामृत (सूर्योदय ते उ.रात्री १२.०९ पर्यंत), पर्युषण पर्वारंभ (पाच पक्ष) ✻ **शुक्रवार, २२ ऑगस्ट**- दर्श पिठोरी, अमावस्या (बैल पोळा), मातृदिन, दर्भाहरण, सौर शरद ऋतू प्रारंभ, जरा- जिवंतिका पूजन, अहिल्यादेवी होळकर पुण्यतिथी, चंद्रिकामाता जन्मोत्सव कमलापूर दुपारी ११: ५६ नंतर अमावस्या ✻ **शनिवार, २३ ऑगस्ट**- भारतीय भाद्रपद मासारंभ, अमावास्या स. ११.३७ पर्यंत, संत बाळूमामा पुण्यतिथी, राष्ट्रीय अंतराळ दिन, हनुमंत महाराज पुण्यतिथी वावरहिरे, श्री शनेश्वर शिंगणापूर अभिषेक, गोपाळनाथ महाराज संजीवन समाधी सोहळा, सावळज यात्रा, प्रतिपदा श्राद्ध, अश्वत्थ मारुती पूजन

**मुहूर्त:**- ✻ **साखरपुडा**- १७ ऑगस्ट, ✻ **बारसे**- २० ऑगस्ट, ✻ **जावळ**- २० ऑगस्ट (१४ पर्यंत), ✻ **गृहप्रवेश**-२० ऑगस्ट (१४ पर्यंत).

### मेष :- अडचणींवर मात कराल

स्वतःला जिंकण्यात व्यस्त रहा, दुसऱ्याला हरवण्यात नाही. सुखस्थ बुधाचा सोमवारी मंगळाशी लाभ योग होत आहे. यांत्रिक क्षेत्रात मनासारखी प्रगती होईल. स्थावर, वाहनाबाबतचे व्यवहार होतील. संघर्षातून प्रगती होईल. नव्या विचारांना चालना मिळू शकेल. कला-गुणांना चांगल्या संधी लाभतील. अडचणींवर मात कराल. शुभ ता. १७, २०

### वृषभ:- शिक्षणातून चांगल्या संधी

एखाद्याबद्दल चांगलं बोलता येत नसेल तर निदान वाईट तरी बोलू नये, ते आपल्या फायद्याचे ठरते. बुध, मंगळ लाभ योग शिक्षणातून चांगल्या संधी मिळवून देणार आहेत. स्वमताग्रह टाळावा. ज्ञानदान, बँक, विमा अशा क्षेत्रात मनासारखी प्रगती होईल. फार दगदग करू नका. विश्रांतीची गरज भासेल. नव्या संधीला होतील अनुकूलता वाढेल. शुभ ता. १९, २०

### मिथुन:- आत्मविश्वास वाढेल

ज्याने हात सोडला, त्याला वळून पण पुन्हा पाहू नये. धनस्थ बुधाचा सुखस्थ मंगळाशी लाभ योग होत आहे. आर्थिक उन्नतीच्या घटना घडतील. योजलेली कामे मनासारखी होतील. अपेक्षित संधी लाभतील. गायन, वादनादि कलेत प्रगती होईल. नव्या ओळखी लाभप्रद ठरतील. फार धावपळ करू नका. अडचणीतून मार्ग निघत जाईल. आत्मविश्वास वाढेल. शुभ ता. २०

### कर्क:- सौख्याच्या घटना

ज्यांनी हात धरला आहे ना, त्यांच्यासाठी काही पण करायची तयारी ठेवावी. राशीतील बुधाचा मंगळाशी लाभ योग होत आहे. त्यामुळे कार्यक्षेत्रात मनासारखी प्रगती साधता येईल. कौटुंबिक जीवनात सौख्याच्या घटना घडतील. अपेक्षित संधी लाभतील. उत्साह वाढेल. धार्मिक कार्यात पुढाकार घ्याल. शुभ ता. १७, २०

### सिंह:- अपेक्षित घटना

आयुष्यातील काही क्षण स्वतःसाठी जगायला शिकावे, राशी स्वामी रवी राशीतच असल्याने आत्मविश्वास वाढेल. खर्च वाढले तरी प्राप्तीही तशीच चांगली राहणार आहे. प्रकृतीच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. अपेक्षित घटना घडतील. नव्या विचारांना चालना मिळेल. अडचणीतून मार्ग निघेल. नवे विचार मनात रुजतील. शुभ ता. २०

### कन्या:- सामंजस्याने रहावे

आनंदाच्या काळात सोबत फिरणारेच एक दिवस आपल्या वाईट वेळेचे कारण बनतात. राशीतील मंगळाचा लाभातील बुधाशी लाभ योग होत आहे. अंगिकृत कार्यात मनासारखी प्रगती होईल. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. अनुकूलता वाढत जाईल. सरकारी कार्यासाठी पाठपुरावा करावा लागेल. शुभ ता. १७, २०

### तुला:- स्पर्धांमध्ये यश

कोणालाही दुखवू नये, स्वतःला सुधारण्याचा प्रयत्न करावा. कर्मस्थ बुध, शुक्रामुळे कार्यक्षेत्रात मनासारखी प्रगती होईल. भाग्यवृध्दिंगत करणार्या घटना घडतील. दृष्टांत, साक्षात्कार होतील. सरकारी कामे होतील. जनसंपर्क वाढेल. कमिशनवर चालणार्या व्यवसायात प्रगती होईल. स्पर्धांमध्ये यश मिळेल. शुभ ता. १९

### वृश्चिक:- नव्या विचारांना चालना

सर्वांसोबत नक्कीच चला, पण गर्दीत हरवू नका. बुध, मंगळाचा लाभ योग आर्थिक प्रगती करणारा आहे. जुने येणे वसूल होईल. भागीदारीच्या व्यवसायात सामंजस्याने रहावे. स्थावर प्रश्न विलंबाने सुटतील. उपजत कलागुणांचा विकास होईल. यांत्रिक क्षेत्रात प्रगती घडेल. नव्या विचारांना चालना मिळेल. शुभ ता.२०

### धनु:- धडाडीने रहावे

जी गोष्ट तुम्हाला आव्हान देते, तीच गोष्ट तुमच्यात बदल घडवू शकते. कर्मस्थ मंगळाचा बुधाशी लाभ योग होत आहे. त्यामुळे वैद्यकीय, कृषि, मेकॅनिकल अशा क्षेत्रात असणाऱ्यांना विशेष अनुकूलता राहील. सौख्यदायी घटना घडतील. उत्साह धडाडीने रहावे. अपेक्षित संधी लाभतील. अडचणीतून मार्ग निघेल. फार चिंता करू नका. शुभ ता.२०

### मकर:- आर्थिक प्रगती

नदीकाठी सल्ला देणारे लोक समुद्रात बुडताना साथ देत नाहीत. बुध, मंगळाचा लाभ योग आर्थिक प्रगती करणारा आहे. नव्या कामांना गती मिळेल. कौटुंबिक जीवनात आनंददायी घटना घडतील. अडचणीतून मार्ग निघत जाईल. अपेक्षित संधी लाभतील. फार दगदग करू नका. विलंबाने पण चांगल्या घटना घडतील. शुभ ता. १९

### कुंभ:- विचाराने रहावे

अयशस्वी लोकांची संगत ठेवावी कारण त्यांच्याकडे अहंकार नाही तर अनुभव असतो. धनात शनि तर अष्टमात मंगळ त्यामुळे आर्थिक गणित बिघडण्याची शक्यता आहे. नोकरी व्यवसायात विचाराने रहावे. विद्या संततीबाबत शुभ घटना घडतील. कलेत प्रगती होईल. विचाराने रहावे. घाईने निर्णय घेऊ नका. शुभ ता. १९

### मीन:- संघर्षातून वाटचाल

ज्यांच्या सुखदु:खाशी आपण एकरूप होऊ शकतो, तो खरा मित्र होय. शनिच्या प्रतियोगात मंगळ असल्याने संघर्षातून वाटचाल करावी लागेल. पंचमतील बुध- शुक्र समस्या सोडवत जातील. फार चिंता करू नका. भागीदारीच्या व्यवसायात सामंजस्याने रहावे. अडचणीतून मार्ग निघत जाईल. अपेक्षित संधी लाभतील. शुभ ता. १७, २०

!! शुभ भवतु !!

पान ४ वरून

## स्वसंवाद

ज्योती तिचं नाव. लगेच तिने एक-दोन फोन केले आणि नंबर मिळवला. योगायोगाने ती नाशिकमध्येच एका नातेवाईकाकडे आली होती. तिलाही आनंद झाला. समिधाने भेटायला येते का विचारल्यावर तीही आनंदाने तयार झाली. जवळच्याच हॉटेलमध्ये भेट ठरली आणि अगदी थोडयाच वेळात ती आली. ती म्हणाली, ''अगं, तू तर नाशिकलाच असते नं. मग घरी बोलवायचं की मला. हॉटेलमध्ये का?'' त्यावर समिधा म्हणाली, ''अग तीच समस्या आहे माझी.'' ''म्हणजे? काय झालंय नेमक आणि तू अशी का दिसते आहेस?'' समिधाने अगदी नि:संकोच सुरुवातीपासून सगळं सांगितलं. तिला हसूच आलं. ''अगं काय हे? सुशिक्षित लोक तुम्ही आणि हे काय करता? स्वसंवाद हा आवश्यक असतो चांगल्या मानसिक आरोग्यासाठी.'' हे ऐकून समिधा सुखावली. आपण अगदी सुदृढ असल्याची तिला खात्री पटली.

ती बहिणीला घरी येण्याची विनंती करते. ''आता तू चल आणि सांग माझ्या घरच्यांना म्हणजे पटेल त्यांना.'' ज्योती लगेच तयार होते. समिधाला सुखरूप आलेली पाहून घरच्यांच्या जिवात जीव येतो. घरात पाय टाकल्याबरोबर समिधा म्हणते, ''मनोरुग्ण आहे नं मी. मला सायकेट्रिककडे न्यायचं नं तुम्हाला. हे बघा मी सोबतच घेऊन आलीय.''

''ही कोण?'' सासूबाई विचारतात? ''ही सायकेट्रिक. खूप मनोरुग्ण बरे केले आहेत तिने. मी ट्रिटमेंट घेणार आहे तिच्याकडे.'' सासूबाई सुखावतात.

''बरं झालं बाई, तुलाच कळलं. बरी हो लवकर.'' सोहमही तेच म्हणतो. ''मॅडम, ॲडमिट करायचं असेल तरी चालेल. तुम्ही पैशाची चिंता करू नका. पण हिला बरं करा.'' आता मात्र ज्योतीला राहवलं नाही. ती म्हणते, ''अहो, पण तिला काहीच झालं नाही. ती एकदम ठणठणीत आहे.''

''तुम्हाला माहीत नाही, ती एकटीच बोलते स्वयंपाक करताना, काम करताना.'' ''बरं असतं ते. त्याने माणूस संतुलित राहतो. टेन्शन घेत नाही. स्वतःचा तोल ढळू देत नाही. आम्ही डिप्रेशनमध्ये असणाऱ्या पेशंटला खास या स्वसंवादासाठी वेळ देतो की, त्याने स्वतःशी बोलावं आणि मोकळं व्हावं तरच ते यातून बाहेर निघतील. हे बघा, समिधाला असं बोलायला कोणीच नाही. त्यामुळे तिला ही सवय लागली असावी, पण त्यामुळे ती मनोरुग्ण नाही. ती एकदम ओके आहे. मी स्वतः बोलली आहे तिच्याशी.'' ''तुम्ही खरं बोलत आहात. तिला काहीच झालं नाही.'' सासूबाई.

''अहो काकू, मी २० वर्षे झाले मानसोपचार तज्ज्ञ म्हणून प्रॅक्टिस करते आहे पुण्याला. हे माझं कार्ड.'' कार्ड पाहून त्यांची खात्री पटली. सोहम तर खूपच खूश झाला. ''म्हणजे, सी ईज परफेक्टली ऑलराईट डॉक्टर.'' ''येस, डेफिनेट्ली, नथिंग टू वरी'' सोहम धावत समिधाजवळ आला.

तिचा हात हातात घेऊन म्हणाला, ''सॉरी समिधा, मी खूप घाबरलो होतो.'' ''इट्स ओके. मला माहीत आहे. हे सगळं तुम्ही माझ्या काळजीपोटी करत होते.'' ''माफ कर आम्हाला समिधा.'' सासू सासरे.

''दॅट्स लाईक अ गुड फॅमिली. असेच सुखात राहा. तुम्हाला कोणाचीही दृष्ट लागू नये. आता मला निरोप द्या, मी निघते.'' ज्योतीच्या बोलण्याने गैरसमजाचं सगळं मळभ दूर झालं आणि पुन्हा एकदा हास्याची झालर पसरली.



# कांचना

दुर्ग जिज्ञासा

प्राची पालकर

'सह्याद्री नामा नग हा प्रचंड, हा दक्षिणेचा अभिमान दंड ।
ज्वालामुखींनी जरी निर्मियेला, पवित्र तो रामपदे जाहला ।।
शिरावरी शंभू विराजताहे, कन्याकुमारी पद धूत आहे,
स्कंधावरी दुर्गम दुर्ग ज्याच्या, हाती झळाळे परशु तयाच्या ।।'

कवी सदाशिव आत्माराम जोगळेकर यांनी 'सह्याद्री स्तोत्र' या कवितेत लिहिलेल्या वरील ओळी सह्याद्री पर्वताचे अगदी यतार्थ वर्णन करणाऱ्या आहेत. सह्याद्री पर्वताच्या भव्यतेचे व सामत्त्र्याचे वर्णन करणारे हे शब्द अत्यंत मनभावन आहेत. पुरातन काळापासून दुर्ग आणि सह्याद्रीच्या पर्वतरांगा यांचे अद्वैत साधले गेले आहे. सह्याद्रीच्या पर्वतरांगांमुळे तयार झालेली विशिष्ट भौगोलिक रचना महाराष्ट्राच्या इतिहासावर दूरगामी परिणाम करणारी ठरली. शिवकालीन इतिहास तर या दुर्ग वैभवाच्या उल्लेखाशिवाय पूर्णच होऊ शकत नाही.

सह्याद्रीमध्ये दोन-चार शिखरांच्या आड आपल्याला एक दुर्ग दिसतो. प्रत्येक दुर्गाचे आपले एक वैशिष्ट्य आहे. मराठ्यांच्या सुवर्ण इतिहासाचा साक्षीदार असलेला कांचना किल्ला नाशिकपासून १०० किलोमीटर अंतरावर आहे. हा किल्ला महाराष्ट्राच्या नाशिक जिल्ह्यातील चांदवड तालुक्यात असून किल्ल्याची उंची साधारणतः ३७७५ फूट आहे. नाशिक जिल्ह्यात पूर्व- पश्चिम पसरलेल्या अजिंठा सातमाळा डोंगर रांगेत वसलेले गिरीदुर्ग अद्वितीय सौंदर्याने नटलेले आहेत. या परिसरात खूप हिरवळ नाही, परंतु येथील कातळ कोरीव सौंदर्य अप्रतिम आहे. छत्रपती शिवाजी महाराजांची दुसऱ्या सुरत लुटीनंतर मुघलांबरोबर झालेली कांचनबारीची लढाई याच परिसरात झाली. 'बारी' या शब्दाचा अर्थ दोन डोंगरांच्या मधील खिंड असा होतो. त्या काळात व्यापारी मार्गावर नियंत्रण ठेवण्यासाठी या भागातील किल्ल्यांची निर्मिती केल्या गेली. कांचन-मंचन हे एकाच डोंगरावर असलेले दोन शिखरे आहेत, ज्याला आपण जुळे दुर्गदेखील म्हणू शकतो. या दोन किल्ल्यांमध्ये खिंड असल्याने ते दुरावलेले आहेत व दोन्ही किल्ल्यावर जाण्यासाठी स्वतंत्र मार्ग आहेत.

कांचना किल्ल्यावर जाण्यासाठी दोन वाटा आहेत. पहिली वाट किल्ल्याच्या उत्तर पायथ्याच्या कांचने गावातून आहे. या वाटेने गेलो तर प्रथम आपण मंचना किल्ल्याच्या पायथ्याशी जातो. पहिले मंचना किल्ला पाहून मग कांचना किल्ल्याच्या दिशेने जाता येते. किल्ल्यावर जाणारी दुसरी वाट किल्ल्याच्या दक्षिण दिशेला असलेल्या खेळदरी गावातून किल्ल्यावर जाते. कांचने गावातून पुढे कांचनबारी खिंड पार केल्यावर खेळदरी हे गाव आहे. कांचने गावातून येणाऱ्या वाटेपेक्षा खेळदरी वाट सोपी आहे. बरेचदा गिर्यारोहक एका वाटेने जाणे व दुसऱ्या वाटेने परतणे असेही करतात. खेळदरी मार्गाने किल्ला चढायला सुरुवात केली की, साधारण एक-दीड तासाने आपण विस्तीर्ण पठारावर पोहोचतो. येथे एक मंदिर आहे व समोर गेलो की आपण कातळात खोदलेल्या गुहेजवळ येतो. कांचनगडाच्या पूर्वेकडे पिंडीसारख्या दिसणाऱ्या कातळ कड्याच्या दिशेने जाणाऱ्या रस्त्यावर काही गुहा आहेत, त्या पाहून समोरच्या कातळ पायऱ्यांवरून वर चढायला सुरुवात करायची. आपण गडमाथ्यावर पोहोचलो की, तिथे एका रांगेत पाण्याचे १० टाके खोदलेली आढळतात. कातळ कड्याच्या आत खोदलेला हा टाक्यांचा समूह पाहून त्या काळातील स्थापत्य, उंचावर पाण्याची गरज पूर्ण करण्यासाठी केलेल्या सोयी पाहून अभिमान वाटतो.


कातळ भिंतीला वळसा घालून गेल्यावर पश्चिमेच्या बाजूला एक प्रवेशद्वार व तटबंदी आहे. या प्रवेशद्वारातून आत गेल्यावर अजून काही गुहा व पाण्याची टाके आहेत. कांचना किल्ला व त्या शेजारील सुळका यामध्ये असलेल्या खिंडीत हनुमान शिल्प कोरलेले आहे. किल्ल्यावर जाण्यासाठी कातळात कोरलेल्या पावट्या असून त्यावर आधारासाठी खोबण्या केल्या आहेत. ही वाट थोडी कठीण असल्याने गिर्यारोहणाचा सराव नसलेल्या व्यक्तीने दोराच्या आधारानेच या वाटेवर जाणे सोयीचे आहे. हा रस्ता अत्यंत सावधगिरीने पार करावा लागतो. गडमाथ्याच्या एका टोकाला एक सुळका आहे. या सुळक्याच्या दिशेने जाताना एका रेषेत कातळात पाण्याची सात-आठ टाके दिसतात. हा सुळका गिर्यारोहण साहित्याच्या मदतीने गिरीप्रेमी सर करतात.

आपण सोबतच मंचना किल्लादेखील पाहून घ्यावा. या किल्ल्यावरदेखील पाण्याची टाके, काही गुहा आहेत. कांचना किल्ल्याला पौराणिक तसेच ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले आहे. नाशिक परिसरातील बऱ्याच भागात आपल्याला नाथपंथीयांचा प्रभाव दिसून येतो. नाथपंथातील गुरू मच्छिंद्रनाथ एकदा या भागात आले. मच्छिंद्रनाथ यांना सोन्याचा मोह होता, त्यांच्याकडे मिळालेले सोने व परिसाचा दगड होता. गोरखनाथ त्यांनी ते सोने व परिसाचा दगड फेकून दिला. यामुळे गुरू मच्छिंद्रनाथ खूप रागावले, तेव्हा गोरखनाथ यांनी आपल्या कमंडलूमधील पाणी समोरच्या डोंगरावर फेकले. समोर असलेला डोंगर सोन्याचा झाला, तोच हा 'कांचना किल्ला' अशी आख्यायिका प्रसिद्ध आहे. गोरखनाथ यांनी परिसाच्या दगडाचे काम कमंडलूमधील पाण्याने केले त्यामुळे गुरू मच्छिंद्रनाथ यांना त्यांची चूक समजली. नंतर गोरखनाथांनी तो डोंगर पूर्ववत केला. सोन्याचा डोंगर झाला होता म्हणून कांचना, अशी या डोंगराच्या नावाची उत्पत्ती आहे. शिवाजी महाराज दुसऱ्या सुरत लुटीनंतर बागलाणच्या दिशेने निघाले आहेत, ही बातमी दाऊद खानाला कळली. तो आपल्या फौजेसह बऱ्हाणपुराहून महाराजांच्या मागावर निघाला. १६ ऑक्टोबर १६७० रोजी दाऊद खान चांदवडच्या जवळ पोहोचला. स्वराज्यात जाण्यासाठी मराठ्यांना सातमाळ डोंगररांग ओलांडणे आवश्यक होते. त्यावेळी या प्रदेशात मुगल सत्ता होती. महाराजांना आधीच धोक्याची चाहूल लागली होती. त्यांनी आपल्या सैन्याची चार भागात विभागणी केली. महाराजांनी पहिले खजिन्याला विश्वासू सरदारांच्या सोबत वणीला पाठविण्याचे ठरविले. रातोरात महाराजांनी खजिन्याची व्यवस्था अत्यंत गुप्तता राखून लावली. राजांबरोबर तेव्हा प्रतापराव गुजर आणि मोरोपंत पिंगळे होते. सुमारे १० हजारांचे घोडदळ घेऊन राजांनी कांचनबारीची खिंड ओलांडायचे ठरविले.

महाराजांनी सैन्याच्या चार तुकड्या केल्या. एक तुकडी डोंगररांगेला वळसा घालून मुघलांवर मागून हल्ला करण्यासाठी पाठवली. शत्रू कांचनबारीच्या समोर दक्षिणेकडील मैदानात उभा होता. शत्रूने वेळ न दवडता समोरून खिंडीच्या तोंडाशी उभे असलेल्या सैन्यावर चढाई केली, घनघोर युद्ध सुरू झाले. मराठ्यांचा आवेश इतका होता की, पाहता पाहता मुघल धाराशायी होऊ लागले. दाऊद खानाने इख्लास खानाला पुढे पाठविले होते. तो जखमी झाला होता; मात्र इतक्यात दाऊद खान पायथ्याशी पोहोचला. मराठ्यांनी मागून आणि डाव्या-उजव्या दोन्ही बाजूंनी हल्ला केला. मुघली फौजांना पाठीमागून व दोन्ही बाजूंनी आलेल्या मराठ्यांचा अंदाज घेता आला नाही. मराठ्यांनी दाऊद खानाच्या सैन्याला आता चारही बाजूंनी वेढले होते. मुघलांची सैन्य फळी कापत मराठ्यांनी मुघलांची दाणादाण उडवली, घनघोर लढाई झाली. लढाईत दाऊद खानाचा पूर्ण पराभव झाला. वणी-दिंडोरी प्रांतातली कांचनबारीची लढाई म्हणजे शिवरायांच्या युद्धनीतीतला मैदानी युद्धाचा एक वैशिष्ट्यपूर्ण नमुना म्हणून नमूद आहे. सातमाळा डोंगररांगेतील हे बेलाग गिरीदुर्ग देखणे मात्र दुर्गम आहेत. या परिसरात विराट आकार धारण केलेल्या किल्ल्यांची एक श्रृंखलाच आहे. या श्रृंखलेतील दुर्गभ्रमण करताना 'दुर्ग' हा शब्द संस्कृत भाषेतील 'दुर्गम्' या शब्दापासून तयार झाला आहे, याची प्रचीती येते. सह्याद्रीची ही स्वयंभू संरक्षण क्षमता स्वराज्य निर्माण करताना तसेच त्याचे रक्षण करताना सहायक ठरली. शिवाजी महाराजांची कीर्ती आपल्या मनात जागृत ठेवण्यात गडकिल्ल्यांची महत्त्वाची भूमिका आहे.

पान ४ वरून

## झिम्माड पावसाच्या वेल्हाळ आठवणींच...



शेतातील कामे मार्गी लावून अनेक शेतकरी विठ्ठलाच्या भेटीसाठी पंढरपूरकडे रवाना झालेले असतात. काही ठिकाणी पाऊस पाणी वेळेवर पडत नाही आणि पेरणीच्या दिवशी घरातील कोणी मेले तर त्याचे मढे झाकून पेरणी उरकून घ्यावी या तत्त्वाने जगणारी शेतीमातीतील माणसं शेतातील कामे सोडून वारीत जात नाहीत. मात्र, ते विठ्ठलाची भक्ती सोडत नाही आणि स्वतःच्या शेतातून विठ्ठलाशी बोलताना एक अपेक्षा व्यक्त करतात ती पुढील प्रमाणे... वारीतल्या भजना-अभंगातच नाचू नको देवा, आम्हीही हरिविठ्ठलच गातो पेरणी करताना रानोरानी, दुथडी भरून वाहू दे गावागावातली गंगा-चंद्रभागा, व्याकूळ भक्ता भेटण्या तूच हो पाऊसपाणी, विठ्ठलवाणी, गावा गावातल्या नद्यांना चंद्रभागेचे रूप यावे. शेता शेतातून पिकाच्या रुपाने कमरेवर हात ठेवलेला विठ्ठल दिसावा. भक्तांच्या भेटीसाठी स्वतः विठ्ठल आणि पावसाच्या रूपात यावे. (पूर्वार्ध)

पान ५ वरून

## आमुच्या वाटे नका जाऊ...

आपल्या आचरणातून समाजाला एक आदर्श घालून दिला. राम हा मनुष्यजन्माला आला आणि स्वकर्तृत्वाने देवत्व पावला, हे समजून घेतले पाहिजे. रामाने उत्तर व दक्षिण भारत जोडला तर श्रीकृष्णाने पश्चिम-पूर्व भारत सांधला. म्हणूनच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला विभूतिमत्त्व प्राप्त झाले. एकात्म आणि एकरस भारतवर्ष असा हा त्रेतायुगापासून द्वापारयुगापर्यंत निर्माण झाला. तो भारतवर्ष आज कितीसा शिल्लक आहे? काळाच्या ओघात अनेक बदल घडले. अनेक मूल्ये काळाच्या उदरात गडप झाली. अनेक आधुनिक समाजमूल्ये प्रस्थापित झाली. परंतु काळाच्या ओघात तीच मूल्ये टिकली जी शाश्वत होती आणि आजही आहेत. ती मूल्ये आहेत राम आणि कृष्ण! येणाऱ्या काळात ही मूल्ये जोपासण्याचे आणि संवर्धित करण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत. अंतिमतः हीच मूल्ये मानव धर्माचे रक्षण करणारी ठरतील.

पान ५ वरून

## आत्मा आणि तत्त्वज्ञान

ज्ञानेश्वरांनीही याचे सुंदर वर्णन केले आहे. नवीन ठिकाणच्या संस्कारांमुळे-वातावरणामुळे त्याच्या एकूण पुढील आयुष्याची दिशा ठरते व तेही आयुष्य संपल्यावर पुन्हा नवीन प्रवास सुरू होतो. श्रीमद्भागवतातील जड भरताप्रमाणे हजारो लोकांमधून एखाद्यालाच या सर्व गोष्टींची जाणीव होते, अशा हजारो लोकांमधून एखादाच यातून सुटण्याची धडपड करू लागतो आणि अशा अनेकांमधून फक्त एखादाच योग्य प्रयत्न आणि गुरूंच्या मार्गदर्शनाप्रमाणे आचरण करून परमात्म्यात मिसळतो.(मर्ज होतो.) गीतेतील पुढील श्लोक सांगतो- '**यद्गत्वा न निवर्तन्ते तत्धाम परमं मम।**' आचार्य विनोबांची गीताई म्हणते- '**जेथे गेला न परतें। माझे अंतिम धाम ते।**' आणि हे जर असे आहे तर आजपर्यंतच्या जगातील जीवात्म्यांची एकूण संख्या ही कायमच राहील. वरील सर्व माहिती आपल्याकडील तत्त्वज्ञानात विस्ताराने सांगितली आहे. विविध उपनिषदे, ब्रह्मसूत्रशांकरभाष्य, श्रीमद्भागवत, आयुर्वेद यात हे सर्व विस्ताराने वाचायला मिळते.

# अव्यक्त संघर्षांची उपस्थिती




सकारात्मकतेचे तत्वज्ञान
डॉ. नितीन ह. देशपांडे
deshapandenh@gmail.com

**मानवाच्या पाच मूलभूत भावनिक गरजा-**

१) इतरांशी सुरक्षित बंध (स्थैर्य, स्वीकार, भरणपोषण, मर्यादित अवलंबित्व)

२) स्वायत्तता, सक्षमता आणि स्व- परिचयाची गरज

३) वैध मार्गाने गरजा आणि भावना व्यक्त करण्याचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य

४) उत्स्फूर्तता आणि खिलाडीवृत्ती

५) वास्तववादी सीमारेषा आणि स्व-नियमन

या सर्व किंवा यापैकी काही पूर्ण झाल्या नाहीत तर काही अव्यक्त साचे बालवयात तयार होतात आणि तो संघर्ष मुख्यतः स्वतःशी आणि इतरेजनांशी सुरु राहतो. भाव साक्षरता विकसित होण्याऐवजी मनात अढी, कुचंबणा, अबोला अशाच भावनांचे वेढे उत्पन्न होतात.

उदा. वाढत्या वयाबरोबर बालकांचे भावनिक परावलंबित्व कमी होते, व्हायला हवे. मात्र परिवारातील आणि परिसरातील प्रौढ आणि वाढत्या वयाच्या व्यक्तींशी विषारी नातेबंध जर निर्माण झालेत तर त्यांची व्यक्ती म्हणून वाढ खुंटते. अशा अनुभवांच्या पुनरावृत्तीतून घातक साचे मनात ठाण मांडून बसतात. म्हणून आपल्या पाल्याच्या, विद्यार्थ्यांच्या काही गरजा पूर्ण करण्यात पालकांना/शिक्षकांना अपयश आले तर अडथळे निर्माण होतात. सोबतीला बालकांचा स्वभाव असतोच परिणाम घडवून आणायला.

भवतालाला प्रतिसाद देण्याची प्रत्येक बालकाची कृती भिन्न असते. त्याचवेळी व्यक्तिगत गुणावगुण त्याला समाजचौकटींमध्ये विशिष्ट प्रकारे वर्तन करण्याची मुभा देत असतात.

बदलाला विरोध म्हणजेच प्रेरणा, उमेद किंवा तयारी असं असतं कां ? बदलाला विरोध बरेचदा खोलवर रुतून राहिलेल्या जखमांमुळे असतो आणि ती एक अदृश्य कातडीखाली दडलेली संहिता असते, आणि तो विरोध आपली समजूत घालत असतो की आपल्याला वाटणारी भीती खरी आहे आणि संभाव्य संधीकडे डोळेझाक करायला शिकवत असतो. हे साचे एकदा समजून घेतल्यावर ते मोडणे फारसे कष्टप्रद नसते.

प्रगती खुंटली की आपण विचारांचे जुनेच साचे वापरायला लागतो- पुनःपुन्हा ! खोलवर, अंतर्गृहात दडलेली गुह्ये शोधायची आणि बाहेर उजेडात आणायची असतील तर त्यासाठी खोलवर उपचारांची गरज असते. वारंवार उदभवणारे नात्यांमधील हानीकारक प्रसंग, करिअर,आरोग्य याबाबतीत आत्मघातकी विचार अथवा अवास्तव भावनिक प्रतिक्रिया सारेच घातक असते. हे आपोआप होत नसते. गुहेत लपलेली, आपल्या बाह्य चेतनेच्या पलीकडची श्वापदे अशावेळी कार्यान्वित होत असतात. एकेकाळी स्व-संरक्षणार्थ खणलेले खंदक जुन्या वेदना उगाळायला कारणीभूत ठरतात.

**हे ओळखायचे कसे?**

खालील वाक्यांश त्याकडे घेऊन जातात- शेवटी मी एकटाच ! किंवा माझ्या हातून काहीच चांगलं घडत नाही. किंवा आजकाल कोणी विश्वास ठेवायच्या लायकीचे राहिले नाहीत. हे फक्त नकारार्थी उदगार नसतात. आतल्या थरांमध्ये चाललेल्या उलाढाली असतात. अशावेळी हळुवार असं पहिल्यांदा कधी वाटलं होतं एवढी विचारणाही बांध फोडायला पुरेशी असते. माणसं आणि त्यांच्या प्रतिक्रियांमध्ये अंतर निर्माण करता आलं तरच ताणाला उत्तर देण्याचे निरामय प्रतिसाद गवसत जातात.

आपल्याला वाटतं खरं नसतं, प्रत्यक्षात नसतं या सत्याला सामोरे जायचे मनोधैर्य गोळा झाले की खपल्या धरायला वेळ लागत नाही. आपले अबोध वर्तन कोणतीही लज्जा अथवा शरम न बाळगता ओळखता आले तर जखमा भरून निघतात आणि समोरचे धुके विरते. बालपणापासून हृदयाच्या कोठडीत, मनाच्या तुरुंगात असह्य भीतीदायक अनुभवांची श्वापदे कोंडलेली असतात. त्या दूरगामी, दीर्घकालीन मानसशास्त्रीय समस्यांवर तोडगा काढायचा तर तितकेच प्रभावी उपचार गरजेचे असतात. आपल्या विचारांवर या बालपणीच्या क्रूर घटनांची सावली पडलेली असते आणि यंग, क्लोस्को व वाइशार यांचे संशोधन सांगते की त्यातून मानसिक विकारांची जडणघडण होते.

आयुष्याचे भीतीदायक चेहेरे मानवाच्या आकलन, भावना, स्मृती, सामाजिक जाणिवा, वर्तनशैली आणि समाजबंद यांच्यावर प्रभाव टाकतात. अशी माणसे घुमी बनतात, भेदरट असतात, अबोल बनतात, बुजतात आणि मनातल्या मनात कुढतात सुद्धा. अनैसर्गिक आणि भयावह अनुभवांची परिणिती स्कीमा या वर्तनात होते आणि जीवनभर आपले भावविश्व उध्वस्त करतात. त्यांच्या छायेतून बाहेर पडणे छळवादी असते. रुग्णाची जागरूकता वाढवून त्यांना स्वतःच्या विचारांवर आणि वर्तनावर ताबा कसा मिळविता येईल याचाच विचार उपचारांदरम्यान करावा लागतो.

**हे घाव भरून काढताना दोन टप्पे पार करावे लागतात-**

✻ अनुभवांची तीव्रता कमी करणे ✻ अधुऱ्या भावनिक गरजांची पूर्ती करणे

स्व-घातक विचारांचे नमुने, आत्मघातकी भावना आणि वर्तन यातून आपले इतरांशी नाते ठळक होत जाते. अपूर्ण भावनांची गरज आणि बालवयातील दाहक अनुभव यातून निर्माण होणारे संघर्ष कायम मनाच्या डोहात वसतीला असतात. यामुळे निरामयतेला तडे जातात आणि अनेक प्रकारच्या मानसिक अवस्थांना सामोरे जावे लागते. या उपचार पद्धतीनुसार पाच विस्तृत श्रेणींमध्ये जगभरात अठरा प्रकारच्या अशा अवस्था मानल्या गेलेल्या आहेत. त्यांची वैशिष्ट्ये-

१) **स्रोत** - बालवयात भयामुळे, तुलनेमुळे न्यूनगंड निर्माण होणे साहजिक असते. पौगंडावस्थेतही बेफिकिरी, वाईट वागणूक, दुर्लक्ष अशा गोष्टींची शिकार होताना अनेकजण दिसतात.

२) **विस्तार, व्यापकता** - हे तसं वरवरचं असतं. पण या चाळणीतून जाताना प्रत्येकजण आपल्या अनुभवांचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करीत असतो आणि इतरांच्या वागण्याकडे भिंग लावून न्याहाळत असतो.

३) **वर्तनविकृती** - मनात लपून बसलेल्या घटना, प्रसंग घातक असतात आणि त्यांचे विकृतीत रूपांतर झाले तर स्वभावात खूप फरक पडतो. उदा- गंमत म्हणून जरी लहानपणापासून घरचे तू आमची मुलगी नाहीस, तुला धान्य देऊन दारावर विकत घेतलंय असं चिडवत असतील तर अशी मुलगी आपल्या भावंडांचा दुस्वास करू लागते, आपण कोणालाच आवडत नाही असं तिच्या मनात घट्ट बसतं.

४) **उत्प्रेरणा** - मनाच्या गुहेत दडून राहिलेली जखमांची गाठोडी बरेचदा सुप्तावस्थेत असतात, पण त्यांना चिथावलं की दुष्परिणाम भोगायची तयारी ठेवावी लागते. एखाद्या विशिष्ट परिस्थितीने वा गप्पांनी ती दडलेली जखम ताजी होते.

५) **अयोग्य हाताळणी** - उत्प्रेरणेनंतर तीव्र भावनांचे उद्दीपन होऊ शकते आणि ती व्यक्ती तोल गमावून हिंस्र होऊ शकते. त्या अवस्थेतून परतणे वेळखाऊ आणि नुकसान करणारे असते.

**मानवी जीवनात वारंवार पुनरावृत्ती होणाऱ्या स्व-विनाशकारी कल्पना -**

याला अर्ली मालाडॅप्टव्ह स्कीमा (इएमएस) असा शास्त्रीय शब्द आहे. त्यांची विभागणी पाच क्षेत्रांमध्ये अशी केली जाते-

१) तुटकपणातून आलेले नकार

२) स्वायत्ततेवर बंधने आणि त्यांचा कार्यक्षमतेवरील परिणाम

३) अर्धवट सीमारेषा

४) बाह्यनियंत्रणातील वर्तन

५) अति काळजी आणि त्यापोटी दक्षता

अजाण वयात काही भूते नकळत मानगुटीवर स्वार होतात आणि त्यामुळे स्वतःवरच्या आस्थांकडे, आपल्या भोवतीच्या विश्वाकडे आणि इतरांच्या भावविश्वाकडे बघण्याची आपली नजर प्रदूषित होते.

आपण सजग असतो वरवर तरीही हे विचारांच्या आड दडून अव्याहत सुरु असते. त्यामुळे स्वतःकडून असलेल्या अपेक्षांवर, आपल्या नातेबंधांवर विरजण पडू शकते. नकळत त्यांच्या चौकटीचे भिंग वापरून आपण जीवनानुभवांकडे बघू लागतो आणि त्यांच्या परिप्रेक्ष्यात विचार करू लागतो.

ही निरगाठ नकारार्थीच असली पाहिजे असे नसते. डॉ जेफ्री यंग इएमएस चे एक प्रारूप सुचवितात आणि त्या नजरेने अशा अव्यक्त संघर्षांकडे बघण्याची नजर विकसित करावी लागते.

**थोडक्यात इएमएस म्हणजे-**

✻ एक संरचना

✻ संज्ञा, स्मरण, भावना, आकलन आणि देहाचे प्रतिसाद यांचे मिश्रण

✻ फक्त स्वतःच्या भिंगावर विश्वास असणे आणि त्यातूनच सगळी पारख करणे

✻ बालवयात सुरुवात असली तरीही जन्मभर पिच्छा पुरविणाऱ्या या वेदना असतात.

✻ वेळेत ओळखून काही उपचार केले नाहीत तर प्रमाणावर घात करू शकतात.

अर्थात इएमएस मध्ये एखादे विशिष्ट वर्तन अध्याहृत नसते कारण शेवटी वर्तन हा प्रतिसाद असतो, ठाण मांडून बसलेली प्रतिमा नसते.

**बालवयातील जुने सदोष साचे -**

**स्कीमा थेरपी :** ए प्रॅक्टीशनर्स गाईड या २००३ सालच्या पुस्तकानुसार (लेखक - यंग,क्लोस्को व वाइशार) अठरा प्रकारचे साचे मानवी मन घडवत असते. आणि त्यांतच नकळत/ जाणून-बुजून अडकून पडत असते.

(१) **पहिले क्षेत्र** - तुटकपणातून आलेले नकार

यामध्ये सामील असलेले पूर्वानुभव पाच प्रकारचे असतात :

(अ) त्यागणे, विसर्जित करणे, सोडून देणे

(ब) अविश्वास, शोषण, गैरवर्तन, पायमल्ली, हिंसा अत्याचार

(क) भावनिक अवमूल्यन, भावनांची कमतरता

(ड) सदोषता, उणीव, वैगुण्य, लज्जा, शरम, लांछन

(इ) सामाजिक बहिष्कार

(२) **दुसरे क्षेत्र**- स्वायत्ततेवर बंधने आणि त्यांचा कार्यक्षमतेवरील परिणाम

यामध्ये सामील असलेले पूर्वानुभव चार प्रकारचे असतात:

(अ) परावलंबित्व, अकार्यक्षमता

(ब) हानी/आजाराच्या असुरक्षिततेशी संबंधित भय ( वैद्यकीय, भावनिक, बाह्य घटक)

(क) भावनिक गुंतागुंत आणि अविकसित-स्व

(ड) अपयश, मनाजोगते दान पदरात न पडणे

(३) **तिसरे क्षेत्र** - अर्धवट सीमारेषा

यामध्ये सामील असलेले पूर्वानुभव दोन प्रकारचे असतात :

(अ) हक्क, अधिकार, भव्यतेचा देखावा, अनावश्यक मोठेपणा

(ब) अर्धवट, अपुरे स्व-नियमन

४) बाह्यनियंत्रणातील वर्तन

यामध्ये सामील असलेले पूर्वानुभव तीन प्रकारचे असतात :

(अ) अधीन असणे, वश असणे

(ब) स्वार्थत्याग

(क) मान्यता, मंजुरी, पाठिंबा, स्वीकृतीची आस

(५) अति काळजी आणि त्यापोटी दक्षता

यामध्ये सामील असलेले पूर्वानुभव चार प्रकारचे असतात :

(अ) नकारात्मकता

(ब) व्यक्त न होणे, स्वतःला रोखणे (आत्मविश्वासाच्या कमतरतेमुळे किंवा भीतीमुळे भावनिक संकोच)

(क) अवाजवी, अविचल, दृढ मानके

(ड) स्वतःला दंड, शिक्षा, ताडन करण्याची प्रवृत्ती

**या उपचारपद्धतीमध्ये चार टप्पे असतात-**

(अ) भावनांच्या मूलभूत गरजा

(ब) अव्यक्त,छुपे संघर्ष

(क) जुळवून घेणे

(ड) अठरा प्रकारच्या वेदना आणि त्यांची वाटा वळणे

खरंतर वरील प्रत्येक साच्याबद्दल सोदाहरण स्वतंत्र लिहिता येईल इतके ते अनुभव त्रस्त करणारे असतात. या लेखात फक्त पहिल्या दोन टप्प्यांविषयी संदर्भ आले आहेत. उरलेल्या दोघांबद्दल पुढील लेखात चर्चा करू या...

---

# इंदूरलाच स्वच्छ शहराचा पुरस्कार का?

**खाद्यप्रेमींचे शहर, संस्कृती आणि वारसा जपणारे क्षेत्र आणि मिनी मुंबई म्हणून ओळखले जाणारे शहर म्हणून इंदूरची ओळख आहे. अहिल्याबाई होळकर यांची ही कर्मभूमी. या शहराने देशात आठव्यांदा स्वच्छ शहराचा पहिल्या क्रमाकांचा पुरस्कार मिळविला. शहर स्वच्छ होते, तेव्हा ते पर्यावरणही राखले जाते आणि लोकांचे आरोग्यही उत्तम राहते. इंदूरने हे यश कसे मिळविले, यावर टाकलेला प्रकाशझोत.**





पर्यावरण
मिलिंद बेंडाळे

केंद्रीय नगरविकास मंत्रालयाने स्वच्छ सर्वेक्षण २०२४ मध्ये अनेक वर्षांपासून अव्वल स्थानावर असलेल्या शहरांसाठी 'सुपर स्वच्छता लीग' सुरू केली. त्यामुळे प्रत्येक वेळी अव्वल स्थानी असलेल्या शहरांनी आपली कार्यपद्धती आणखी बदलावी आणि स्वच्छ सर्वेक्षणात इतर शहरांशी स्पर्धा करावी, अशी योजना आखण्यात आली. यामुळे अधिक सुधारणा होईल, असे अपेक्षित आहे. अशा या सुपर स्वच्छता लीगमध्येही आधीच देशातले सर्वात स्वच्छ शहर म्हणून चर्चेत राहिलेले इंदूर अव्वलस्थानी राहिले.

इंदूरची ही कामगिरी केवळ एक प्रशासकीय प्रयत्न नाही, तर तेथील प्रत्येक नागरिकाच्या सामूहिक जबाबदारीची शर्यत आहे. माळवा प्रांतातील इंदूरचे वैशिष्ट्य असे की, या शहराचे प्रशासक जे काही ठरवतात, ते साध्य केले जाते. इंदूरने तीन 'आर'वर काम केले. रिड्यूस, रीयूज आणि रीसायकल; पण आता आणखी एका आर म्हणजेच 'रिप्रोड्यूस'वरही लक्ष केंद्रित केले जात आहे. इंदूरमध्ये कचऱ्यापासून नवीन उपयुक्त ेष्टी बनवल्या जातात. सेंद्रिय कचऱ्यापासून खते बनवली जातात. प्लॅस्टिक आणि इतर निरुपयोगी वस्तूंचा पुनर्वापर करून नवी उत्पादने बनवली जातात. इंदूरमध्ये कचरा आता नाव-ालाही राहिला नाही. कारण तो उत्पन्नाचा स्रोत बनला आहे. इंदूर महानगरपालिकेने 'झिरो लँड फ्री सिटी'च्या दिशेने पावले उचलली आहेत. याद्वारे प्रक्रिया केल्यानंतर उरलेल्या निरुपयोगी सुक्या कचऱ्यापैकी सुमारे पाच टक्के जमिनीखाली गाडून एक थर तयार केला जात आहे. यामुळे जमीन भरण्यास मदत होते. महानगरपालिका कचऱ्यापासून वीजनिर्मिती करण्याचाही प्रयत्न करत आहे. या सर्व प्रयत्नांची गाथा विशेष बोलकी आहे. अलिकडेच इमारत बांधकाम क्षेत्रात प्रक्रिया केलेल्या गटाराच्या पाण्याचा वापर करून इंदूरमध्ये चांगली सुरुवात करण्यात आली आहे. त्याचे चांगले परिणाम मिळत आहेत आणि पैसेही मिळत आहेत. इंदूरमधील घरांच्या बाथरूम आणि स्वयंपाकघरातील सांडपाण्याचा योग्य वापर हेदेखील एक मोठे यश आहे. इंदूरच्या स्वच्छतेच्या यशामागे कठोर परिश्रम आहेत. त्याची खरी सुरुवात १९१३ मध्ये होळकर राज्यात झाली. तेव्हा शहरात कचरा टाकणाऱ्या लोकांना दंड आकारण्यात येऊ लागला. १९७०-८० च्या दशकात इंदूर नवीन आकार घेत होते आणि वसाहती उभ्या राहात होत्या. तेव्हाही स्वच्छतेला खूप महत्त्व दिले जात होते.

२०१४ नंतर देशात पहिल्यांदाच स्वच्छ शहर पुरस्कार सुरू झाला, तेव्हा इंदूरच्या वसाहती स्वच्छतेसाठी सुरू झालेल्या राष्ट्रीय मोहिमेचा एक भाग बनल्या. भारतात पहिल्यांदाच प्रत्येक घरातून कचराकुंड्यांमध्ये कचरा गोळा करण्याची मोहीम इंदूरमधूनच सुरू झाली. ती एक मैलाचा दगड ठरली. नंतर ओला आणि सुका कचरा वेगळा गोळा करण्यास सुरुवात झाली. ओल्या कचऱ्याच्या शुद्धीकरणासाठी जवळ प्लांट उभारण्यात आले. इंदूरमध्ये दिल्लीसह इतर अनेक महानगरांप्रमाणे देवगुराडिया गावाजवळ कचऱ्याचे ढीग होते. त्याची दुर्गंधी सुटायची. १५ लाख टन कचरा हटवण्याच्या सुरुवातीच्या उपक्रमामुळे सर्वांचे लक्ष इंदूरकडे वेधले गेले आणि २०१७ मध्ये पहिल्यांदाच इंदूरने देशातील सर्वात स्वच्छ शहराचा किताब जिंकला; केवळ जिंकला नाही तर आजपर्यंत कायम ठेवला. इंदूर महानगरपालिकेचे वार्षिक बजेट आठ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे. यामध्ये दोन हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम स्वच्छतेसाठी खर्च केली जात असल्याचे सांगितले जाते. यामध्ये पगार आणि इतर विविध खर्चदेखील समाविष्ट आहेत. येथील लोकांकडून अगदी नाममात्र वापरकर्ता शुल्क वसूल केले जाते. झोपडपट्टीवासीयांकडून ६० रुपये, मध्यम वर्गीयांकडून ९० रुपये आणि श्रीमंतांकडून १५० रुपये मासिक शुल्क घेतले जाते. हे केवळ लोकसहभागच नाही, तर जबाबदारी निर्माण करते. शहर स्वच्छतेत अव्वल असल्याने लोकांची मानसिकता बदलली आहे. स्वच्छतेचा संस्कार इंदूरच्या लोकांमध्ये इतका रुजला आहे की, ते स्वतः कचरा इकडे तिकडे टाकत नाहीत आणि इतरांनाही टाकू देत नाहीत.

रस्त्यांवर इकडे तिकडे थुंकण्याची लोकांची सवयही बदलली आहे. लोकांच्या जीवनमानात सुधारणा होण्यासोबतच इतर फायदे दिसून येत आहेत. रिअल इस्टेटचे दर वाढत असताना गुंतवणूकदार इंदूरकडे आकर्षित होत आहेत. इंदूर हे इतर शहरांसाठी एक उदाहरण बनले आहे. देशातील सुपरक्लीन शहरांमध्ये इंदूर प्रथम आले आहे, तर सुरत दुसऱ्या स्थानावर आहे. नवी मुंबई शहर तिसऱ्या स्थानावर आहे. देशातील सर्वात स्वच्छ शहर म्हणून इंदूरची निवड होण्याची ही सलग आठवी वेळ आहे. इंदूरची स्वच्छता यात्रा हा केवळ प्रशासकीय प्रयत्न नाही, तर जनतेच्या सहभागाने मिळालेले मोठे यश आहे. इंदूर स्वच्छतेत आठव्यांदा अग्रेसर राहिले. कारण हा केवळ एक संकल्प नाही, तर संपूर्ण शहराच्या सामूहिक शक्तीचा पुरावा आहे. इंदूरने स्वच्छतेमध्ये असे अनेक नवोपक्रम केले आहेत, जे देशातील इतर कोणत्याही शहरात केले गेले नाहीत. इंदूर 'झिरो वेस्ट वॉर्ड', 'सेल्फ सस्टेनेबल झोन' या सारख्या नवीन उपक्रमांवर काम करत आहे. आता शहरात मागणीनुसार कचरा संकलन सुरू झाले आहे. येत्या काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाराणसी लोकसभा मतदारसंघात स्वच्छतेचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी इंदूर महानगरपालिका भागीदार बनेल.

इंदूर आणि वाराणसी महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापनासाठी एकत्र काम करतील. मंदिरे, गंगा घाट इत्यादी स्वच्छतेमध्ये इंदूरचे स्वच्छता मॉडेल राबविण्यात येणार आहे. महानगरपालिकेने शहराच्या सुशोभीकरणाकडेही विशेष लक्ष दिले आहे. महानगरपालिकेने शहराच्या सौंदर्याला बाधा पोहोचणाऱ्या सर्व ठिकाणी रंगकाम, सर्जनशील गोष्टी बनवणे, भिंती आणि घरांवर घोषवाक्य लिहिणे अशी कामे केली. शहरातील चौक, बसस्थानक, विमानतळ आणि सार्वजनिक वाहतुकीच्या प्रमुख ठिकाणी विशेष सजावट करण्यात आली. महानगरपालिकेने शहरातील रस्त्यांवरील कचराकुंड्यांमधून नियमित कचरा गोळा करण्यावरही विशेष भर दिला. शहरातील रस्ते स्वच्छ करण्यासाठी परदेशातून यंत्रे मागवण्यात आली. प्रक्रिया केलेले पाणी विकण्यास सुरुवात करणारे इंदूर हे मध्य प्रदेशमधील पहिले शहर आहे. शहरातील रहिवासी ३११ या ॲपवर कॉल करून प्रक्रिया केलेले पाणी मागवू शकतात आणि ते इमारत बांधकामात वापरू शकतात. अशा प्रकारे घरांमधील बाथरूम आणि स्वयंपाकघरांमधून बाहेर पडणारे घाणेरडे पाणीदेखील महानगरपालिकेसाठी उत्पन्नाचे साधन बनले आहे. आतापर्यंत हे दूषित पाणी इंदूरसाठी एक समस्या होती; परंतु महानगरपालिकेने पुनर्वापर केलेले पाणी विकण्यास सुरुवात केली. शहरात मेट्रो प्रकल्प बांधणाऱ्या दोन कंपन्यांनी महानगरपालिकेकडून दररोज एक लाख लिटर पाणी विकत घेतले.

महानगरपालिकेने कंपन्यांना प्रति हजार लिटर १.४० रुपये दराने पाणी विकले. शहरात दररोज ३०० एमएलडी पाण्यावर प्रक्रिया केली जाते. आज इंदूरमध्ये आशियातील सर्वात मोठा बायो सीएनजी प्लांट आहे. केवळ देशच नाही, तर जगातील इतर देशांतील शिष्टमंडळे ते पाहण्यासाठी आली आहेत. शहरी गृहनिर्माण आणि विकास मंत्रालयानेही देशभरात ते लागू करण्याचे निर्देश दिले आहेत. हे कचऱ्यापासून संपत्तीचे एक चांगले उदाहरण आहे.

इंदूरच्या जनसहभाग मॉडेलचे देशभर कौतुक केले जाते. नवोपक्रमांची मालिका, परस्पर समन्वय आणि काही तरी नवीन करण्याची आवड इंदूरला इतर शहरांपेक्षा पुढे ठेवते. आज जेव्हा इतर शहरे पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या स्थानासाठी संघर्ष करत असताना इंदूरने सलग आठ वर्षे अव्वल स्थानावर राहून विशेष यश संपादन केले आहे. इंदूर महानगरपालिकेने कचरा शुल्कातून सुमारे ४० कोटींचे उत्पन्न मिळविले. एवढेच नाही तर, कचऱ्यापासून तयार केलेल्या कच्च्या मालातून दरवर्षी १.५ कोटी रुपये कमावले. इंदूर महानगरपालिकेची स्वच्छतेची व्यवस्था इतकी पद्धतशीर आणि जलद आहे की शहरात घाण दिसत नाही. लोक प्रशासनाला चांगले सहकार्य करतात आणि कचरा पसरवत नाहीत. अनेक शहरांमध्ये लग्न, समारंभ, सभा, रॅलीनंतर वापरलेले ताट, कचरा इत्यादी फेकून दिले जाते. इंदूरमध्ये प्रत्येक लहान- मोठ्या कार्यक्रमानंतर लगेच स्वच्छता केली जाते. शहरातील लोकांनाही आता स्वच्छतेची सवय झाली आहे. येथील लोकांमध्ये सर्वाधिक जागरूकता दिसून येते. लोक त्यांच्या वाहनांमध्ये कचराकुंडी घेऊन जातात. एखादी व्यक्ती रस्त्यावर कचरा पसरवत असल्यास नागरिक त्यांना कचरा उचलून कचराकुंडीत टाकण्यास सांगतात.

(लेखक वन्यजीव आणि पर्यटनविषयक)

**एखादी दुर्घटना किती कमी काळात आकाराला येते आणिबघता बघता होत्याचे नव्हते करते, याचा अनुभव उत्तराखंडच्या धरालीमध्ये अलिकडेच आला. जोशीमठ तसेच अन्य ठिकाणच्या निसर्गाच्या रौद्र रुपाच्या आठवणी त्यामुळे ताज्या झाल्या. अशा घटनांचे प्रमाण वाढले असून निसर्गाशी केलेली प्रतारणा त्याला कारणीभूत आहे. अजूनही वेळ गेलेली नाही. निसर्गाशी केलेली छेडछाड न थांबवल्यास तडाख्यामागून तडाखे बसत राहतील.**



# गंगा ठरली मृत्युदूत

दखल
उर्मिला राजोपाध्ये

उत्तराखंडमधील उत्तरकाशी जिल्ह्यातील धराली गावात आलेला विनाशकारी पूर ढगफुटीमुळे नव्हता. हा पूर वरच्या प्रवाहातील हिमनदी तुटल्याने किंवा हिमनदी तलाव फुटल्याने झाला, असे तज्ज्ञांचे मत आहे. यापूर्वी ढगफुटीचा संशय होता; परंतु हवामान विभाग आणि उपग्रहाकडून मिळालेल्या माहितीचा अभ्यास करणाऱ्या तज्ज्ञांनी आता त्याबाबत स्पष्टीकरण दिले आहे. पर्वतांवर बर्फ वितळतो, पाणी साचते आणि अचानक खाली वाहते, तेव्हा पूर येऊ शकतो. मुसळधार पाऊस न पडताही हे घडू शकते. एकीकडे बचावकार्य सुरू असताना दुसरीकडे शास्त्रज्ञ या ५७ सेकंदांच्या घटनेमागच्या कारणांचा अभ्यास करत होते.

मोठे हिमस्खलन, हिमनदी फुटणे किंवा वरच्या प्रवाहातील तलाव फुटणे याचा तपास करत होते. हवामान विभागाने म्हटले आहे की, आपत्तीच्या वेळी खूप कमी पाऊस पडला होता. यामुळे ढगफुटीबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. मंगळवारी येथिल हर्षिल भागामध्ये फक्त ६.५ मिलीमीटर पाऊस पडला. २४ तासांमध्ये हर्षिलमध्ये ९ मिलीमीटर आणि भटवाडीमध्ये ११ मिलीमीटर पाऊस पडला. हा पाऊस खूपच कमी आहे, तरीही हिमनदी फुटल्यामुळे मोठे नुकसान झाले. उपग्रह प्रतिमांवरून असे दिसून आले की, बाधित क्षेत्राच्या अगदी वर अनेक हिमनद्या आणि किमान दोन हिमनदी तलाव आहेत. हिमनदी

तलाव फुटल्याने किंवा हिमनदी फुटल्याने अचानक पाणी बाहेर आल्याने मोठा पूर आला असावा. ही घटना फेब्रुवारी २०२१ मध्ये चमोली येथे झालेल्या रैनी आपत्तीची आठवण करून देते. रैनीची घटना खडक आणि बर्फाच्या हिमस्खलनामुळे झाली होती. यामुळे पूर आला आणि ऋषिगंगा जलविद्युत प्रकल्प उद्ध्वस्त झाला तसेच तपोवन-विष्णुगड वीज प्रकल्पाचेही मोठे नुकसान झाले. त्या घटनेत २०० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला.

वाडिया हिमालय भूगर्भशास्त्र संस्थेच्या मते उत्तराखंडमध्ये १,२६६ हिमनदी तलाव आहेत. यामध्ये लहान-मोठे जलाशय समाविष्ट आहेत. यापैकी अनेक तलाव खालच्या भागात राहणाऱ्या लोकांसाठी धोका निर्माण करू शकतात. राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने १३ हिमनदी तलावांना उच्च धोका श्रेणीत टाकले आहे. त्यापैकी पाच अत्यंत धोकादायक मानले गेले आहेत. उत्तराखंडमधील उत्तरकाशी जिल्ह्यातील धारली येथे अलिकडेच झालेल्या ढगफुटीमुळे झालेल्या प्रचंड विध्वंसामुळे २०१३ च्या केदारनाथ आपत्ती आणि २०२१ च्या ऋषिगंगा आपत्तीच्या भयानक आठवणींना उजाळा दिला.

केदारनाथ आणि ऋषिगंगा येथील पुरांप्रमाणेच धरालीच्या खीरगंगा नदीत पाणी आणि ढिगाऱ्याच्या विनाशकारी पुराने काही क्षणातच मोठी हॉटेल्स आणि घरे वाहून नेली. गंगोत्री धामच्या मार्गावर असलेला हा सुंदर परिसर क्षणार्धात ढिगाऱ्याखाली गाडला गेला. हिमाचल प्रदेशमध्ये ढगफुटी आणि प्रपाताच्या घटना वारंवार घडतात. १९७८ मध्ये यात शेकडो लोक मृत्युमुखी पडले. १९९१ मध्ये ७६८ तर २०२२ मध्ये २२ लोक मृत्युमुखी पडले. उत्तरकाशीच्या जखमा ताज्या आहेत. ४७ वर्षांनंतर ऑगस्टमध्ये, निसर्गाने विनाशाचे तेच चित्र पुन्हा दिसले. १९६० मध्ये टिहरी संस्थानापासून वेगळे झाल्यानंतर उत्तरकाशी हा एक वेगळा जिल्हा बनला. तेव्हापासून या जिल्ह्याने अनेक दुर्घटना पाहिल्या आहेत.

उत्तरकाशीला आपत्तींचा काळोखा इतिहास आहे. दरवर्षी निसर्गरम्य उत्तरकाशीला भेट देण्यासाठी पर्यटक येतात. येथे राहणाऱ्या स्थानिक लोकांनी अनेक वेळा निसर्गाचे भयंकर रूप पाहिले आहे. आताही उत्तरकाशीच्या धराली गावात खीर गंगेचे भयंकर रूप दिसले. यापूर्वी ६ ऑगस्ट १९७८ रोजी धराली गावाच्या काही किलोमीटर खाली एका लहान कनोडिया गडानेही भयंकर रूप धारण केले होते. डबरानीमध्ये गंगेचा प्रवाह थांबवला होता. आजही खीर गंगेतील पाणी दुप्पट वेगाने वाहत असते, तर परिस्थिती अगदी ६ ऑगस्ट १९७८ सारखी झाली असती. ४७ वर्षांनंतर येथे पाणी मृत्युदूत म्हणून प्रकट झाले आहे. खीर गंगेचे पाणलोट क्षेत्र खूप विखुरलेले असून उतार तीव्र आहे. अशी अरुंद दरी ढगफुटीसाठी अनुकूल वातावरण निर्माण करते. कमी प्रमाणात असला, तरी पाण्याचा वेग इतका प्रचंड असतो की दोन्ही काठांवरून कचरा, खडे, दगड वाहून नेतो. यामुळे नदीच्या प्रवाहाची प्राणघातक क्षमता वाढते. धराली गाव उंचीवर होते; पण आता पर्यटन आणि आधुनिकतेमुळे लोक खालच्या खोऱ्यात स्थायिक झाले आहेत. अनेक लोकांनी रोजगारासाठी येथे 'होम स्टे' बांधले आहेत. पूर्वी येथे इमारती बांधण्याऐवजी घाट आणि घरटे असायचे. आता नदीच्या नैसर्गिक पूर क्षेत्रात बहुतेक नवीन इमारती आणि 'होम स्टे' बांधले आहेत. खीर गंगेच्या दोन्ही बाजूंची ही वस्ती २०-३० वर्षांहून अधिक जुनी असावी. भविष्यात हे ठिकाण धोक्यात येऊ शकते. कारण ढिगाऱ्यांमुळे ते उथळ झाले आहे. उत्तरकाशी हा भूकंपाच्या दृष्टिकोनातून एक संवेदनशील जिल्हा आहे. कारण तो संवेदनशील झोन-४ आणि ५ मध्ये आहे. २० ऑक्टोबर १९९१ रोजी उत्तरकाशीमध्ये ६.८ तीव्रतेच्या भूकंपाने कहर केला. या विनाशकारी भूकंपात उत्तरकाशीमध्ये ७६८ लोकांचा मृत्यू झाला. त्यानंतर २९ मार्च १९९९ रोजी ६.८ रिस्टर स्केल तीव्रतेचा भूकंप झाला. २००९ मध्ये ५.७, २०११ मध्ये ५.७ आणि २०१५ मध्ये ७.८ तीव्रतेचा भूकंप झाला.

गेल्या १०० वर्षांमध्ये शेकडो भूकंपांनी लोकांची मने हादरवून टाकली आहेत. कधी भूस्खलन तर कधी हिमवादळांनी सामान्य जीव उद्ध्वस्त केले आहेत. उत्तराखंडमध्ये उंचावर असलेल्या उत्तरकाशी जिल्ह्यात पूर, भूकंप आणि भूस्खलन आणि इतर अनेक आपत्ती आल्या आहेत. २२ वर्षांपूर्वी भूस्खलनाचे ढिगारे आणि पर्वतावरून मोठे दगड पडल्याने मोठ्या संख्येने लोकांचे जीवन विस्कळीत झाले होते. २००३ मध्ये मस्जिद मोहल्ला, गोफियारा परिसरात आणि तांबखानी रोडवर मोठे दगड पडले. त्यात भटवाडी रस्त्यावरील अनेक बहुमजली घरे जमीनदोस्त झाली. त्यानंतर लोकांना तेथून सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले. २०१२ मध्येही प्रचंड विनाश झाला. यानंतर २०१२-१३ मध्ये जिल्हा मुख्यालयातील अस्सी गंगा आणि भागीरथी नदीत आलेल्या पुराचे पाणी मृत्युदूत ठरले. १८ ऑगस्ट २०१९ रोजी उत्तरकाशीच्या मोरी ब्लॉकमधील अराकोट बांगण भागात आलेल्या आपत्तीने प्रचंड कहर केला. अनेक लोकांच्या मृत्यूसोबतच शेती आणि पायाभूत सुविधा नष्ट झाल्या. त्याच वेळी २०२२ मध्ये दौप्रदीच्या दांडा येथे हिमवादळ आले. त्यात सुमारे २९ गिर्यारोहकांना जीव गमवावा लागला. २०२३ मध्ये उत्तरकाशीच्या सिल्कयारा येथे बांधकामाधीन बोगदा भूस्खलनामुळे बंद करण्यात आला होता. त्यात ४१ कामगार १७ दिवस जीवन-मृत्यूशी झुंज देत होते. त्यानंतर परवा विजेच्या वेगाने आलेल्या पुराने अवघ्या ५८ सेकंदांमध्ये संपूर्ण गाव गिळंकृत केले. गावात अनेक मीटर कचरा जमा झाला. काही घरे ढिगाऱ्याखाली पूर्णपणे गाडली गेली. त्यांचे नाव आणि ओळख पुसली गेली. कुणालाही सावरण्याची संधी मिळाली नाही. शासनातर्फे वेळ वाया न घालवता पीडितांना सर्वतोपरी मदत करण्याचे निर्देश देण्यात आले. काही वेळातच धराली बाजारपेठेतील हॉटेल्स, दुकाने आणि लोकांची घरे पुराने वाहून नेली. पुराच्या मार्गात आले ते उद्ध्वस्त झाले. खीर गंगा नदीतून डोंगरावरून येणारा पूर क्षणार्धात भागीरथी नदीत विलीन झाला; परंतु या काळात त्याने कहर केला.

उत्तरकाशीमध्ये विध्वंस झाला, तो भाग चार धाम यात्रेशी जोडला गेला आहे. आता धराली गावात सर्वत्र विनाशाच्या खुणा दिसत आहेत. खीरगंगा नदीतून डोंगरावरून खाली आलेल्या ढिगाऱ्याने गावाचे दोन भाग केले. गावातील बहुसंख्य घरे लाखो टन ढिगाऱ्याखाली दबली गेली आहेत. नदीतील पूर आणि ढिगाऱ्याने या गावाचे अस्तित्व नष्ट केले. गावात यापूर्वी कधीही अशी आपत्ती आली नव्हती. घरे आणि हॉटेल्स गवतासारखी वाहून गेली नव्हती. या आपत्तीने केवळ उत्तराखंडमध्येच नव्हे, तर देशभरात दहशत निर्माण केली.





परराष्ट्रकारण
पार्थ कपोले

**भारताचे लष्करप्रमुख आणि हवाईदल प्रमुख यांनी नुकत्याच केलेल्या वक्तव्यांमुळे, 'ऑपरेशन सिंदूर'ची यशस्विता निश्चितच प्रकर्षाने अधोरेखित झाली. पण, दि. ७ मे रोजी सुरू झालेल्या 'ऑपरेशन सिंदूर'ला आता तीन महिने उलटले असून, दक्षिण आशियातील लष्करी समीकरणांमध्ये मोठा बदल दिसून येत आहे. त्याचे केलेले हे आकलन...**

# ऑ. सिंदूर; द.आशियातील नवे सामरिक समीकरण

पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ नागरिकांचा बळी गेल्यानंतर, भारताने पाकिस्तानविरोधात 'ऑपरेशन सिंदूर' ही जलद आणि ठोस प्रत्युत्तराची कठोर कारवाई केली. प्रारंभी दहशतवादाला चाप लावण्यासाठीची तातडीची मोहीम म्हणून याकडे पाहिले जात होते. मात्र, त्यानंतर घडलेल्या घटनांमधून हे स्पष्ट झाले की, ही केवळ एक दहशतवादाविरोधी कारवाई नव्हती, तर ती भारताच्या लष्करी क्षमतांना नव्या उंचीवर नेणारा आणि शत्रू राष्ट्रांच्या युद्धनीतीला प्रत्युत्तर देणारा व्यापक धोरणात्मक टप्पा होता.

दि. ६ ऑगस्ट रोजी संरक्षण मंत्रालयाने तब्बल ६७ हजार कोटी रुपयांच्या शस्त्र खरेदी प्रस्तावांना प्रारंभिक मान्यता दिली. यामध्ये तिन्ही सैन्य दलांसाठी ८७ स्वदेशी 'एमएएलई' (मीडियम अल्टिट्यूड लॉन्ग एन्ड्युरन्स) सशस्त्र ड्रोनची खरेदी, ११० हून अधिक हवाई प्रक्षेपणक्षम 'ब्रह्मोस' सुपरसॉनिक क्षेपणास्त्रांचा समावेश आहे. याच 'ब्रह्मोस' क्षेपणास्त्रांचा वापर 'ऑपरेशन सिंदूर'दरम्यान पाकिस्तानातील रडार केंद्रे आणि हवाई तळांवर प्रहार करण्यासाठी झाला होता. याशिवाय नौदलासाठी पाणबुडीविरोधी मोहिमांसाठी युद्धनौका, पर्वतीय भागातील हवाई देखरेख वाढविण्यासाठी पर्वतीय रडार, साक्षम/स्पायडर हवाई संरक्षण प्रणालीचे अद्ययावत करणे, तसेच गुप्त स्वरूपातील उच्च-तंत्रज्ञानावर आधारित गुप्तचर, निरीक्षण, लक्ष्यभेदन आणि इलेट्रॉनिक युद्ध क्षमता वृद्धी करणाऱ्या प्रणालींचा समावेश आहे. या खरेदींची गती व व्याप्ती हे केवळ नियमित आधुनिकीकरणाचे उदाहरण नाही, तर 'ऑपरेशन सिंदूर'मधून मिळालेल्या प्रत्यक्ष अनुभवावर आधारित त्वरित बदलांचे निदर्शक आहे. विशेष म्हणजे, पाकिस्तानच्या लष्करी सज्जतेमध्ये चीनचा वाढता हस्तक्षेप आणि त्यातून या दोन्ही देशांच्या पोकळ दाव्यांवर मात करण्यासाठी, भारताने जलद गतीने युद्धक्षेत्रावर दीर्घकालीन दबाव निर्माण करण्याच्या दिशेने पावले उचलली आहेत.


दि. २२ एप्रिल रोजीच्या हल्ल्यानंतर केवळ दोन आठवड्यांत सुरू झालेल्या 'ऑपरेशन सिंदूर'दरम्यान भारतीय हवाई दलाने 'ब्रह्मोस' क्षेपणास्त्रांचा वापर करून पंजाब आणि सिंधमधील पाकिस्तानी रडार केंद्रे निष्क्रिय केली. तसेच, इलेट्रॉनिक जॅमिंग मोहिमा राबविल्या. या अचूक लांब पल्ल्याच्या हल्ल्यांनी पाकिस्तानच्या लष्करावर मोठा मानसिक दबाव आणला. चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ जनरल अनिल चौहान यांनी यावर भाष्य करताना 'विघटनकारी तंत्रज्ञानाशी जलद जुळवून घेण्याची गरज' अधोरेखित केली.

दरम्यान, पाकिस्तानने चीनकडून लष्करी मदत झपाट्याने वाढविली आहे. 'झेड-१० एमई' बहुउद्देशीय हल्लेखोर हेलिकॉप्टर, जे चीनच्या स्वतःच्या मॉडेलपेक्षाही अधिक प्रगत असल्याचे मानले जाते, पाकिस्तानात दाखल झाले आहेत. उच्च उंचीवरील युद्धासाठी तयार केलेली ही हेलिकॉप्टर अत्याधुनिक 'एव्हिऑनिस', 'कंपोझिट आर्मर', 'प्रिसिजन स्ट्राईक' क्षेपणास्त्रे आणि इलेट्रॉनिक प्रतिकार प्रणालीसह येतात. त्याशिवाय, '४० जे-३५ स्टेल्थ फायटर्स', 'शान्शी केजे-५०० एईडब्ल्यूॲण्डसी विमाने' आणि 'एचयू-१९' क्षेपणास्त्रविरोधी प्रणाली पाकिस्तानकडे येण्याची प्रक्रिया सुरू आहे.

चीनच्या उच्चस्तरीय लष्करी नेतृत्वाने, ज्यामध्ये केंद्रीय लष्करी आयोगाचे उपाध्यक्ष झांग योशिया यांचा समावेश आहे. पाकिस्तानच्या लष्करी प्रमुखांशी सलग बैठक घेऊन हा धोरणात्मक सहयोग दृढ केला आहे. या सगळ्याचा भारतासाठी अर्थ स्पष्ट आहे; चीन आणि पाकिस्तान यांच्यातील लष्करी संघर्ष आता केवळ कागदावर नाही, तर प्रत्यक्ष रणांगणावर दिसत आहे. पाकिस्तान चीनसाठी केवळ एक ग्राहक राष्ट्र न राहता, त्याच्या प्रगत शस्त्रास्त्रांचे परीक्षणक्षेत्र आणि भारताविरुद्धचा दबावबिंदू बनत आहे. परिणामी, भारतासाठी दोन आघाड्यांचा धोका अधिक ठळक बनत आहे. भारतीय सैन्यदलांचा प्रत्युत्तर दृष्टिकोनही तितकाच स्पष्ट आणि कणखर आहे.

लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी 'ऑपरेशन सिंदूर'ला 'ग्रे झोन'मधील उच्च-धोरणात्मक बुद्धिबळाचा खेळ म्हटले आहे, जेथे प्रत्येक चाल नियोजनपूर्वक होती. या मोहिमेत पाकिस्तान व पाकिस्तानाधीन काश्मीरमधील नऊ दहशतवादी ठिकाणांवर हवाई हल्ले करून १०० हून अधिक दहशतवाद्यांचा अंत करण्यात आला. हवाई दलप्रमुख एअर चीफ मार्शल ए. पी. सिंह यांनी 'ऑपरेशन सिंदूर'मधील अद्वितीय हवाई यश उघड केले. पाच पाकिस्तानी लढाऊ विमाने आणि एक मोठे विमान (बहुधा एईडब्ल्यूॲण्डसी) पाडण्यात आले, जे भारताच्या इतिहासातील सर्वांत मोठे पृष्ठभागते हवा यश आहे. शाहबाज जेकबाबाद हवाईतळावरील 'एफ-१६ हँगर' अंशतः उद्ध्वस्त झाला, ज्यामध्ये काही विमानांचे नुकसान झाले असण्याची शयता आहे. यातील 'एफ-१६' लढाऊ विमानांचे नुकसान हा केवळ पाकिस्तानसाठी धक्का नाही, तर अमेरिकन शस्त्रास्त्र उद्योगासाठीही तो मोठा आघात ठरला आहे. 'एफ-१६' हे अमेरिकेच्या संरक्षण उद्योगाचे दीर्घकाळचे प्रतीक आणि अनेक देशांच्या हवाई दलाचे आधारस्तंभ आहे. 'ऑपरेशन सिंदूर'मुळे या विमानांच्या अभेद्यतेबद्दल शंका निर्माण झाली आहे.

अमेरिकेच्या शस्त्र लॉबीचा 'इगो' दुखावला गेला असून, यामुळे भारताने जागतिक शस्त्रास्त्र बाजारपेठेत एक नवीन समीकरण निर्माण केले आहे. हा बदल केवळ भारताच्या लष्करी क्षमतेमुळेच नव्हे, तर त्याच्या भूराजकीय स्थानामुळेही महत्त्वाचा ठरत आहे. अनेक विश्लेषकांचे मत आहे की, डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर आयातशुल्क लादण्याचा मुद्दा आक्रमकपणे ताणण्यामागे या घटनेचाही सूक्ष्म प्रभाव असू शकतो. कारण, अमेरिका आपली शस्त्र प्रतिष्ठा टिकवून ठेवण्यासाठी राजकीय दबावाचा वापर करते. 'ऑपरेशन सिंदूर' हे केवळ दहशतवादाविरोधी कारवाई नव्हती, तर दक्षिण आशियातील सामरिक शक्तिसंतुलनाला बदलणारे निर्णायक पाऊल होते. चीन-पाकिस्तान लष्करी आघाडी, प्रगत शस्त्रास्त्रांची देवाणघेवाण आणि रणांगणावर त्यांचा प्रत्यक्ष वापर, यामुळे भारतासाठी दोन आघाड्यांचा धोका ठळक झाला आहे. भारताने घेतलेली जलद शस्त्र खरेदी आणि तंत्रज्ञान उन्नती ही केवळ प्रत्युत्तर नाही, तर दीर्घकालीन सामरिक वर्चस्वासाठीची गुंतवणूक आहे. 'एफ-१६' विमानांचे नुकसान हे आंतरराष्ट्रीय शस्त्रास्त्र बाजारपेठेत भारताचा प्रभाव वाढवणारे ठरले असून, अमेरिकन संरक्षण उद्योगाच्या प्रतिष्ठेला धक्का बसला आहे. पुढील काळात हा शस्त्र स्पर्धेचा प्रवास थांबेल की, अधिक तीव्र होईल, हा दक्षिण आशियाच्या सुरक्षेतील सर्वांत महत्त्वाचा प्रश्न असेल.




# 'ट्रेंड'चा जीवघेणा मोह...

प्रसूती ही एक अशी प्रक्रिया, जी मानवीसृष्टीमध्ये सृजनाच्या अविष्काराचे दर्शन घडवते. पण, त्याचवेळी आई आणि बाळ या दोघांच्या आयुष्याला धोकाही असतो. म्हणून प्रसूतीला स्त्रीचा पुनर्जन्म मानले जाते. प्रसूतीची चर्चा करण्यास कारणीभूत ठरलेली एक नुकतीच घडलेली घटना म्हणजे, 'इन्स्टाग्राम' मान्यताप्राप्त म्हणून नावाजलेल्या 'फ्रीबर्थ' पद्धतीचा अवलंब केल्याने एका महिलेला तिचे तान्हे गमावण्याची वेळ आली. नऊ महिने सांभाळलेला तो पोटचा गोळा अशा पद्धतीने काळाचा घास होणे हे सर्वस्वी क्लेषकारकच! पण, सहानुभूती आणि सांत्वनेच्या पलीकडे जाऊन विचार केल्यास समाजमाध्यमांच्या दुष्प्रभावाचा वाढता धोका इथे ठळक दिसतो. 'फ्रीबर्थ' पद्धतीने प्रसूती केल्यावर दुर्दैवाने नवजात बाळाचा मृत्यू होणे, ही केवळ वैयक्तिक शोकांतिका नाही, तर डिजिटल युगातील समाजाच्या आरोग्यविषयक निर्णय प्रक्रियेवरच प्रश्नचिन्ह उभे करणारी घटना ठरते.

समाजमाध्यम हे माहिती, प्रेरणा आणि अनुभवांची देवाणघेवाण करणारे आधुनिक व्यासपीठ. परंतु, गेल्या काही वर्षांत त्याच्या स्वरूपापेक्षा प्रभाव अधिक महत्त्वाचा झाला. त्वचेची काळजी असो, नातेसंबंधातील नीती असो किंवा मातृत्वाची पद्धत, सर्व काही आता 'ट्रेंड', 'व्हायरल' आणि 'हॅशटॅग'च्या चौकटीतच मोजले जाते. डिजिटल दृश्ये, भावनिक कॅप्शन आणि सुंदर फिल्टर्समागे वास्तविकतेचा शोध घेण्याची सवय म्हणूनच कमी होत चालली आहे. 'फ्रीबर्थ' म्हणजे पूर्णपणे वैद्यकीय तज्ज्ञ, किंवा प्रशिक्षित साहाय्याशिवाय प्रसूती करणे. या पद्धतीचे जगभरातील समर्थक ती पद्धत नैसर्गिक आणि पूर्वजांच्या वारशाचा भाग म्हणून रंगवतात. पण, या क्षेत्रातील वैद्यकीय विज्ञान वेगळीच कथा सांगते. 'जागतिक आरोग्य संघटने'च्या आकडेवारीनुसार, २०२४ साली प्रसूतीदरम्यान जगभरात अंदाजे २ लाख, ८७ हजार मातामृत्यू झाले होते, त्यातील बर्याच घटना वेळेवर वैद्यकीय साहाय्य न मिळाल्याने घडल्याच्या नोंदी आहेत.

प्रसूतीच्या वेळी होणारा रक्तस्राव, गर्भाशयातील बिघाड, बाळाचे श्वसन थांबणे हे सर्व प्रसंग काही मिनिटांत होत्याचे नव्हते करू शकतात. या पार्श्वभूमीवर प्रसूतीमधील गुंतागुंत आणि धोके सर्वांनीच लक्षात घेणे आवश्यक आहे. 'इंस्टाग्राम-अप्रूव्ड' हा शिक्का सुरक्षिततेची हमी नाही. कारण, समाजमाध्यमे दिसणाऱ्या पोस्ट अल्गोरिदम, लोकप्रियता या घटकांवर सामग्रीला प्रसारित करीत असतात. सुरक्षिततेच्या तपशीलांपेक्षा 'यशोगाथा' आपल्याला तिथे जास्त दिसतात. मात्र, ते एक अर्धसत्य असण्याची शक्यताही अधिक. पण, उत्तम सादरीकरण आणि अल्गोरिदममुळे एकाच आशयाचा संदेश सतत दिसल्याने लोकांच्या मनात मोह निर्माण होतो. समाजमाध्यमांच्या प्रभावाचा आणखी एक धोका म्हणजे, सामाजिक दबाव! यामुळे सुरक्षिततेपेक्षा सवंग लोकप्रियतेला प्राधान्य देण्याची प्रवृत्ती बोकाळते. ही मानसिकता आता सर्वच निर्णयांमध्ये दिसू लागली आहे. आरोग्याशी संबंधित निर्णय हे तज्ज्ञांचा सल्ला, वैज्ञानिक पुरावे यांच्या आधारे घ्यावेत. समाजमाध्यमांतील कथा आपल्या भावनांना हात जरुर घालतात. पण, त्या आपल्या परिस्थितीशी जुळतात का? हे पाहणे महत्त्वाचे आहे. 'नैसर्गिक' हा शब्द मोहक आहे. पण, सुरक्षिततेची जागा घेऊ शकत नाही.

विज्ञान आणि निसर्गाचा संगमच खऱ्या अर्थाने सुरक्षित मातृत्वाचा पाया आहे आणि जर आपण या समजुतीकडे दुर्लक्ष केले, तर अशा शोकांतिकांच्या यादीत अजून नवी नावे जोडली जातील. डिजिटल जगात खरी प्रगती म्हणजे 'लाईस'पेक्षा जीवनाला, 'ट्रेंड'पेक्षा विज्ञानाला आणि प्रतिमेपेक्षा वास्तवाला प्राधान्य देणे, अन्यथा आपण चकाकत्या आभासी दुनियेच्या नादाने आरोग्य गमावण्याचा धोका पत्करत आहोत आणि यामुळे होणारे नुकसान कोणताही फिल्टर वापरून लपवता येणार नाही!

कौस्तुभ वीरकर